भारतांतील घटक राज्यांची पुनर्रचना

व

महाराष्ट्र राज्य

—:x•x:—

संयुक्त महाराष्ट्र परिषदेनें राज्यपुनर्रचना कमिशनला
सादर केलेलें निवेदन

(मूळ इंग्रजी निवेदनाचा मराठी अनुवाद)

१ सप्टेंबर १९५४.

टोपीवाला मॅन्शन्
वल्लभभाई पटेल रोड,
गिरगांव मुंबई ४.

अनुक्रमणिका

भाग १ ला	पृष्ठें
राज्यपुनर्रचनेचीं मूलभूत तत्त्वें व कार्यपद्धती	१ ते ४३
भाग २ रा	
मराठी भाषिक प्रदेशाचें राज्य व त्यामुळें निर्माण होणारे प्रश्न	
विभाग १—भावी महाराष्ट्र राज्याची अंतर्रचना व साधनसंपत्ति	४५ ते ६६
विभाग २—मुंबई शहराचा प्रश्न	६७ ते ९५
विभाग ३—कारवार व कोंकणी भाषिक	९५ ते ९८
विभाग ४—महाविदर्भाची मागणी	९९ ते १०५
विभाग ५—हैद्राबादचें विभाजन	१०६ ते १११
समारोप	१११ ते ११४
परिशिष्ट १—मराठी जिल्ह्यांचें क्षेत्रफळ व लोकसंख्या	११५ ते १२२
परिशिष्ट २—नागपूर करार	१२३ ते १२४

भाग पहिला

भाग १ ला

राज्यपुनर्रचनेचीं मूलभूत तत्त्वें व कार्यपद्धती

संघराज्यात्मक लोकशाहींतील राज्य

(१) लोकसत्ताक संघराज्यांतील घटकराज्याचें स्वरूप केवळ राज्यकारभाराच्या सोईच्या दृष्टीनें बनविण्यांत आलेल्या एका प्रांतापेक्षां बरेंच भिन्न असतें. संघांत सामील होणारा एक प्राथमिक घटक असें त्याचें स्वरूप असतें, म्हणून संघराज्याच्या घटना कायद्यानुसार घटकराज्यांना जे विस्तृत अधिकार देण्यांत आले आहेत त्याचा वापर करतां येईल व एक स्वायत्त राज्य म्हणून लोकशाही पद्धतीनें आपला कारभार हाकतां येईल इतकें सामर्थ्य असणारा तो घटक असणें अवश्य आहे. यासाठीं तो इतरांहून वेगळा व अंतर्गत एकात्मता असणारा असा घटक असणें अवश्य आहे. तसेंच या घटकाची घडण अगर निर्मिती राज्यकारभाराच्या सोईपेक्षां सामाजिक व सांस्कृतिक एकात्मतेवर आधारलेली असणें अवश्य आहे. वास्तविक संघराज्याची घटना होण्यापूर्वीच असे राज्यघटक बनविले जाणें जरूर होतें.

(२) लोकशाही पद्धतीनें राज्यकारभार चालवयाचा तर प्राथमिक घटकराज्यांतील लोकसमाजांत कांहीं किमान एकजिनसीपणा असणें अवश्य आहे हें अगदीं स्पष्ट आहे. असा एकजिनसीपणा नसेल तर त्या राज्यांतील लोकांमध्यें त्या प्रदेशाबद्दल भावनात्मक आपुलकी अगर प्रेम निर्माण होणार नाहीं आणि ही आत्मीयतेची भावना नसेल तर ती लोकशाही टिकणार नाहीं. म्हणून लोकशाही नसतांना राज्यकारभाराच्या सोयीच्या दृष्टीनें बनविण्यांत आलेले प्रादेशिक घटक किंवा प्रांत व लोकशाही राज्ययंत्रणेंत बनविण्यांत आलेलीं प्रादेशिक घटकराज्यें यांमध्यें हा जो महत्त्वाचा फरक आहे तो विसरतां कामा नये. एवढेंच नव्हे तर लोकशाही पद्धत खऱ्याखुऱ्या अर्थानें यशस्वी करावयाची असेल तर स्थानिक कारभाराच्या क्षेत्रामध्येंहि तेथील रहिवाश्यांत त्या भागाबद्दल एक प्रकारची उस्फूर्त आत्मीयता निर्माण होईल अशा रीतीनें तेथील स्थानिक कारभाराची व्यवस्था केली जाणें अवश्य आहे असें

अलीकडे मानण्यांत येतें. राज्यकारभाराच्या घटकामध्यें हे गुण ज्या प्रमाणांत वास करीत असतील त्यावर तेथील लोकशाहीचें यशापयश अवलंबून आहे. जर एखाद्या नगरपालिकेच्या लोकशाही कारभारांबाबत तेथील नागरिकांत त्या नगराबद्दलचा अभिमान अगर आत्मीयता या गुणांची आवश्यकता भासते तर मग संघराज्याचे प्राथमिक घटक असें राज्य बनवितांना तेथील रहिवाशांत या गुणांची केवढी मोठी आवश्यकता आहे हें सांगण्याची गरज नाहीं. संघराज्य याचा अर्थच हा कीं, जे घटक स्वतः एकात्म आहेत व इतरांहून भिन्न आहेत अशा घटकांचा एकत्र येऊन बनलेला संघ. म्हणून भारतीय संघराज्यांतील राज्यें बनवितांना तीं वरीलप्रमाणें एकमेकांपासून भिन्न असणारीं व अंतर्गत एकजिनसीपणा असलेलीं असणें जरूर आहे.

इतिहासाचा ओघ

(३) भारतांत वेगवेगळीं राज्यें बनविण्यासाठीं भाषा ही एक आधारभूत गोष्ट आहे हें स्पष्ट आहे, कारण भारतांतील निरनिराळे भाषिक गट सांस्कृतिक दृष्टया पृथक् असे लोकसमाज आहेत. ब्रिटिश राज्यकर्त्यांनींहि ही गोष्ट लक्षांत घेऊनच कारभाराचे दृष्टीनें प्रांताची पुनर्घटना करतांना आपलीं पावलें टाकलीं व त्यानुसार संबळपूर जिल्हा बंगालच्या ओरिसा विभागाशीं जोडण्यांत आला व बंगालपासून बिहार वेगळा करण्यांत आला. या शतकाच्या पहिल्या दशकांत बंगालच्या फाळणीस तेथील लोकांचा जो तीव्र विरोध दिसून आला तोहि हीच गोष्ट दर्शवतो, कीं समान भाषा हें सामाजिक एकतेचें एक महत्त्वाचें लक्षण आहे आणि यामुळेंच एक भाषा बोलणारे लोक एकाच राज्यांत राहिले पाहिजेत, त्यांची फाळणी आम्हीं होऊं देणार नाहीं असा तीव्र आग्रह त्यांनीं धरला होता. तसेंच लोकांना स्वराज्याचे कांहीं हक्क देण्याच्या योजना ज्यावेळीं ब्रिटिश राज्यकर्ते आंखूं लागले त्यावेळीं त्यांनाहि प्रांतांची पायाशुद्ध पुनर्रचना करणें जरूर आहे असें दिसून आलें. मॉंटेग्यू-चेम्सफर्ड रिपोर्टमध्यें या प्रश्नाची चर्चा केली आहे आणि सायमन कमिशननें आपल्या अहवालांत म्हटलें आहे कीं जर एक भाषा बोलणारांचा प्रदेश एक वेगळा राज्य-घटक होण्यासारखी परिस्थिती असेल, तेवढा तो सुसंबद्ध असेल तर प्रादेशिक व्यक्तित्वभावनेच्या परिपोषाच्या दृष्टीनें समान भाषा हा एक सामर्थ्यवान् व स्वाभाविक असा आधार निःसंशय ठरेल. अखेर १९४५ च्या सुधारणा कायद्यान्वयें

सिंध व ओरिसा हे दोन नवे वेगळे प्रांत करण्यांत येऊन भाषावार रचनेचें तत्त्व स्पष्टपणें मान्य करण्यांत आलें.

(४.) हिंदी राष्ट्रीय सभेनें (कॉंग्रेसनें) भाषावार प्रांतरचनेचें तत्त्व १९२१ सालींच मान्य केलें असून आपल्या व्यवहारासाठीं बहुतांशीं या तत्त्वानुसारच तिनें आपले प्रांत बनविले होते. हिंदुस्थान स्वतंत्र व स्वायत्त व्हावयाचा तर तेथील राज्य एक-संघ वा एकावयवी होऊं शकणार नाहीं हें हिंदी राज्यधुरीणांनीं केव्हांच ओळखलें होतें. १९२८ सालीं नेहरू कमिटीनें स्वायत्त भारताच्या घटनेचा जो खर्डा तयार केला त्यामध्यें त्यांनीं स्पष्ट शब्दांत म्हटलें आहे कीं, ' जरी आम्हीं हिंदुस्थान हें एक राष्ट्र आहे म्हणतों तरी तो एक खंडप्राय मोठा देश आहे हें आम्हांस नाकारतां येत नाहीं. त्यांतील निरनिराळ्या प्रांतांची वेगवेगळी स्वतंत्र भाषा आहे व त्यांची संस्कृतीहि भिन्न आहे. चालीरीति व रिवाज यांमध्येंहि पुष्कळ फरक आहे. आणि स्थूल अर्थानें हिंदुस्थान भौगोलिक व सांस्कृतिक दृष्ट्या एक राष्ट्र मानलें तरी त्यामध्यें बरीच विविधता असल्यामुळें विविधतेंत एकता पहाण्याचें उद्दिष्ट आम्हीं नेहमीं बाळगलें आहे. खंडप्राय विस्तार असणाऱ्या अशा या देशाचें सरकार अर्थात् अवश्यकरून संघराज्याच्या स्वरूपाचें असणें जरूर आहे आणि या संघराज्यांत समाविष्ट झालेल्या निरनिराळ्या एकजिनसी घटकराज्यांना अंतर्गत कारभारांत स्वायत्तता असली पाहिजे. " प्रांतांची पुनर्रचना करण्याबाबत या रिपोर्टांत निःसंदिग्धपणें म्हटलें आहे कीं ' विद्यमान प्रांतरचना कोणत्याच शास्त्रशुद्ध पायावर आधारलेली नाहीं हें सर्वांस माहीत आहेच. ब्रिटिशांची सत्ता भारतांत जसजशी वाढत गेली व त्यावेळीं जी परिस्थिती होती त्याप्रमाणें त्यांना सोईस्कर पडेल तसे ते बनविण्यांत आले आहेत. एकन्दरीनें पाहतां कोणत्याहि भौगोलिक, ऐतिहासिक, आर्थिक अगर भाषिक तत्त्वांशीं अगर कारणांशीं त्यांचा कांहींहि संबंध नाहीं. एवढेंच नव्हे तर केवळ राज्यकारभाराचे सोयीचे दृष्टीनेंहि ही प्रांतरचना यशस्वी व कार्यक्षम ठरलेली नाहीं. यावरून प्रांताची फेररचना करणें जरूर आहे हें उघड आहे... मग कोणत्या तत्त्वावर ही फेरविभागणी व्हावी ? थोडी भौगोलिक पायावर, थोडी आर्थिक व जमाखर्चाच्या बाबींचा विचार करून पण मुख्यतः त्या प्रदेशांतील लोकांच्या इच्छा व त्यांची भाषिक एकता हाच आधार असला पाहिजे. " आणि

यास अनुसरून या रिपोर्टांत शिफारस केली होती कीं ' त्या त्या प्रदेशांतील बहुसंख्य लोकांच्या मागणीनुसार प्रांतांची भाषावार फेररचना करण्यांत यावी. अर्थात् ती करतांना सरकारी जमाखर्चाच्या बाबींचा व कारभाराच्या सोयींचाहि विचार केला जावा. "

(५) यावरून दिसून येतें कीं ब्रिटीश राज्यकर्ते व हिंदी राजकीय पुढारी या दोघांचेंहि मत असेंच होतें कीं, विद्यमान प्रांतरचना ही बिनबुडाची व गोंधळाची असून ती बदलून त्याचेऐवजीं नवी पायाशुद्ध प्रांतरचना केली जाणें अवश्य आहे. प्रश्न एवढाच होता कीं, ती केव्हां व कशी घडवून आणावी. १९३५ च्या हिंदुस्थान सरकारच्या कायद्यानें कांहीं नवे प्रांत निर्माण करण्यांत आले, परंतु त्यावेळीं भाषावार प्रांतरचनेचा एकन्दर प्रश्न समर्पक रीतीनें हाताळला गेला नाहीं.

(६) स्वातंत्र्य प्राप्तीनंतर पहिल्या वर्षी पूर्वींच्या देशी संस्थानांचे प्रदेश भारतांत विलीन करतांना राज्यांची पुनर्रचना करण्याचा प्रसंग निर्माण झाला व त्याप्रमाणें ही पुनर्रचना करतांना पुनर्घटित प्रदेशांचें राजकीय तादात्म्य अगर एकजिनसीपणा कसा साधला जाईल याचाहि विचार करावा लागला. पूर्वींच्या देशी संस्थानांचें एकत्रीकरण करून त्याचें एक नवें राज्य बनवितांना अगर संस्थानी प्रदेश शेजारच्या प्रांतांत विलीन करतांना नवीन घटकाची भाषिक एकात्मता साधेल अगर पूर्वींची तेथील भाषिक एकात्मता बिघडली जाणार नाहीं इकडे लक्ष पुरविण्यांत आलें होतें. उदाहरणार्थ, सौराष्ट्राचें नवें राज्य निर्माण करतांना तसेंच गुजराथ, महाराष्ट्र कर्नाटक व ओरिसा यांमधील देशी संस्थानांच्या प्रदेशांचें विलीनीकरण करतांना जें धोरण स्वीकारलें गेलें त्यावरून हें स्पष्टपणें दिसून येत आहे. आणि हें धोरण जाणूनबुजून व हेतुपुरःसर स्वीकारलें गेलें होतें हें सौराष्ट्र निर्माण करतांना जो करार झाला त्यावरून स्पष्टपणें दिसून येतें. या कराराच्या (कॉव्हेनंट) १३ - व्या कलमांत स्पष्टपणें नमूद केलें आहे कीं, " या करारांतील कोणतीही बाब काठेवाड व इतर गुजराथी भाषिक प्रदेश यांचा एक संघ निर्माण करण्याचेबाबत काठेवाड सरकारला प्रत्यवाय करूं शकणार नाहीं. "

समान भाषा व संस्कृति हींच आधारभूत

(७) संघराज्य बलशाली व सामर्थ्यवान् व्हावयाचें तर त्यांतील घटक-

राज्येंहि एकात्म, बांधेसूद व मजबूत असणें अवश्य आहे हें एकदां मान्य झालें म्हणजे मग या राज्यांची अंतर्गत एकात्मता त्या प्रदेशांत आढळून येणाऱ्या समान राजकीय, सांस्कृतिक, ऐतिहासिक व इतर परंपरा यांवरूनच ठरवितां येतें, आणि ही समानता ते कोणती भाषा बोलतात यावरून चांगल निदर्शित होते. कारण समान भाषा बोलल्यामुळें त्या लोकांमध्यें सांस्कृतिक, ऐतिहासिक, राजकीय व इतर अनेक तऱ्हेचे निरनिराळे संबंध निर्माण होतात, किंवा या तऱ्हेच्या संबंधांमुळें त्यांची समान भाषा असल्याचें आढळून येतें. म्हणून कोणतेंही राज्य एकभाषिक असावें हें चटकन् मान्य करण्यास कोणतीच हरकत असूं नये एका राज्यांत अनेक भाषा बोलणारे लोक असल्यास तेथील लोकशाही सरकारला कारभार चालविणें त्रासाचें व कठीण होतें. आणि इतर कारणांचा विचार केला नाहीं तरी निदान हा त्रास वांचावा एवढयासाठीं कां होईना एकभाषिकांचीं नवीं राज्यें निर्माण केलीं जाणें अवश्य आहे. राजकीय एकात्मतेच्या निकषानुसार हीं राज्यें जेवढीं मोठीं होऊं शकतील तेवढीं मोठीं होण्यास कोणतीच हरकत नाहीं. अशीं मोठीं राज्यें संघराज्याच्या कारभाराच्या दृष्टीनें सोयीचीं ठरतील, एवढेंच नव्हे तर खुद्द त्या घटक राज्याचे दृष्टनेंहि ही गोष्ट हितावहच ठरेल. राज्यघटकांचा विस्तार जेवढा मोठा तसेंच त्यामध्यें उपलब्ध होणारी साधनसंपत्ती जेवढी विपुल त्यावर तेथील आर्थिक नियोजनाचे कार्यक्रम व समाज-कल्याण योजना यांचें यश व त्याबरोबरच त्यांचें राजकीय सामर्थ्यहि अवलंबून असतें. म्हणून एक भाषा बोलणारांची प्रामुख्यानें वस्ती असणारे सलग प्रदेशाचे जे एकसंघ टापू असतील तेच राज्यपुनर्रचनेसाठीं आधारभूत घटक मानावे लागतील.

(८) भाषावार राज्यरचनेची मागणी हें फुटीर मनोवृत्तीचें द्योतक आहे असाहि एक आरोप केला जातो. ही मागणी करणारांच्या हेतूचा अगर दृष्टीकोणाचा यापेक्षां अधिक विपर्यस्त अर्थ कोणता असणार ? संघराज्याची सत्ता अगर संघराज्य सरकारचें अधिकार याबाबत कोणताही विशिष्ट दृष्टिकोण बाळगून ही मागणी केलेली नाहीं. जे ही मागणी करतात त्यांचें म्हणणें एवढेंच कीं, भारतीय प्रजासत्ताकाचें स्वरूप संघराज्याचें आहे हें एकदां मान्य केल्यावर त्यांतील घटकराज्यांची उभारणी योजनापूर्वक व पायाशुद्ध होणें अवश्य आहे. ब्रिटिशाच्या काळांत ठरविण्यांत आलेल्या प्रांतमर्यादांची किंवा ब्रिटिश आमदानींत निर्माण झालेल्या कोणाच्याहि कसल्याहि हितसंबंधाची या प्रश्नाचा शास्त्रशुद्ध विचार करतांना गल्लत होतां कामा

नये. जीं नवीं राज्यें बनविण्यांत येतील त्यांचा दर्जा विद्यमान राज्यांसारखाच राहील व विद्यमान राज्यें संघराज्याशीं जेवढीं एकनिष्ट आहेत तेवढीं नवीं राज्येंहि राहतील.

(९) आज भारतीय प्रजासत्ताकांतील बहुसंख्य राज्यें प्रामुख्येंकरून एकभाषिकांचींच आहेत. आसाम, पश्चिम बंगाल, ओरिसा, बिहार, उत्तर प्रदेश, पेप्सू, राजस्थान, मध्यभारत, सौराष्ट्र, म्हैसूर, त्रावणकोर–कोचीन हीं सर्व राज्यें पूर्णपणें एकभाषिकांचीं आहेत किंवा कांहींचें बाबतींत सीमेवरील प्रदेशांत थोडाफार फेरबदल करून तीं पूर्णपणें एकभाषिक होण्यासारखीं आहेत. आंध्राचें नवें एकभाषिक राज्य ही त्यांत आणखी भरच आहे आणि उरलेलें मद्रास राज्य हें जवळजवळ तामीळ भाषिकांचेंच राज्य होतें. फक्त मध्यप्रदेश, मुंबई व हैद्राबाद या राज्यांमध्येंच सध्यां दोन किंवा दोहोंपेक्षां अधिक असे मोठे भाषिक गट एकत्र रहात आहेत. विद्यमान राज्यांतील एवढीं बहुसंख्य राज्यें एकभाषिक असतांना तेलगु, कानडी अगर मराठी भाषिकांनीं आपल्या एकभाषिक राज्यांची मागणी केल्यामुळें कांहीं नवे प्रश्न निर्माण होतात असें भासविणें अगर तसा आरोप करणें बुद्धिहीनतेचें अगर अप्रामाणिकपणाचें द्योतक ठरेल. भारतांतील उत्तरेकडील व पूर्वेकडील लोक राजकीय जीवनाच्या ज्या सुखसोयी उपभोगीत आहेत त्या आपणांसहि मिळाव्यात, एवढीच या दक्षिणेंतील लोकांची मागणी आहे. आणि मराठी भाषिकांची मागणी मान्य करून मराठी भाषिकांचें राज्य निर्माण झाल्यास नागपूर अगर मुंबईतील मराठीखेरीज अन्य भाषिकांची काय स्थिति होईल असा ज्यावेळीं प्रश्न करण्यांत येतो त्यावेळीं त्याला उत्तर हेंच कीं, कानपूर अगर ग्वाल्हेरमध्यें हिंदी भाषिकांखेरीज अन्य भाषिकांची जी स्थिति आहे, कलकत्त्यांत बंगालीतर भाषिकांची जी स्थिति आहे किंवा मद्रासेंत तामिळेतर भाषिकांची जी स्थिति आहे तीच स्थिति नागपूर व मुंबईमध्यें मराठीइतर भाषिकांची होईल.

सामाजिक लोकशाहीचें उद्दिष्ट गांठण्यासाठीं भाषावार राज्यांची आवश्यकता

(१०) एका समान भाषेमुळें राज्यकारभार सोयीचा होतो, एवढयाच कारणासाठीं राज्यपुनर्रचना करतांना भाषावारीचें तत्त्व आधारभूत मानलें जावें असें नव्हे, तर देशांतील बहुतेक प्रदेशांत जेथें एक समान भाषा बोलली जाते ते लोक विशिष्ट प्रादेशिक समाजाचे घटक असल्याचें, ती भाषा बोलणारांचा विशिष्ट

असा एक प्रादेशिक लोकसमाज असल्याचें दिसून येतें व या लोकसमाजाच्या इतरांहून वेगळ्या अशा सांस्कृतिक, साहित्यिक व ऐतिहासिक परंपरा असल्याचेंहि आढळून येतें. प्रादेशिक लोकसमाजाचा घटक म्हणजे काय याचें येथें थोडें अधिक स्पष्टीकरण किंवा त्याची व्याख्या करणें जरूर आहे. जातींचे निरनिराळे थर असलेला समाज हा कांहीं एकजिनसी अगर एकात्म असा लोकसमाज म्हणतां येत नाहीं. पण जातींचे वेगवेगळे थर असणाऱ्या या जातिनिविष्ट समाजाची घडण अगर रचना देशभर सगळीकडे सारखीच आहे असें नाहीं. विशिष्ट जातींची घडण अगर रचना, त्या जातीचे इतर जातीच्या समाजाशीं असणारे संबंध, तिचा दर्जा सगळीकडे एकच नसून प्रत्येक प्रदेशांत त्यामध्यें भिन्नता आढळून येते. निरनिराळ्या प्रदेशांत ही भिन्नता आढळून येत असली तरी एका प्रदेशांत मात्र त्या विशिष्ट जातीची रचना, तिचे अन्य जातीयांशीं असणारे संबंध, तिचा सामाजिक दर्जा यांमध्यें भिन्नता असल्याचें आढळत नाहीं. आणि या अर्थानें एका प्रदेशांतील लोकसमाजाची घडण त्या प्रदेशांत सर्वत्र सारखी असते व इतर प्रदेशांहून ती भिन्न असते. समाजरचनेंतील हा सारखेपणा निदान दक्षिण व पश्चिम भारतांत तरी एकभाषिक प्रदेशांत आढळून येतो. म्हणून भाषिक गट हे अखेर वेगवेगळ्या विशिष्ट घडणीचे असे लोकसमाज ठरतात. जेथे शतकानुशतकें जमिनदारी पद्धत चालू होती अशा विशेषतः उत्तर भारताच्या बऱ्याच भागांतील समाजरचनेची ठेवण अजून निम-सरंजामदारी राहिल्यामुळें तेथें सामाजिक थर नसणाऱ्या अशा प्रादेशिक समाजाचा आदर्श त्यांच्या ध्येयदृष्टीपुढें निर्माण झालेला नाहीं. या आदर्शाची कदाचित् जास्त जाणीव, तसेंच वेगवेगळ्या सामाजिक थरांतून एकतेची भावना भारतांतील दुसऱ्या प्रदेशांत असल्याचें दिसून येतें.

(११) भारतांतील कित्येक सामाजिक समस्या अगर प्रश्न विशिष्ट बाबतींत भाषिक गटागटाप्रमाणें बदलणारे असतात. ब्राह्मण–ब्राह्मणेतर वाद व त्या दोन जमातींतील तंटेबखेडे दक्षिणेंत प्रामुख्यानें दिसून येतात, उत्तरेंत ते दिसून येत नाहींत. दक्षिणेंत सुद्धां प्रत्येक भाषिक विभागांत या ब्राह्मण–ब्राह्मणेतर वादाचें स्वरूप वेगळें असल्याचें दिसून येतें. परंतु एका भाषिक विभागांत मात्र या वादाचें स्वरूप अगर या दोन जमातींतील परस्पर संबंध सर्वत्र सारखे असल्याचें आढळतें. यामुळेंच एकभाषिक प्रदेश दोन वेगळ्या राज्यांत मोडत असला तरी सामाजिक

सुधारणांचा जोर व ज्या पद्धतीनें त्या घडून येतात ती पद्धत हीं मात्र त्या भाषिक प्रदेशाच्या सर्व भागांत बहुतांशीं सर्वत्र समान असतात. अस्पृश्य जातींचे प्रश्न अगर स्त्रियांचा सामाजिक दर्जा यासारखे सामाजिक प्रश्न यांचा विचार करतांहि प्रत्येक भाषिक प्रदेशांत त्यांचें स्वरूप वेगळें असल्याचें दिसून येतें. विशेषतः अस्पृश्यांचा प्रश्न प्रदेशाप्रदेशांत बराच भिन्न असल्याचें दृष्टोत्पत्तीस येतें. महाराष्ट्रांत महारांची आर्थिक व सामाजिक स्थिति सुधारण्याच्या महत्त्वाच्या प्रश्नाशीं तो विशेष निगडित आहे, आणि या प्रश्नाचें स्वरूप कोंकणापासून थेट नागपूर मराठवाड्यापर्यंत सर्वत्र सारखें आहे. द्राविड चळवळीनें धारण केलेलें उग्र रूप हा तामिळ प्रदेशाचा एक विशिष्ट प्रश्न आहे, आणि लिंगायतासारखे विशिष्ट ज्ञातिसमाज ज्या प्रदेशांत एकवटले आहेत तेथील सामाजिक प्रश्नांना लिंगायत–लिंगायतेतर वादाचें स्वरूप प्राप्त झालें आहे. ह्या सर्व प्रश्नांचें निराकरण भारताच्या राज्यघटनेंत जीं मार्गदर्शक तत्त्वें ग्रथित केलीं आहेत त्यानुसार व्हावयाचें असलें तरी या प्रश्नांचें स्थानपरत्वें जें विशिष्ट स्वरूप दृष्टोत्पत्तीस येतें त्याचें यशस्वी रीतीनें परिमार्जन करावयाचें झाल्यास त्या विशिष्ट प्रादेशिक समाजाची रचना लक्षांत घेऊनच करणें शक्य आहे.

(१२) म्हणून हा निव्वळ भाषेपुरता प्रश्न नाहीं किंवा कांहीं ऐतिहासिक पूर्वस्मृतींमुळें निर्माण होणारा हा प्रश्न नाहीं. प्रत्येक जात जरी स्वतःपुरती स्वतंत्र असली तरी तिला आपले एकंदर व्यवहार जातिबद्ध समाजाच्या सर्वसाधारण आवरणाखालीं राहूनच करावे लागतात. भारतांतील आजचे सामाजिक उन्नतीचे अगर विकासाचे मुख्य प्रश्न या जातिबद्ध समाजरचनेशीं निगडित आहेत. शिवाय या जातिनिविष्ट समाजांतहि अशा बऱ्याच गोष्टी आढळून येतात कीं, देशांतील एकंदर राजकीय जीवनावर त्यांचा परिणाम झालेला दिसतो. म्हणून महत्त्वाच्या अशा सामाजिक, आर्थिक व राजकीय प्रश्नांचें नीट आकलन होऊन त्यांची सामग्र्यानें सोडवणूक करावयाची म्हणजे प्राथमिक राजकीय घटक जें राज्य तें सामाजिक दृष्ट्या एकात्म, एकजिनसी असणें अत्यंत आवश्यक आहे. आणि याप्रमाणें सामाजिक एकात्मता असणारा सर्व भूभाग शक्य तेवढा एकाच राजकीय घटकांत–राज्यांत समाविष्ट केला जाणेंहि जरूर आहे.

(१३) जातिबद्ध समाजाचे जे घटक आहेत म्हणजे जे हिंदु आहेत तेच तेवढे एका समान सामाजिक रचनेमुळें एकत्र बांधले जातात असें नव्हे तर त्या प्रदेशांतील हिंदूंखेरीज इतर जमातींचेहि त्यांचेशीं परंपरेनें दृढ झालेले सुनिश्चित संबंध असतात. ब्रिटिशांपूर्वी हिंदुस्थानांत जे राज्यकर्ते होऊन गेले त्यांनीं आपल्या सत्तेनें जातिबद्ध समाजांतील लोकांचें जसें नियंत्रण केलें त्याचप्रमाणें त्यांनीं हिंदू–इतर समाजाच्या हिंदु समाजाशीं असणाऱ्या संबंधांचेंहि नियंत्रण केलें. ब्रिटिशांच्या राजवटींत मात्र जी विघटनात्मक प्रक्रिया सुरू झाली त्यामुळें जातिबद्ध समाजाचे घटक लोकहि एकमेकापासून अलग होऊं लागले आणि त्याप्रमाणेंच हिंदु–इतर समाजाचे लोकहि हिंदु समाजापासून दुरावूं लागले. आतां भारताच्या या नवोदित प्रजासत्ताक राज्यामध्यें विशेषतः त्याच्या धर्मातीत स्वरूपावर व सामाजिक लोकशाहीच्या आदर्शावर जो भर देण्यांत आला आहे तो लक्षांत घेतां पुनः समाजासमाजामध्यें व समाजघटकामध्यें संघटनात्मक प्रक्रिया सुरू होईल अशी आशा बाळगण्यास जागा आहे. प्रत्येक विभिन्न समाजघटनेचे जे विशेष प्रश्न आहेत त्यांकडे हेतुपुरस्सर व काळजीपूर्वक लक्ष पुरविण्यांत आलें तरच एक खराखुरा एकात्म समाज निर्माण करण्याचें अंतिम ध्येय गांठणें शक्य आहे. त्याचप्रमाणें धार्मिक भेद हे समाजाच्या सुरळीत जीवनाच्या आड येऊं नयेत अशी इच्छा असेल तर प्रत्येक धर्माच्या अनुयायांनीं विभिन्न नसणाऱ्या अशा एका प्रादेशिक समाजाचे आपण घटक आहोंत असें मानलें पाहिजे व तसें मानण्याबाबत त्यांना उत्तेजन देण्यांत आलें पाहिजे. पण हें घडवून आणण्यासाठीं त्यास साजेशी अशी राजकीय व्यवस्था निर्माण करण्यांत आली पाहिजे. आणि या दृष्टीनें पाहतां भाषावार राज्यरचनेंत मुख्य गुण आहे तो हा कीं हें सर्व घडून येऊन अत्यंत अपेक्षित असा समाजविकास साधण्यासाठीं योग्य असा राजकीय घटक भाषावार राज्यरचनेमुळें आपोआप निर्माण होतो.

(१४) भाषावार राज्यें बनविल्यामुळें प्रत्येक राज्यांतील कांहीं विशिष्ट सामाजिक गटांना अगर जमातींना अतिशय महत्त्व येऊन त्यांचें स्थान बळावेल व आपल्या राजकीय सामर्थ्याचा ते गैरवाजवी उपयोग करतील अशी भीतीहि कांहीं लोकांकडून व्यक्त केली जाते. राजकीय सत्तेचा सर्वसामान्य वापर करतांना अशा कांहीं बाबींचा घटनात्मक लोकशाहीच्या सर्वसामान्य कारभारावर विशेष प्रतिकूल परिणाम होईल अशी आम्हांस भीति वाटत नाहीं. परंतु वरील भीतीचा

मुद्दा विचारांत न घेतांहि वर्गीकृत (अस्पृश्य) जाती व वर्गीकृत वन्य जमाती यांची विशिष्ट परिस्थिति लक्षांत घेऊन सद्यः स्थितींत त्यांना विशेष संरक्षक हक्क दिले जाणें जरूर आहे असें आम्हांस वाटतें. जीवनाच्या प्राथमिक गरजा भागविण्याबाबतहि या जमातींच्या लोकांना देशांत सर्वत्र गंभीर स्वरूपाच्या अडचणींना तोंड द्यावें लागतें. सरकारनें कायदे करून वा अन्य प्रयत्न करूनहि या जमातीच्या लोकांना वस्तीसाठीं पुरेशी जागा मिळत नाहीं, कसण्यासाठीं जमीन मिळत नाहीं, जगण्यास अत्यंत आवश्यक असें पाणी देखील त्यांना मिळत नाहीं, मुलांना शिक्षण देण्याच्या पुरेशा सोयी नाहींत आणि याशिवाय सरकार व समाज यांची वंशपरंपरेनें सेवा—चाकरी करण्यासहि ते बांधलेले असतात. लहान प्रादेशिक गटांच्या शंकांचें अगर भीतीचें निराकरण करण्याची जरूरी आम्हीं मान्य केली असून, त्यासाठीं कांहीं संरक्षक तरतुदींची योजनाहि आम्ही पसंत केली आहे. म्हणून या जमातींच्या प्राथमिक गरजा भागविल्या जातील एवढें संरक्षण त्यांना देणें तितकेंच जरूरीचें आहे. अर्थात आपल्या राज्यघटनेनें याबाबत तरतूद केलीच आहे, पण त्याची व्यवहारांत अंमलबजावणी होऊं शकत नाहीं अशी परिस्थिति आहे. एकंदरीनें हा मोठा बिकट प्रश्न आहे व त्याची सोडवणूक निव्वळ घोषणा केल्यानें चटकन् होण्यासारखी नाहीं. पण आम्हांस आशा आहे कीं, या जमातींच्या पुढाऱ्यांशीं विचारविनिमय करून या कूट प्रश्नाची सोडवणूक करण्याचा कांहीं मार्ग काढणें शक्य होईल.

(१५) हिंदुस्थानसारख्या मोठया लोकसंख्येच्या, अफाट विस्ताराच्या आणि ऐतिहासिक गुंतागुंत व विविधता असणाऱ्या देशांत सर्वत्र लोकशाहीव्यवहारक्षम असा एकच एकजिनसी समाज निर्माण करणें ही सत्यसृष्टीच्या अगर प्रत्यक्ष व्यवहारदृष्टीच्या टप्प्यापलीकडील गोष्ट आहे हें सिद्ध करण्यास विशेष खटाटोप करण्याची गरज नाहीं. म्हणून ज्या प्रदेशांतील लोकसमाजांत पूर्वीपासून कांहीं साम्य व एकजिनसीपणा वसत आहे अशांचे मोठे वेगवेगळे अभिन्न समाज निर्माण करणें हेंच महत्त्वाचें व प्रत्यक्ष गांठतां येईल असें लक्ष्य आहे. ही गोष्ट देखील मोठया सौकर्यानें करतां येईल असें नव्हे तर त्यासाठीं दीर्घ काळपर्यंत सतत परिश्रम करीत राहिलें तरच शक्य आहे. भाषिक—सांस्कृतिक—सामाजिक अंतर्गत एकता असणारे वेगवेगळे प्रदेश मिळून आपला भारत देश बनला आहे. आणि ही वस्तुस्थिति लक्षांत घेऊन त्या दिशेनें भारताची राज्यसंघटना उभारली पाहिजे. म्हणून भाषिक-

सांस्कृतिक ऐक्य असणारे समाज हाच पाया धरून त्याप्रमाणें राज्यें बनविणें हें निव्वळ राजकीय दृष्टयाच अत्यंत इष्ट आहे असें नव्हें तर सामाजिक लोकशाहीच्या दिशेनें वाटचाल करण्यासाठींहि त्याची अत्यंत जरुरी आहे. अशीं राज्यें आधीं निर्माण केलीं तरच सामाजिक लोकशाहीची प्रस्थापना करणें शक्य आहे.

(१६) अशा रीतीनें राज्यपुनर्रचना करणें म्हणजे हिंदी समाजाचा विच्छेद करण्यासारखें आहे असें मत कांहीं लोकांकडून मांडलें जातें त्याचाहि येथें विचार करणें जरूर आहे. ह्या मताचे लोक उघड उघड प्रथम हें गृहित धरतात कीं, हिंदी समाज हा आज एक एकजिनसी गट अगर घटक आहे आणि त्याचा विच्छेद एका विशिष्ट प्रकारच्या राज्यरचनेमुळें होतो व त्याखेरीज अन्य प्रकारच्या राज्यरचनेमुळें तो होत नाहीं. पण यापैकीं एकहि गोष्ट खरी नाहीं, हें गृहितकृत्य चुकीचें आहे. अखिल भारतीय एकत्वाची जाणीव अगर भावना प्रादेशिक समाजांना उल्लंघून जाणारी प्रबल अशी सर्वव्यापी भावना आहे. आणि तिच्या अस्तित्वाचा अगर वाढीचा कोणत्याहि या ना त्या प्रकारच्या राज्यपुनर्रचनेशीं संबंध नाहीं. राष्ट्रीय लोकशाही कार्यक्षम होण्यास नागरिक जाणीवेची अगर भावनेची वाढ जशी उपकारक ठरते त्याप्रमाणेंच प्रादेशिक समाजाचें महत्त्व ओळखलें गेलें तर तेंहि अखिल भारतीय एकत्वाच्या जाणीवेची वाढ होण्यास उपकारक ठरेल. प्रादेशिक गट व त्यामुळें निर्माण होणारी प्रादेशिक एकत्वाची भावना ही भारतीय ऐक्यास विरोधी आहे असें भोंगळ विधान करणारे लोक सामान्यपणें एका संकुचित पातळीवर वावरणारे असतात. बहुधा हे लोक आर्थिक, राज्यकारभारविषक किंवा राजकीय सत्ता हातीं असणाऱ्या शहरी वर्गांतील असतात. इतर सर्वसामान्य वर्गांतील लोकांच्या वर्तणुकीवर प्रादेशिक भावनांचा व सामाजिक व जातीय संबंधांचा जसा पगडा असतो त्याप्रमाणेंच अधिक धनवान् व सत्ताधारी वर्गांच्या वर्तणुकीवरहि तो असल्याचें दिसून येते. अशी वस्तुस्थिती असतांनाहि हे वरिष्ट वर्ग या भावनांच्या आहारीं जात नाहींत व आपल्या वर्तणुकीवर जातीय व सामाजिक लाग्या-बांध्यांचा पगडा बसूं देत नाहींत असें मानलें तरी तें त्यांच्या विशाल दृष्टिकोणाचें गमक कधींहि म्हणतां येणार नाहीं. आणि त्यास विशाल दृष्टिकोण म्हणावयाचें झाल्यास युरोपमधील सरंजामी युगांतल्या उमराव वर्गानें किंवा ऑस्ट्रो–हंगेरियन साम्राज्यांतील उमराव वर्गानें प्रादेशिक समाजांची कदर न करतां विशाल दृष्टिकोण

स्वीकारून आपला साम्राज्यविस्तार केला त्या अर्थानेच हा विशाल दृष्टिकोन म्हणावा लागेल. स्वतःचा वर्ग अगर श्रेणी यावर आपलें सर्व लक्ष केंद्रित करूनच ही विशाल व व्यापक दृष्टि धारण केलेली असते. तथापि ही विशालता विस्तृत क्षेत्रांतील केवळ वरच्या वर्गांतील लोकांपुरतीच मर्यादित न ठेवतां त्या विशालतेमध्यें खालपर्यंतच्या सर्व सामाजिक थरांतील लोकांचा अंतर्भाव केला तर लोकशाही समाजाचा व्यवहार सुरळित चालून त्याचा विकास होण्यास मदतच होईल.

भारताची विविधता अखिल भारतीय ऐक्य आणि एकत्वाच्या जाणीवेशीं विरोधी नाहीं

(१७) या सर्व विवेचनावरून हाच निष्कर्ष निघतो कीं, समान परंपरा, समान आकर्षणें व समान समाजरचना असणाऱ्या प्रदेशांचीं घटकराज्यें बनविलीं तरच आपलें राष्ट्रीय उद्दिष्ट आपणांस त्वरित गांठतां येईल. राष्ट्रीय विकासाची ही आखणी कोणत्याहि प्रकारें भारताच्या मूलभूत सांस्कृतिक ऐक्याला व ध्येयैक दृष्टीला विघातक ठरत नाहीं. हिंदी ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा ही विविध व बहुरंगी अशीच नेहमीं राहिली आहे. हिंदु समाजामध्यें ज्या अनेक सुधारक चळवळी झाल्या, जे निरनिराळे तत्त्वज्ञानसंप्रदाय निघाले, किंवा जे गूढ अध्यात्मिक विचार, काव्य इत्यादि निर्माण झालें त्या सर्वांमध्यें जसें साम्य तशीच विविधताहि असल्याचें दृष्टोत्पत्तीस येते. सर्व मोठया चळवळी देशभर सगळीकडे एकाच वेळीं प्रसार पावल्या असें असलें तरी या चळवळींना प्रत्येक प्रदेशाप्रमाणें कांहीं विशिष्टत्व प्राप्त झालें होतें. प्रत्येक प्रदेशांतील या चळवळींचीं इतर प्रदेसाहून भिन्न अशीं कांहीं वैशिष्ट्यें होतीं, आणि त्यामुळें कोणताहि बिघाड न होतां उलट प्रगतीच होत गेली असून भारताचें एकंदर सामर्थ्य वाढलें आहे. हे सर्व प्रदेश एका राजकीय सत्तेखालीं क्वचितच एकत्रित झाले असले तरी त्या प्रदेशांच्या विकासाची दिशा एकच राहिली आणि राजकीयदृष्ट्या विभक्त असले तरी एकाच सांस्कृतिक ओघाशीं संबद्ध असल्याची जाणीव शतकानुशतकें त्यांच्यामध्यें राहिलेली आहे. प्रतिकूल परिस्थिति असतांनाहि जर एकाच समान दिशेनें विकास होऊन ऐक्याची जाणीव राहूं शकली तर मग आतां राजकीय ऐक्य लाभल्यावर ती पुढें वाढतच जाणार नाहीं काय ? म्हणून सर्व व्यापक अशी भारतीय एकत्वाची जाणीव जागृत ठेवून त्याबरोबरच

विविध दिशांनीं विकास करण्यासहि हेतुपुरस्सर उत्तेजन देण्यांत आलें तर त्यामुळें भूतकालीन प्रगतीची दिशा कायम राहील एवढेंच नव्हे तर लोकशाही विकासाच्या आधुनिक कल्पनाहि पूर्णपणें सार्थ होऊं शकतील.

बहुभाषी राज्यांचा कारभार

(१८) भिन्नतेचीं बीजें राहिल्यामुळें सतत कांहींना कांहीं संघर्ष निर्माण करणाऱ्या प्राथमिक राज्यघटकांपेक्षां राज्यनिष्ठेची भावना आपोआप उत्स्फूर्त करणारा व पूर्णत्वानें लोकशाही राज्यकारभार चालवूं शकणारा प्राथमिक राज्यघटक संघराज्यास बळकटी आणण्याचे दृष्टीनें फारच फायद्याचा असतो याची जाणीव अजून व्हावी तितकी झालेली नाहीं. हिंदुस्थानांतच नव्हे तर राज्यकारभाराचे घटक एकजिनसी नसणाऱ्या बाहेरील देशांच्या इतिहासाचाहि हाच अनुभव आहे. एक शतकापेक्षां अधिक काल एकत्र राहूनहि उडिया व बिहारी लोकांत ऐक्याची भावना निर्माण झाली नाहीं, उलट उडियांनीं वेगळें झाल्याबरोबर सुटकेचेच निःश्वास टाकले; 'बिहाऱ्यांसाठीं बिहार' ही मागणी लॉर्ड हार्डिंजच्या १९०९ सालच्या खलित्यांत नमूद असून, अवशिष्ट बंगाली–बिहारी वादामुळें अजून पुष्कळ कटकटी व तंटे निर्माण होण्याची शक्यता आहे. विभिन्न लोकसमाजांना–भिन्नभाषिकांना सक्तीनें एकत्र डांबल्यामुळें मध्यप्रदेश, हैद्राबाद व मुंबई राज्यांत निर्माण होणाऱ्या कटकटी व तेढी कुप्रसिद्ध आहेतच. एकतेची भावना निर्माण होण्यास आवश्यक त्या महत्त्वाच्या बाबींचा अभाव असतांना केवळ दीर्घकालीन साहचर्यामुळें, मग तो कालखंड केवढाहि मोठा असो, एकत्वाची भावना वाढणें शक्य नसतें.

(१९) निरनिराळ्या भाषिक गटांचे बिघडलेले संबंध व त्यांची आपापसांतील भांडणें हा भाषावार प्रांतरचनेच्या मागणीचा परिणाम आहे, भाषिक प्रांतांच्या चळवळीमुळें तीं निर्माण झालीं आहेत असें म्हणणें म्हणजे कार्य–कारण परंपरा अगदीं उलटी लावणें आहे. सर्वांच्याच आकांक्षा सारख्याच दडपल्या जात होत्या तोंपर्यंत बहुभाषी राज्यांतील निरनिराळ्या भाषिक गटांत सहसा भांडणें निर्माण झालीं नाहींत व सर्व गट बरेचसे गुण्यागोविंदानें एकत्र नांदूं शकले. परंतु राजकीय सत्ता हातीं आल्यावर व स्वतःचा विकास आपल्या कल्पनेप्रमाणें करण्याची

शक्यता निर्माण झाल्याबरोबर हे भेद प्रगट होऊं लागले आणि लोकांच्या हातांतील सत्ता व त्याबरोबरच विकासाची शक्यता जसजशी वाढत जाऊं लागली तसतसे हे भेदहि तीव्रतर होऊं लागले. भारतांतील राजकीय घडामोडींचा सन १९२० ते १९४५ या कालखंडांतील इतिहास हेंच शिकवीत नाहीं काय?

(२०) स्वातंत्र्य प्राप्त झाल्यापासूनचा आपला अनुभवहि असाच आहे कीं बहुभाषिक राज्यें तशींच पुढें राहूं दिल्यामुळें समान भाषा व समान सामाजिक परंपरा यामुळें राज्यांना साहजिक होणारे फायदे मिळत नाहींत, एवढेंच नव्हे तर त्यामुळें निष्कारण अनेक चिरकालीन व गुंतागुंतीचे प्रश्न निर्माण होतात व त्यांची सोडवणूक करणें कठीण होऊन बसतें. याबाबत अत्यंत महत्वाचें उदाहरण म्हणजे भाषेचा प्रश्न होय. मुंबई राज्य हें बहुभाषिक राज्य असल्यामुळें तेथील सरकारला आपल्या राज्याच्या सरकारी कारभाराची भाषा प्रादेशिक भाषेऐवजीं हिंदी असावी असें एक वेळ वाटून त्यांनीं त्यासाठीं एक बिलहि आणलें. अर्थात् या बिलाला पुढें जो विरोध झाला त्यामुळें तें त्यांनीं मागें घेतलें. अशाच प्रकारचा एक प्रयत्न अलीकडे शिक्षणमंत्र्यांनींहि शिक्षण खात्यामार्फत सरकारी महाविद्यालयांतून शिक्षणाचें माध्यम हिंदी भाषा सुरू करण्याचा आदेश देऊन केला. मुंबई राज्यांतील बहुतेक सर्व विद्यापीठांनीं त्यास विरोध केला. विशेषत: गुजरात व पुणें विद्यापीठांनीं त्यास कसून विरोध केला. त्यानंतर आतां शिक्षणमंत्र्यांनीं जाहीर केलें आहे कीं, कॉंग्रेस वर्किंग कमिटीचा याबाबतचा ठराव लक्षांत घेऊन सरकार आपल्या धोरणाचा फेरविचार करीत आहे. असले उपक्रम व त्यामुळें निर्माण होणारे तंटे आणि या सर्वांमुळें निदर्शनास येणारी अडचणीची परिस्थिति एकभाषिक राज्यांत निर्माण होण्याचें कारणच नाहीं. मध्यप्रदेश राज्यांत सरकारी भाषेचा हा प्रश्न अधिक तर्कशुद्ध रीतीनें सोडवून हिंदी व मराठी या दोन्ही भाषा सरकारी कारभाराच्या भाषा म्हणून ठरविण्यांत आलें असलें तरी त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी मात्र मराठी भाषिक प्रदेशाचें समाधान करूं शकत नाहीं. सरकारी भाषेचा हा प्रश्न कायमचा सोडविण्याचे दोनच पर्याय आहेत. पहिला म्हणजे एकभाषिक राज्यांत शिक्षणाच्या व राज्यकारभाराच्या सर्व पायऱ्यांमध्यें—अवस्थामध्यें सर्वत्र प्रादेशिक भाषेचाच पूर्ण वापर करणें, व दुसरा म्हणजे सर्व देशभर हिंदी भाषेस उत्तेजन देऊन प्रादेशिक भाषांची हळूहळू गळचेपी करीत जाणें. दुसरा पर्याय

जरी कांहीं हिंदी भाषिक गटांना पसंत पडण्यासारखा असला तरी हिंदी भाषिक प्रदेशा-खेरीज भारताच्या अन्य भागांत त्यास प्रक्षोभकारी तीव्र विरोधास तोंड द्यावें लागेल. आणि पहिला पर्याय फक्त एकभाषिक राज्यांतच लागू पडण्यासारखा आहे. आजचीं राज्यें ज्याप्रकारें बनलेलीं आहेत, आज त्यांची जी घडण आहे, त्यामुळेंच हे प्रश्न उपस्थित होतात हें उघड आहे आणि तीं तशींच पुढें राहू देण्यानें होणाऱ्या परिणामांकडे दुर्लक्ष करणें किंवा त्यांना कमी लेखणें अत्यंत चुकीचें ठरणार आहे. राज्यकारभाराची भाषा व शिक्षणाची भाषा या बाबी अशा आहेत कीं त्यांचा व्यवहारांत प्रत्येक व्यक्तीच्या जीवनांतील कितीतरी महत्त्वाच्या बाबींशीं संबंध येत असतो. माणसाच्या भावना चटकन जागृत करणाऱ्या या बाबी आहेत. म्हणून भाषेच्या प्रश्नाविषयीं निर्माण होणाऱ्या या अडचणी कायमच्याच होतील अशी कोणतीहि व्यवस्था पुढें चालू ठेवणें उघड उघड सूज्ञपणाचें ठरणार नाहीं.

(२१) राज्यकारभारांत व इतर क्षेत्रांत इंग्रजी भाषेचा वापर कमी करून तिची जागा दिवसेंदिवस अधिकाधिक प्रमाणांत प्रादेशिक भाषेनें घ्यावी अशी जो नैसर्गिक चळवळ होत आहे त्यामुळेंहि ही परिस्थिति अलिकडे बरीच बिघडली आहे. सध्यांचे कारभाराचे विभाग—जिल्हे भाषिक बाबींकडे विशेष लक्ष पुरवून बनविण्यांत आलेले नसल्यामुळें दोन भाषिक प्रदेशांच्या सरहद्दीवरील पुष्कळ जिल्ह्यांत भाषिक अल्पसंख्याकांची बरीच वस्ती असते. अशा जिल्ह्यासाठीं एक प्रादेशिक भाषा ठरवून जिल्ह्याच्या कारभारांत तिचाच वापर करावयाचा ठरविल्यानें त्या जिल्ह्यांत राहणाऱ्या अन्यभाषिक अल्पसंख्याकांची मोठी कठीण परिस्थिति होते. आणि भाषावार प्रांतनिर्मितीचा प्रश्न तसाच अनिर्णित ठेवल्यानें या भागांतील परिस्थिति विशेषच बिघडते. आपल्या प्रदेशाच्या विशिष्ट भागांत अगर टापूंत इतर भाषिक अल्पसंख्य आहेत अशी कबुली दिल्यास पुढें सरहद्दी ठरविण्याचा प्रश्न येईल तेव्हां आपली बाजू कमजोर होईल या समजुतीनें भाषिक गट सध्यां वागत आहेत. म्हणून या अवस्थेत सरहद्दीवरील भागांत राहणाऱ्या भाषिक अल्पसंख्याकांची कांहीं सोय करण्याकडे अगर त्यांच्या अडचणी कमी करण्याकडे कसलीहि प्रवृत्ति दिसून येत नाहीं. यामुळें तीं परिस्थिति जास्त जास्त बिकट होत चालली आहे हें लक्षांत घेऊन विशेषतः भाषिक प्रदेशांच्या सरहद्दीवर राहणाऱ्या लोकांची स्थिति लक्षांत घेऊन ह्या प्रश्नासंबंधीं ताडवतोब कांहींतरी निश्चित निर्णय घेणें ही अत्यंत निकडीची गोष्ट होऊन बसली आहे.

(२२) गेल्या पांच वर्षांत ज्यांचेबाबत तीव्रतर अडचणी येत गेल्या असे आणखी दुसरे प्रश्न म्हणजे आर्थिक विकासयोजनांसंबंधींचें होत. प्रत्येक विभाग आपल्या विकासाची वाट पहात असतांना व आपल्या भागावर अधिकाधिक खर्च झाला पाहिजे अशी त्याची सतत ओरड चालू असतांना प्रतिस्पर्धी मागण्यांबाबत कांहीं तोड निघून सर्वांचें समाधान करणें शक्यच नसतें. तथापि या बाबतींत बहुभाषिक राज्यांचें वैशिष्ट्य हें कीं, या प्रत्येक राज्यांत वशिलेबाजीची शंका व पक्षपाताचे आरोप हीं भाषिक विभागाभोंवतीं केंद्रित झालेलीं असतात. बहुभाषिक राज्यांतील प्रत्येक भाषिक गट आपल्याला इतरांकडून अन्याय होतो असें नेहमीं मानतो. या शंका व आरोप खरे कीं खोटे याची येथें शहानिशा करीत बसणें अप्रस्तुत आहे. प्रत्यक्ष पक्षपात झाला कीं नाहीं हा प्रश्न येथें महत्त्वाचा नाहीं. मूलभूत परिस्थितीच अशी आहे कीं, तेथें कांहींहि घडो, त्याबाबत पक्षपाताचे आरोप खात्रीनें केले जाणार हेंच या घटनांनीं दाखविलें जातें. म्हणून सतत तंटेबखेडे व हेवेदावे वाढविणारी ही परिस्थिति तशीच पुढें राहूं देणें खात्रीनें मुत्सद्दीपणाचें लक्षण नव्हे. भिन्न समाजरचनेमुळें भिन्न समाजांत वेगवेगळ्या प्रकारचे भिन्न प्रश्न निर्माण होतात याचा मागें उल्लेख केलेलाच आहे. या सर्व कारणामुळें बहुभाषिक राज्यांचा कारभार सतत वाढत्या संकटांनीं ग्रस्त झालेला आहे हेंच सिद्ध होतें. ज्या राज्यांना कांहीं करावयाचें नाहीं त्यांना या अंतर्गत भेदांची विशेष दखल घेण्याचें कारण नाहीं. पण ज्या राज्यांचा विकासाच्या व लोककल्याणकारी कार्यक्रमावर भर आहे तेथें मात्र हे भेद वाढतच जाणार आहेत.

(२३) बहुभाषिक राज्यांतील लोकसमाजांत विशाल दृष्टिकोन व एकत्र खेळीमेळीनें काम करण्याची प्रवृत्ति हे गुण आढळून येतात, त्याउलट एकभाषिक राज्यांत संकुचित दृष्टिकोन व स्वतःच्या प्रदेशापुरतें पाहण्याची प्रवृत्ति हे गुण आढळतात, असें जें मानण्यांत येतें त्याचाहि येथें थोडा विचार करणें जरूर आहे. आमच्या मतें बहुभाषिक राज्यांचे जे हे गुण वर्णन केले जातात ते भ्रामक असून त्यांचे दोषच मोठे व चिरकाल टिकणारे आहेत. तथापि बहुभाषिक तत्त्वावर राज्यांची पुनर्रचना करणें एकंदर देशाच्या दृष्टीनें अत्यंत फायद्याचें व हितावह आहे असें मत असलें तर तें सगळीकडे सारखें लागू करण्यांत आलें पाहिजे व त्याप्रमाणें देशांतील राज्यपुनर्रचना कोणत्या तरी एकाच दिशेनें झाली पाहिजे. बहुभाषिक

राज्यांमध्यें गुण आहेत असें मत असलें तर देशांत आज जीं एकभाषिक राज्यें आहेत त्या सर्वांची पुनर्रचना नवीन बहुभाषिक तत्त्वावरच केली जाणें अवश्य आहे. तसें नसल्यास एकभाषिक तत्त्वावरच ती पुढें होत गेली पाहिजे. याप्रमाणें कोणती तरी एक निश्चित दिशा न पत्करतां आहे तीच परिस्थिति राहूं दिल्यास आपल्या हातांतील राज्यसत्तेच्या जोरावर देशांतील फार मोठया सामाजिक गटांच्या खडतर अडचणींची सत्ताधीश गटाकडून कशी उपेक्षा केली जाते त्याचें हें ठळक उदाहरण होईल.

(२४) तथापि पुन: आम्हीं जोरानें मांडूं इच्छितों कीं, भाषिक राज्यांची मागणी त्या रचनेंत कांहीं महत्त्वाचे गुण आहेत म्हणूनच आम्हीं करीत आहों. बहुभाषिक राज्यांच्या गैरसोयी अगर त्यांमधील हेवेदावे व तंटेबखेडे एवढयापुरताच हा प्रश्न नसून लोकशाही समाजजीवनाची उभारणी करण्याचा हा मुख्य प्रश्न आहे. एकभाषिक राज्यांत सामान्य माणसाच्या भाषेंतून राज्यकारभार चालवितां येतो व त्यामुळें लोकांना लोकशाही कारभाराचा प्रत्यक्ष अनुभव घेतां येऊन आपण त्यांत भाग घेणें जरूर आहे याची जाणीवहि त्यांच्यामध्यें निर्माण होते. त्यामुळें त्यांच्या जीवनांत कांहीं ध्येय निर्माण होतें व लोकशाही यशस्वी करण्यास आवश्यक ती एकत्वाची भावनाहि त्यामुळें निर्माण होते. म्हणून भाषावार राज्यरचनेमुळें लोकांना आपल्या सामाजिक व सांस्कृतिक विकासास उपकारक असे नैसर्गिक घटक उपलब्ध होतील आणि त्यामुळें नवराष्ट्र–उभारणीची तर्कशुद्ध पायाभरणी ते करूं शकतील.

(२५) भाषिक राज्यांची मागणी ही भारताच्या राज्यघटनेच्या चौकटींत बसेल अशाच प्रकारची पुनर्रचना करण्याची मागणी आहे. लोकांना आपला सामाजिक व सांस्कृतिक विकास करतां यावा यादृष्टीनें व चांगल्या भक्कम पायावर लोकशाही समाजजीवनाची उभारणी करतां यावी या हेतूनें ही मागणी करण्यांत येत आहे. 'उपराष्ट्रें', कोणीहि प्रवेश करूं शकणार नाहीं असे संपूर्ण मालकीचे प्रदेश किंवा संघराज्यांतून फुटून वेगळें होण्याचा हक्क अशा ज्या कांहीं कल्पनांचा या मागणी-संबंधांत उल्लेख करण्यांत येतो तो अत्यंत चुकीचा असून या कल्पनांचा या मागणीशीं कांहींहि संबंध नाहीं. आणि ही मागणी म्हणजे देशाची फाळणी करण्याची मागणी असा अर्थ करणें ही मोठी बदनामी आहे.

(२६) भाषिक तत्त्वावर राज्यांची पुनर्रचना करणें म्हणजे त्या प्रदेशांतील बहुसंख्य एकभाषिक गयला तो प्रदेश 'आंदण' देऊन टाकणें नव्हे. भाषिक बहुसंख्या ही त्या प्रदेशाच्या सीमा निश्चित करण्याचें एक निर्णायक साधन् एवढाच त्याचा अर्थ आहे. असें असतांना भाषिक राज्यें केल्यामुळें त्या भाषिक गटालाच तो सर्व प्रदेश आंदण केला जातो असें म्हणणें म्हणजे लोकशाहीचा कारभार फक्त बहुसंख्यांकांसाठीं चालतो, सर्वांसाठीं नाहीं असें म्हणण्यासारखें आहे. प्रांतांची उभारणी भाषिक पायावर केलेली असो अगर नसो, भारताची विद्यमान राज्यघटना लक्षांत घेतां प्रत्येक प्रांतांतील सांस्कृतिक व भौतिक साधनसंपत्ति त्या प्रदेशांत राहणाऱ्या लोकांच्याच तेवढी मालकीची नसून ती यच्चयावत् सर्व भारतीयांच्या मालकीची आहे.

राज्यांची निर्वाहक्षमता

(२७) पुनर्घटित राज्यें आयव्ययाचे दृष्टीनें स्वयंपूर्ण व निर्वाहक्षम असावींत हा आग्रह अगदीं बरोबर आहे. परंतु या आर्थिक निर्वाहक्षमतेची नक्की लक्षणें कोणतीं हें ठरविणें मात्र कठीण आहे. निर्वाहक्षमतेची ही कल्पना राहणीच्या दर्जाच्या कल्पनेप्रमाणेंच उपलब्ध साधनसंपत्ती व राहणीसंबंधींच्या रूढ कल्पना या दोन्हींवर अवलंबून आहे. गरीब राष्ट्रांना अगर प्रदेशांना आपल्या कमी उत्पन्नावर भागवून घ्यावें लागतें आणि सरकारच्या वाजवी कार्यक्षेत्रासंबंधींच्या त्यांच्या ज्या कल्पना असतील त्यानुसार त्यांची उत्पन्नाची गरजहि पुष्कळच बदलत जाते. हिंदुस्थानांत ही निर्वाहक्षमता निरनिराळ्या प्रदेशांचें आर्थिक सामर्थ्य पाहून व कर-आकारणी आणि खर्च यांचें विद्यमान प्रमाण,–दर्जा पाहूनच ठरवावी लागेल, आणि तीहि पुनः बदलणार नाहींत असें नव्हे.

(२८) १९५२ सालीं सरकारी जमाबंदीची चौकशी करण्यासाठीं नेमलेल्या कमिशनच्या–फायनान्स कमिशनच्या–अहवालांतून सुदैवानें आपणांस उपलब्ध होणाऱ्या बऱ्याच माहितीचा या निर्वाहक्षमतेच्या प्रश्नाची चर्चा करतांना उपयोग होण्यासारखा आहे. एका देशांतच परिस्थितीमध्यें किती विविधता असते हें या माहितीवरून चांगलें नजरेस येतें. प्रदेशाच्या आयव्ययशक्तीचा त्याच्या आकारमानाशीं प्रत्यक्ष कांहीं संबंध नाहीं हेंहि त्यावरून दिसून येतें. या रिपोर्टांत कमिशननें जी आंकडेवार माहिती दिली आहे त्यावरून राज्याराज्यामध्यें

दरडोई सरकारी उत्पन्नाच्या प्रमाणांत कैवढी तफावत आहे ही नजरेंत भरण्यासारखी गोष्ट आहे. अखेरचा हिशेब करून १९५०–५१ सालचे निरनिराळ्या राज्यांतील दरडोई सरकारी उत्पन्नाचे आंकडे या रिपोर्टात दिले आहेत; त्यामध्यें ह्या दरडोई सरकारी उत्पन्नाचें प्रमाण ओरिसामध्यें रु. ७·१ पासून तों सौराष्ट्रामध्यें दरडोई तें १९ रु. पर्यंत बदलत गेल्याचें दिसून येत आहे. बिहार व उत्तर प्रदेश यासारखीं मोठया विस्ताराचीं राज्यें अत्यंत कमी दरडोई सरकारी उत्पन्न असणाऱ्या राज्यांमध्यें मोडत आहेत. आणि सौराष्ट्र व त्रावणकोर कोचीन यासारखीं आकारानें लहान असणारीं राज्यें जास्त दरडोई उत्पन्न असणाऱ्या राज्यांत मोडतात. उलट मुंबईसारखें साधारणपणें मोठया आकाराचें राज्य जास्त दरडोई उत्पन्न असणाऱ्या राज्यामध्येंच मोडत आहे. लहान राज्यांचें दरडोई सरकारी उत्पन्न जास्त असलें तरी तेथील उत्पन्न–वसुलीचा खर्च, सर्वसाधारण राज्यकारभारावर होणारा खर्च व 'ओव्हर हेड' म्हटले जाणारे इतर सर्व खर्च मोठया राज्यांत होणाऱ्या या स्वरुपाच्या खर्चाच्या मानानें जास्त असतात. त्यामुळें त्यांना विकासयोजनांवर खर्च करणें किंवा कार्यक्षम असा नोकरवर्ग ठेवणें शक्य होत नाहीं, असेंहि कदाचित म्हणतां येईल. परंतु फायनान्स कमिशननें आपल्या अहवालांत यासंबंधीं जे आंकडे दिले आहेत ते पाहतां या म्हणण्यास दुजोरा मिळत नाहीं. मध्यभारत, राजस्थान आणि हैद्राबादसारख्या राज्यांतून उत्पन्नवसुलीचा हा खर्च प्रमाणापेक्षां फारच जास्त असल्याचें दिसून येतें आणि सौराष्ट्र व म्हैसूर या राज्यांतून तो प्रमाणापेक्षां फारच कमी असल्याचें दिसतें. त्या त्या राज्यांतील लोकसंख्येचें कमी–अधिक दाढर्यहि थोडेंफार यास कारणीभूत असावें. विस्तारानें मोठया पण विरळ लोकसंख्या असणाऱ्या राज्यांत करवसुलीचा खर्च जास्त असूं शकेल, परंतु दाट लोकवस्ती असणाऱ्या आणि विस्तारानेंहि मोठया अशा उत्तर प्रदेशासारख्या देशांत ज्यावेळीं हा उत्पन्न (कर) वसुलीचा खर्च तुलतेनें जास्त आहे असें आढळतें, त्यावेळीं त्याची उपपत्ती निराळीच सांगावी लागेल. सर्वसाधारण राज्यकारभारावर खर्च होणाऱ्या उत्पन्नाच्या प्रमाणांतील फरकांची, आकारांतील किंवा लोकसंख्येंतील फरकाच्या अनुरोधानेंहि कोणतीच महत्त्वाची उपपत्ती लागत नाहीं.

(२९) तसेंच लहान आकाराच्या राज्यांत सामान्यपणें समाजोपयोगी कार्यांवर होणाऱ्या खर्चाचें प्रमाणहि नेहमीं कमीच असतें असें नाहीं. त्रावणकोर–

कोचीन व सौराष्ट्र या दोन्ही राज्यांतून यावर होणाऱ्या खर्चाचें प्रमाण, अखिल भारतांत यासाठीं होणाऱ्या सरासरी खर्चाच्या प्रमाणाइतकेंच किंबहुना त्याहून थोडें जास्तच आढळतें, तर बिहारसारख्या मोठ्या आकाराच्या राज्यांत या खर्चाचें प्रमाण अखिल भारतीय सरासरीपेक्षां कितीतरी कमी आहे. शिक्षण, वैद्यकीय मदत व आरोग्य यासारख्या कार्यावर होणारा दरडोई खर्च राज्यांतील दरडोई उत्पन्नाच्या प्रमाणानुसार मुख्यतः कमीअधिक होत असल्याचें दिसतें. म्हणून, दरडोई सरकारी उत्पन्न जास्त असणाऱ्या मुंबईसारख्या राज्यांत या कार्यावर त्यामानानें दरडोई जास्त खर्च होऊं शकतो व दरडोई कमी उत्पन्न असणाऱ्या बिहार व उत्तर प्रदेश राज्यांतून अखिल भारतीय सरासरीपेक्षां कितीतरी कमी दरडोई खर्च या कार्यासाठीं होत असल्याचें दिसतें.

(३०) या रिपोर्टांत प्रसिद्ध झालेल्या आंकडेवार माहितीवरून सर्वसाधारणपणें हा निष्कर्ष निघतो कीं विकासयोजना अगर समाजोपयोगीं कार्ये यावर एकादें राज्य जो खर्च करूं शकतें त्याचें प्रमाण त्या राज्यांतील दरडोई उत्पन्नाच्या प्रमाणावर मुख्यतः अवलंबून आहे व राज्याच्या आकाराशीं अगर लोकसंख्येशीं त्याचा तितका संबंध नाहीं. आणि प्रादेशिक उत्पन्नाची जी पातळी असेल म्हणजे त्या प्रदेशांतील लोकांच्या उत्पन्नाचें अगर मिळकतीचें जें मान असेल त्यावरच तेथील दरडोई सरकारी उत्पन्न मुख्यत्वेंकरून अवलंबून असल्याचें दिसतें. याखेरीज दुसऱ्या बाबींशीं त्याचा विशेष संबंध असल्याचें दिसत नाहीं. म्हणून भारतांतील राज्यांच्या आयव्ययविषयक दौर्बल्याचा अगर सामर्थ्याचा विचार करतांना ज्या विशिष्ट प्रदेशाचें तें राज्य बनलें असेल त्या प्रदेशाच्या कमीअधिक दारिद्र्याचा अगर श्रीमंतीचा महत्वाचा मुद्दा विचारांत घेणें जरूर आहे हें विसरतां कामा नये.

(३१) आणखी यावरून हेंहि स्पष्ट होतें कीं राज्याचा आकार वाढल्यानें त्याचें आयव्ययविषयक सामर्थ्य विशेष वाढतें असेंहि नाहीं. दरिद्री प्रदेशांचा समावेश करणारें मोठें राज्य, त्यामानानें श्रीमंत प्रदेशांना समाविष्ट करणाऱ्या लहान राज्यापेक्षां आयव्यय सामर्थ्याचे दृष्टीनें कमी निर्वाहक्षम समजलें जाईल, तथापि राज्यरचनेसाठीं आधारभूत म्हणून मानलेलीं तत्त्वें प्रदेशाप्रदेशाप्रमाणें बदलूं शकणार नाहींत. गरीब प्रदेशांना त्यामुळें वेगळें वागविलें जाणार नाहीं. गरीब प्रदेशांचीं बनलेलीं राज्यें सरकारी आयव्ययाचे दृष्टीनें कमी निर्वाहक्षम होण्याचा संभव म्हणून

राज्यरचना करतांना या गरीब प्रदेशांचे बाबतींत वेगळे नियम लावतां येणार नाहींत. अखेर या एकंदर प्रश्नाचा संबंध देशाचे दृष्टीनें विचार करून गरीब व श्रीमंत प्रदेशांच्या आयव्ययामध्यें आवश्यक ती जुळवाजुळव करून घेतली पाहिजे आणि ही गोष्ट संघराज्य सरकारनें आपल्या अधिकारांत घडवून आणली पाहिजे. म्हणून या सर्व चर्चेचा पहिला निष्कर्ष हा कीं, राज्यांची आर्थिक निर्वाहक्षमता ठरविण्याची निरपवाद अशी कोणतीच कसोटी उपलब्ध नाहीं. त्यामुळें अन्य सर्व दृष्टींनीं एकादें राज्य बनविण्याची इष्टता आहे असें ठरल्यावर केवळ या निर्वाहक्षमतेच्या मुद्द्यावर तें बनविण्याचें टाळतां येणार नाहीं.

(३२) मोठा राज्यघटक बनविल्यानें त्यांतील साधनसंपत्ती एकवटतां येते व त्यामुळें त्या राज्याचा फायदा होतो हें दाखविण्यापुरतेंच या निर्वाहक्षमतेच्या मुद्यास अगर कल्पनेस महत्व आहे. साधारणपणें मध्यम प्रतीच्या,-फार श्रीमंत अगर गरीब नसणाऱ्या प्रदेशाचें एकच मोठें राज्य बनलें असल्यास त्याचें आर्थिक सामर्थ्य चांगलें असतें, परंतु अशा प्रदेशांत राज्यघटकांची संख्या निष्कारण वाढविली तर मात्र त्यांचें आर्थिक सामर्थ्य कमी होतें.

(३३) आपल्यासमोर असणाऱ्या प्रश्नाबाबत बोलावयाचें तर या निवेदनांत पुरस्कारलेल्या आधारभूत तत्त्वानुसार जीं नवीं राज्यें निर्माण होण्याची शक्यता आहे त्यांचेबाबत प्रत्यक्ष विचार करतां त्यांपैकीं एकहि राज्य बऱ्याच विद्यमान राज्यांपेक्षां कमी निर्वाहक्षम ठरण्याचा संभव नाहीं. आणि या विद्यमान राज्यांबाबत आयव्ययाचे दृष्टीनें तीं कमी निर्वाहक्षम आहेत, म्हणून त्यांची पुनर्घटना करणें जरूर आहे असा प्रश्न उपस्थित केला जात नाहीं. या प्रश्नाचा विचार करतांना भाषिक, सांस्कृतिक व सामाजिक एकतेची आमची कसोटी परिपूर्ण करणाऱ्या राज्यांपैकीं आसाम, ओरिसा व राजस्थान या तीन राज्यांकडे विशेष लक्ष देणें जरूर आहे. दक्षिण व पश्चिम हिंदुस्थानांत आमच्या अपेक्षेप्रमाणें राज्यपुनर्रचनेमुळें जीं राज्यें निर्माण होतील त्यांतील कोणत्याहि राज्यापेक्षां आसाम लोकसंख्येच्या मानानें बरेंच लहान राज्य ठरतें. तथापि त्याचें दरडोई सरकारी उत्पन्न त्यामानानें जास्त आहे आणि वन्य जमातींची वस्ती असणाऱ्या प्रदेशाच्या विकासार्थ कराव्या लागणाऱ्या खर्चाचा त्याच्यावरील विशेष बोजा सोडला तर आसाम सरकारला बाहेरून कोणत्याहि आर्थिक मदतीची

गरज भासत नाहीं. ओरिसा व राजस्थान हीं दोन्हीं राज्यें विस्ताराचे दृष्टीनें मोठीं असून तेथील लोकसंख्याहि बरी आहे. सरकारी दरडोई उत्पन्नाचे दृष्टीनें तीं दोन्हीं विद्यमान राज्यांच्या यादींत खालच्या दर्जाचीं आहेत आणि या दोन्ही राज्यांना विकासयोजनासाठीं व लोकहितवर्धक कार्यक्रमासाठीं बऱ्याच आर्थिक मदतीची गरज आहे. नवराज्यनिर्मिती करतांना आर्थिक निर्वाहक्षमतेचा मुद्दा कसा गैरलागू आहे हें ओरिसा व राजस्थान यांचें उदाहरणावरून चांगलें कळून येण्यासारखें आहे. निर्वाहक्षमतेची कोणतीहि कसोटी लावली तरी हीं राज्यें कमी निर्वाहक्षम राज्यांच्या यादींतच जाणार. आणि आर्थिक दृष्ट्या तीं कमी सामर्थ्यवान् आहेत. म्हणून दुसऱ्या मोठ्या राज्यांत त्यांचा समावेश करून त्यांची आर्थिक निर्वाहक्षमता वाढवावी असें कोणीहि गंभीरपणें सुचविलेलें नाहीं.

(३४) दक्षिण व पश्चिम हिंदुस्थानांत राज्यपुनर्रचनेमुळें बनणाऱ्या नवीन राज्यांचें दरडोई सरकारी उत्पन्न किती येईल हें निश्चितपणें सांगणें शक्य नाहीं. सध्यां पश्चिम व दक्षिण हिंदुस्थानांत जीं राज्यें आहेत त्यांचें १९५०–५१ सालांतील दरडोई उत्पन्न मद्रास राज्यांत १०·२ रुपये, मुंबई राज्यांत १६·८ रुपये व सौराष्ट्रामध्यें १९·० रुपये याप्रमाणें बदलत गेलें आहे. याच सालांतील मध्यप्रदेशाचे दरडोई उत्पन्न मद्रासपेक्षांहि कमी म्हणजे ९·१ रुपये होतें. पण मध्यप्रदेशाचा जो भाग पश्चिमेकडील पुनर्घटित नव्या राज्यांत जाण्याचा संभव आहे त्या भागांतील सरासरी दरडोई उत्पन्न मात्र जास्त आहे म्हणजे रुपये ११ ते १२ च्या दरम्यान आहे. म्हणून पूर्वीच्या मद्रास राज्याचे भाग सोडून राज्यपुनर्रचनेशीं संबंध येणाऱ्या बाकीच्या सर्व प्रदेशांचा विचार करतां त्यांचें दरडोई सरकारी उत्पन्न अखिल भारतीय दरडोई उत्पन्नाची सरासरी ११ रुपये आहे त्यापेक्षां जास्त आहे. आणि मद्रास राज्याच्या भागांतूनहि जीं नवीं राज्यें बनविण्यांत येतील त्यांचेंहि दरडोई उत्पन्न ओरिसा, उत्तर प्रदेश आणि बिहार यांच्या दरडोई उत्पन्नापेक्षां खात्रीनें जास्त येईल, कारण या तिन्ही राज्यांचें १९५०–५१ मधील दरडोई सरकारी उत्पन्न ९ रुपयांपेक्षां कमी आहे. म्हणून आम्हीं सुचविल्याप्रमाणें बनणारें कोणतेंहि नवें राज्य आयव्यय सामर्थ्याचे दृष्टीनें खात्रीनें दुर्बल होणार नाहीं.

(३५) राज्यांची आयव्यय–समर्थता किंवा आर्थिक निर्वाहक्षमता ठरविण्यासाठीं सध्यां पुष्कळ लोकांकडून ज्या पद्धतीनें हिशेब केला जातो त्याबद्दलहि येथें थोडें

विवेचन करणें जरूर आहे. सरकारी उत्पन्न व खर्चांचे सध्यांचे जे आंकडे आहेत त्यावर हा सर्व हिशेब आधारलेला असतो. सध्यांच्या एका पूर्ण विभागांतून ज्यावेळीं अनेक उपविभागांचे वेगवेगळे आंकडे काढले जातात त्यावेळीं एक गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, सर्व उपविभागांत उत्पन्न आणि खर्च यांचे वांटणीबाबत पूर्णपणें समानता आहे आणि ती नसल्यास त्यांतील उपविभागांचे कांहीं नवे गट जमाखर्चांचे दृष्टीनें तुटींचे आहेत असें सिद्ध होण्याचा संभव आहे. आंकडेशास्त्रांतीलच हें एक सत्य आहे. एकाद्या उपविभागांत इतर विभागांच्या मानानें सरकारी उत्पन्नाची वसुली फारच मोठी असली तर हें घडून घेण्याचा निश्चितपणें जास्त संभव. आणि अशा ठिकाणीं पूर्ण भागाच्या बेरजेंतून त्या उपविभागाचे आंकडे वेगळे काढले असतां उरलेले सर्व भाग जमाखर्चांचे दृष्टीनें तुटींचे आहेत असें सिद्ध होऊं शकेल. परंतु हिशेबाची ही सर्व पद्धत अतिशय भोळसट समजुतीवर आधारलेली आहे. उदाहरणार्थ, हे लोक असें गृहित धरतात कीं, पुनर्रचना केल्यावर या उपविभागांची उत्पन्नाची व खर्चाची सध्यां जी पातळी आहे त्यामध्यें कांहीं फेरबदल होणार नाहीं किंवा होणें शक्य नाहीं. उत्पन्नाच्या व जमाखर्चाच्या पातळीमध्यें सर्व देशांत राज्यपरत्वें केवढी मोठी तफावत आहे हें वर दाखविलेंच आहे. परंतु असें असलें तरी प्रत्येक राज्य स्वतःच्या उत्पन्न–साधनांत अनेक फेरबदल अगर जुळवाजुळव करून घेऊन उत्पन्नाच्या मर्यादेंत खर्च यावा यासाठीं प्रयत्न करीत आहे. आणखीहि हे लोक हिशेब करतांना असें गृहित धरतात कीं, राज्यघटकांमध्यें उत्पन्नवसुलीचीं आज जीं केंद्रें आहेत तीं राज्यपुनर्रचनेनंतर व त्या राज्याची विभागणी झाल्यावरहि उत्पन्नवसुलीच्या दृष्टीनें आजच्या इतकींच महत्वाचीं राहतील. शिवाय ते आणखी असेंहि गृहित धरतात कीं, मध्यवर्ती सरकारच्या उत्पन्नाच्या बाबींतून राज्याच्या वांट्यास येणारा हिस्सा किंवा मध्यवर्ती सरकारकडून मिळणारी मदत यांची त्या उपविभागांमध्यें विशिष्ट पद्धतीनेंच वांटणी होत राहील आणि हिशेबाची तोंडमिळवणी करण्याचे दृष्टीनें त्यांत कोणताहि फेरबदल होऊं शकणार नाहीं. यापैकीं एकहि गृहित कृत्य खरें नाहीं. कांहीं पुनर्घटित राज्यें जमाखर्चाच्या दृष्टीनें तुटीचीं होतील हें दाखविण्याच्या मुख्य उद्देशानें सध्यांचे उत्पन्नाचे ~~आंकडे~~ आधारभूत मानून हे हिशेब केले जातात आणि पुढें ह्या हिशेबाप्रमाणें नवीन होणारे राज्यघटक जमाखर्चांचे बाबतींत तोंडमिळवणी करूं शकणार नाहींत, ते स्वयंपूर्ण होणार नाहींत असें मांडलें जातें. ही सर्व हिशेबी उठाठेव गैर असून त्याकडे विशेष लक्ष देण्याची कांहींच गरज नाहीं.

(३६) म्हणून जर विशिष्ट प्रदेशांची दरडोई उत्पन्नाची शक्ति अखिल भारतीय दरडोई उत्पन्नाच्या सरासरीपेक्षां कमी नसेल आणि ही गोष्ट विद्यमान परिस्थितीवरून सिद्ध होत असेल तर अशा प्रदेशांतून जे नवे राजकी घटक (राज्यें) बनविण्यांत येतील ते खात्रीनें आर्थिक दृष्ट्या निर्वाहक्षम होतील, म्हणजे हिंदुस्थानांतील राज्यकारभाराची जी सरासरी कार्यक्षमता आहे तेवढया कार्यक्षमतेनें स्वतःचा राज्यकारभार चालविण्यास पुरेसें आर्थिक सामर्थ्य त्यांचेजवळ असेल. निवळ जमाखर्ची निर्वाहक्षमतेवर भर न देतां राज्याच्या एकंदर आर्थिक सामर्थ्यावर भर द्यावयाचा झाल्यास राज्यें आकारानें मोठीं असावीत असेंच सामान्य-पणें म्हणावें लागेल. अशा वेळीं राज्याचा मोठेपणा राज्याचें सामर्थ्य वाढविण्यास कारणीभूत होतो. कारण लहान राज्यांपेक्षां मोठया राज्यास महागडीं अगर जास्त खर्चाचीं कारभाराचीं खातीं विशेष त्रास न पडतां सहज पेलणें शक्य होतें. याची सत्यता विशेषतः विकासयोजना व लोककल्याणकारी कार्यावर होणाऱ्या खर्चाचे बाबतींत पटण्यासारखी आहे. सर्वसामान्य कारभाराची व्यवस्था जिल्ह्यांजिल्ह्यांत सारखीच ठेवण्याकडे कल असतो आणि जिल्ह्याच्या पातळीपेक्षां वरच्या थरावरील राज्यकारभारसंघटना त्यामानानें साधी असते, विशेष गुंतागुंतीची नसते. म्हणून केवळ सर्वसामान्य राज्यकारभारापुरताच विचार केल्यास मोठया राज्यामुळें होणारी बचत विशेष नजरेंत भरण्यासारखी नाहीं. परंतु याचे उलट लोककल्याणकारी योजनांच्या किंवा योजनाबद्ध विकासकार्यावर होणाऱ्या खर्चाबाबतच्या कारभारसंघटनेंत विशेष तज्ज्ञ व वाकबगार नोकरवर्गाचें प्रमाण बरेंच मोठें असावें लागतें, म्हणून या कार्यक्रमांचे दृष्टीनें त्या प्रदेशांतून दोन किंवा दोहोंपेक्षां अधिक राज्यघटक बनविल्यास त्या लहान घटकांचें जें सामर्थ्य राहील त्यापेक्षां कितीतरी जास्त सामर्थ्य त्यांचें एकच मोठें राज्य बनविल्यास त्या राज्याचें होईल. शिवाय लोककल्याणकारी व विकासकार्यावरील खर्चाची आंखणी मोठया एकसंध प्रदेशावर जितकी चांगल्या रीतीनें करतां येईल तितकी ती त्या प्रदेशाचे आणखी विभाग पाडल्यास करतां येणार नाहीं, ही गोष्ट निराळीच.

(३७) म्हणून आर्थिक निर्वाहक्षमतेची ही बाब कमिशननें निर्णय द्यावयाचे जे मुख्य प्रश्न आहेत त्यांच्याशीं प्रत्यक्ष संबंध येणारी महत्त्वाची बाब असल्याचें दिसत नाहीं. राज्यपुनर्रचना करण्याचें धोरण ठरविण्याचे बाबतींतील निर्णायक

स्वरूपाची ती बाब नव्हे. फार तर ती एवढेंच दर्शविते कीं, विशेष कारण नसतांना लहान आकारमानाचीं राज्यें सहसा बनविण्यांत येऊं नयेत, विशेषतः विकास-योजना व लोककल्याणकारी कार्यक्रमांचे दृष्टीनें तीं मोठीं असणें जरूर आहे.

राज्यकारभाराची सोय व त्यासारख्या इतर बाबी

(३८) राज्यांच्या पुनर्रचनेच्या प्रश्नाशीं राज्यकारभारविषयक सोयी-गैर-सोयीच्या मुद्यांचा विशेष संबंध येत नाहीं. जास्तींत जास्त या मुद्यांचा संबंध राज्याचा सर्वसाधारण आकार केवढा असावा हें ठरविण्याच्या प्रश्नाशीं येऊं शकेल. अमुक एका तत्त्वानुसार राज्यपुनर्रचना करावी व अमुक तत्त्वानुसार करूं नये असें आग्रहपूर्वक सांगण्याइतकी कोणतीहि महत्वाची राज्यकारभारविषयक बाब नाहीं. राज्यकारभारविषयक दृष्टिकोणाप्रमाणें अति विस्तृत क्षेत्र असलेलीं किंवा दुर्लंघ्य भौगोलिक अडथळ्यामुळें ज्यांचें क्षेत्र मध्यंतरीं तुटलेलें आहे अशीं राज्यें असूं नयेत, ही गोष्ट मान्य होण्यासारखी आहे. तसेंच आणखी या दृष्टीनें विचार करतां, ज्यांना राज्यघटनेनें त्यांच्यावर टाकलेली जबाबदारी पूर्णपणें पार पाडण्यास समर्थ अशी राज्य-कारभारयंत्रणा पेलतां येणार नाहीं, तेवढया कार्यक्षम राज्ययंत्रणेचा खर्च ज्यांना झेपणार नाहीं, अशीं अतिशय लहान विस्ताराचींहि राज्यें असूं नयेत ही गोष्टहि मान्य होण्यासारखी आहे. पण हीं दोन टोकें सोडल्यास कोणताहि कारभारविषयक दृष्टिकोण राज्यांची पुनर्रचना करण्याबाबत मार्गदर्शक ठरूं शकत नाहीं. पण ही तात्त्विक चर्चा सोडून प्रत्यक्ष जो विषय आपल्यापुढें आहे तेवढयापुरताच विचार करावयाचा झाल्यास आम्हीं राज्यपुनर्रचनेसाठीं आधारभूत म्हणून जीं तत्वें सुचविलीं आहेत त्याप्रमाणें निर्माण होणारीं राज्यें एक तर स्वतःचा राज्यकारभार चालविण्यास असमर्थ ठरतील एवढीं लहानहि होणार नाहींत किंवा राज्यकारभार कार्यक्षमरीतीनें चालवितां येणार नाहीं एवढीं मोठींहि होणार नाहींत.

(३९) या विषयाची चर्चा करतांना, मोठया राज्यांचा कारभार कार्यक्षम नसतो असा एक मुद्दा कधींकधीं पुढें मांडला जातो त्याचाहि येथें थोडा परामर्श घेणें जरूर आहे. याबाबत असें मांडण्यांत येतें कीं, मोठीं राज्यें अवश्यंकरून अकार्यक्षम झालींच पाहिजेत, कारण राज्याचा विस्तार मोठा असल्यामुळें सरकारला आपल्या अधिकाराची अंमलबजावणी सगळीकडे विशेषतः राज्याच्या टोकाकडे किंवा परिसीमे-

कडे चांगल्या रीतीनें करतां येणें शक्यच नाहीं. स्वातंत्र्योत्तर कालांतील भारताच्या राज्यकारभाराचा प्रत्यक्ष अनुभव पाहतां अशा निष्कर्षास कोणत्याहि प्रकारें दुजोरा मिळत नाहीं. कदाचित् कांहीं फार मोठया राज्यांतून त्यांच्या परिसीमेवरील भागांत अशांतता अगर गडबडगोंधळ होणें शक्य आहे. परंतु या अशांततेचा राज्याच्या आकारमानाशीं कांहीं संबंध नाहीं. सध्यां भारतांत शांतता, सुव्यवस्था व कायदा यांच्या रक्षणाच्या प्रश्नाचा किंवा कारभाराच्या कार्यक्षमतेच्या प्रश्नाचा राज्यांच्या लहान अगर मोठया आकाराशीं कसलाहि संबंध नसून राज्यामध्यें जी सामाजिक व आर्थिक परिस्थिती असते किंवा तेथील लोकांचे स्वभाव व त्यांच्या वर्तणुकीची जी एकंदर परंपरा असते त्याच्यावर या गोष्टी अवलंबून असतात असें आज आपण निश्चयानें म्हणूं शकतो. शिवाय फाळणीमुळें ज्या घडामोडी झाल्या त्यांतूनहि कांहीं विशेष अडचणी अलीकडच्या इतिहासांत निर्माण झाल्या व त्यामुळें कांहीं विशिष्ट राज्यांतील राज्ययंत्र दुबळें झालें. पण या गोष्टींचा राज्याच्या आकारमानाशीं कांहीं संबंध नाहीं. दक्षिणेंतील सध्यांच्या राज्यांत मुंबई राज्य हें सर्वांत मोठें आहे. परंतु तेथील राज्ययंत्रणा खात्रीनें अकार्यक्षम नाहीं किंवा त्याच्या परिसीमेवरील भागांत अधिकाराची अंमलबजावणी चांगल्या रीतीनें केली जात नाहीं असेंहि म्हणतां येत नाहीं. आणि दक्षिण व पश्चिम हिंदुस्थानांत कायदा व सुव्यवस्था यांच्या पालनाबाबत, तसेंच कारभाराच्या कार्यक्षमतेबाबत अशा परंपरा आहेत कीं, या प्रदेशांतून जीं वाजवी नवीं राज्यें बनविलीं जातील तीं सर्व विद्यमान राज्याइतकींच राज्यकारभाराचे बाबतींत कार्यक्षम ठरतील.

(४०) म्हणून निवळ राज्यकारभाराची सोय किंवा कार्यक्षमता या कारणांचा विचार केला तरीहि राज्यांच्या पुनर्रचनेची योजना अगर आराखडा ठरविण्यास उपयुक्त असें कोणतेंहि मार्गदर्शक तत्त्व त्यांतून निर्माण होत असल्याचें दिसत नाहीं. आर्थिक भूगोलाच्या मुद्यांबाबतहि, म्हणजे आर्थिकदृष्टया भूप्रदेशांची छाननी करून त्या दृष्टीनें राज्यपुनर्रचनेची युक्तायुक्तता ठरविण्याच्या मुद्याबाबतहि असेंच म्हणावें लागेल. प्राकृतिक व भौगोलिक मुद्यांना निरनिराळ्या परिस्थितींत निरनिराळें महत्त्व असून त्यांचा विचार केल्यास कोणताहि एकच निष्कर्ष निघणार नाहीं. भिन्नभिन्न निकषानुसार भिन्नभिन्न निष्कर्ष निघतील—वेगवेगळ्या परिस्थिती-प्रमाणें अगर संबंधाप्रमाणें वेगवेगळे निष्कर्ष निघतील. सर्वांना हें माहितच आहे

कीं चालू राज्यकारभारांत देखील महसुली कारभाराचा घटक अगर गट पुष्कळसा एकवट सलग क्षेत्राचा असतो, परंतु जंगल किंवा पाटबंधारे 'यासारख्या खात्यांच्या कारभाराचे घटक अगर गट त्या त्या खात्यांच्या विशिष्ट पद्धतीनें, त्यांच्या कारभारास सुकर होतील त्याप्रमाणें ठरविलेले असते.

(४१) शिवाय एकाच तऱ्हेच्या आर्थिक प्रदेशाचें म्हणजे ज्या प्रदेशांतील आर्थिक जीवन एकाच नमुन्याचें आहे अशा भूप्रदेशाचें एकादें राज्य बनलेलें असणें केव्हांहि इष्ट नाहीं. दुष्काळ पडल्यास किंवा एकादें पीक आर्थिक दृष्ट्या पडल्यास—त्या पिकाचे बाजारभाव अत्यंत मंदींत आल्यास त्या संकटास तोंड देण्यासाठीं त्या राज्यामध्येंच दुसऱ्या पिकांचे अगर अन्य तऱ्हेच्या आर्थिक जीवनाचे प्रदेश असणें जरूर आहे. म्हणून राज्यामध्यें शक्यतर निरनिराळ्या प्रकारच्या आर्थिक प्रदेशांचा समतोल असणें केव्हांहि चांगलें. तथापि, राज्यांची आर्थिक किंवा भौगोलिक घडण ज्या प्रकारच्या प्रदेशांतून तीं राज्यें बनविण्यांत आलीं असतील त्यावर अवलंबून राहील. आर्थिक किंवा भौगोलिक मुद्दे राज्यपुनर्रचनेचीं मूलभूत तत्त्वें ठरविण्यास किंवा राज्यांच्या सीमा निश्चित करण्यास कोणत्याहि प्रकारें उपयोगी पडत नाहींत, हें अगदीं स्पष्ट आहे.

(४२) वरील सर्व विवेचनाचा सारांश हा कीं:—एकत्वाची भावना असणारा, समान सांस्कृतिक व साहित्यिक परंपरा असलेला आणि समान इतिहास असणारा एक समान लोकसमाज हा भारतीय संघराज्यांतील महत्त्वाच्या प्राथमिक घटकांच्या म्हणजे राज्यांच्या उभारणीचा योग्य पाया अगर आधार आहे. आर्थिक (आयव्ययविषयक) निर्वाहक्षमता, राज्यकारभाराची सोय किंवा आर्थिक भूरचना यासारख्या दुसऱ्या कोणत्याहि गोष्टी अगर मुद्दे राज्यपुनर्रचनेचा पाया निश्चित करण्याचे दृष्टीनें कोणत्याहि महत्त्वाच्या कसोटीस उतरत नाहींत किंवा आम्हीं योग्य म्हणून पुरस्कारिलेल्या राजकीय व सामाजिक तत्त्वांची अमलबजावणी करण्याबाबतहि कोणताहि महत्त्वाचा फरक सूचित करीत नाहींत. जास्तींत जास्त, हे अन्य मुद्दे राज्यांच्या आकाराच्या कांहीं किमान व कमाल मर्यादा असाव्यात व त्या मर्यादेंत पुनर्रचनेच्या मूलभूत तत्त्वांची अंमलबजावणी व्हावी, एवढेंच सूचित करतात.

पुनर्घटित राज्यें

(४३) राज्यपुनर्रचनेसाठीं जीं तत्त्वें आधारभूत मानलीं जावींत असें आम्हीं म्हणतों त्यानुसार भारतीय संघराज्यांतील पुनर्घटित राज्यांचें चित्र अगर नकाशा खालीलप्रमाणें तयार होईल. राज्यपुनर्रचना करतांना कोणत्या भाषा आधारभूत मानाव्या, कोणत्या मानूं नयेत, त्यांची निवडानिवड कशी करावी, कोणत्या भाषांचीं वेगळीं राज्यें करावींत व कोणत्या भाषिकांचीं वेगळीं राज्यें करण्याची गरज नाहीं असें ठरवावें, ही भाषावार प्रांतरचनेच्या मार्गातील एक अडचण आहे असें एक वेळ सांगितलें जात असे. पण आतां भारतीय प्रजासत्ताकाच्या राज्यघटनेनें ही अडचण बरीचशी निवारली आहे. राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टांत कांहीं भाषा नमूद केल्या असून तिच्या ३५१ कलमांत ग्रथित केलें आहे कीं, संघराज्याच्या भाषेचा विकास करतांना या परिशिष्टांत नमूद केलेल्या भाषांना विशेष स्थान, महत्त्व देण्यांत येईल. यावरून हें स्पष्ट होतें कीं, घटना परिषदेनें एकंदर भारतीय भाषांतून विशेष महत्त्व असणाऱ्या अशा कांहीं भाषा निवडल्या. १९५१ सालीं झालेल्या शिरगणतींतील भाषाविषयक माहिती राज्यघटनेमध्यें स्वतंत्रपणें नमूद केलेल्या भाषांप्रमाणेंच ग्रथित केली आहे आणि या आठव्या परिशिष्टांत नमूद केलेल्या भाषांपैकीं बहुतेक भाषा भारतांतील प्रमुख प्रादेशिक भाषाच आहेत. म्हणून आठव्या परिशिष्टांत नमूद केल्या गेलेल्या सर्व प्रादेशिक भाषा आधारभूत मानून त्यानुसार राज्यांची पुनर्रचना करण्याचें ठरविल्यास कोणतीहि अडचण येण्याचें कारण नाहीं. आठव्या परिशिष्टांत ज्यांचा उल्लेख आहे त्या प्रादेशिक भाषा पुढील होत:—

(१) आसमी, (२) बंगाली, (३) गुजराती, (४) हिंदी, (५) कन्नड, (६) काश्मिरी, (७) मल्याळी, (८) मराठी, (९) उडिया, (१०) पंजाबी, (११) तामिळ, (१२) तेलगू.

(४४) सध्यां यापैकीं तीन भाषांचीं स्वत:चीं वेगळीं राज्यें आहेत. आसमी–भाषिक, उडिया–भाषिक व बंगाली–भाषिक लोक साधारणपणें आसाम, पश्चिम बंगाल व ओरिसा या राज्यांत समाविष्ट झाले आहेत. हिंदी भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती असलेलीं अनेक राज्यें आहेत आणि अन्यभाषिक गटाबरोबर बऱ्याच मोठ्या प्रमाणांत त्यांची सांगड घातलें गेलेलें फक्त एकच राज्य, मध्य प्रदेश हें आहे. या भाषांखेरीज इतर भाषिकांची स्थिति बरीच असमान आहे. म्हैसूर राज्य हें प्रामुख्यानें

कन्नड भाषिकांचें आहे. परंतु कन्नड भाषिकांची बरीच मोठी संख्या इतर राज्यांमध्येंहि समाविष्ट झाली आहे. सौराष्ट्र प्रामुख्यानें गुजराती भाषिकांचें असले तरी गुजराती भाषिकांची बरीच मोठी संख्या मुंबई राज्यांत समाविष्ट झाली आहे. आंध्र वेगळा झाल्यानंतर उरलेलें मद्रास राज्य हें प्रामुख्यानें तामिळ भाषिकांचें झालें आहे व तामिळ भाषिकांचा कोणताहि मोठा असा प्रदेश मद्रास राज्याबाहेर राहिल्याचें दिसत नाहीं. तथापि मद्रास राज्यांत कन्नड व मल्याळी भाषिकांची सध्यां बरीच संख्या आहे. त्रावणकोर–कोचीन राज्य प्रामुख्यानें मल्याळी भाषिकांचें आहे. परंतु त्यामध्यें कांहीं अन्यभाषिक भाग समाविष्ट झाले असून कांहीं मल्याळी–भाषिक भागहि त्या राज्याबाहेर राहिले आहेत. पंजाब प्रामुख्यानें पंजाबी भाषिकांचा बनला असून पेप्सू राज्य पूर्णपणें पंजाबी भाषिकांचेंच आहे. परंतु पंजाबमध्यें इतर भाषिकांचें थोडें मिश्रण आहे आणि सर्व पंजाबीभाषिक एका राज्यांत समाविष्ट झालेले नाहींत. नवीन आंध्र राज्य तर बुद्धिपुरस्सर आंध्रभाषिक प्रदेशाचें राज्य म्हणूनच निर्माण करण्यांत आलें आहे. तथापि अजून आंध्रभाषिकांची बरीच मोठी संख्या हैद्राबाद राज्यांत राहिली आहे. हिंदी भाषिकांना, त्यांची एकूण लोकसंख्या पहातां विशेष स्थान आहे. आसामी, बंगाली आणि उडिया या भाषा सोडल्यास दुसऱ्या कोणत्याहि भाषेच्या बाबतींत ती भाषा बोलणारे सर्व प्रदेश, कोणत्याहि अन्य भाषिक प्रदेशाचें त्यांत मिश्रण न होतां एका राज्यांत समाविष्ट झालेले नाहींत. परंतु फक्त मराठीखेरीज यांपैकीं सर्व भाषांना आपापल्या भाषिकांची प्रचंड बहुसंख्या असलेलें आणि स्वभाषिकांचा प्रदेश म्हणून सिद्ध होण्यासारखें असें स्वतःचें एक राज्य आहे.

(४५) म्हणून विद्यमान राज्यसंघटना अत्यंत संमिश्र आहे. कोणत्याहि बुद्धिवादाच्या आधारें तिचें समर्थन करतां येणार नाहीं. जर निरनिराळ्या भाषिकांचे प्रदेश एकत्र एका राज्यांत आणण्यांत कांहीं गुण आहे, फायदा आहे असें मत असलें तर भारतांतील विद्यमान बहुसंख्य राज्यांमुळें हा गुण अगर फायदा निष्पन्न होत नाहीं असें म्हणावें लागेल. आणि या गुणाची आवश्यकता खरोखरीच पटली असेल तर सध्यांच्या बहुतेक राज्यांची त्यांत इतर भाषिकांचे प्रदेश समाविष्ट होतील अशा रीतीनें पायाशुद्ध फेररचना करावी लागेल. त्याच्या उलट आम्ही म्हणतों त्याप्रमाणें सामाजिक, सांस्कृतिक व भाषिक एकतेचें तत्त्व राज्यपुनर्रचनेसाठीं आधारभूत मानणें हेंच योग्य असलें तर सुरवातीस ओरिसाचा नवा प्रांत बनवून ज्या कार्यास

प्रारंभ करण्यांत आला व अलीकडे आंध्र राज्य निर्माण करून त्यांबाबत आणखी पुढचें पाऊल टाकण्यांत आलें तें कार्य अखेर पूर्ण होईपर्यंत तसेंच पुढें चालू राहणें अवश्य आहे.

(४६) आमच्या कल्पनेप्रमाणें हिंदी भाषेखेरीज राज्यघटनेंत निर्देशिलेल्या प्रमुख प्रादेशिक भाषांच्या प्रदेशांतून भारतीय प्रजासत्ताकाचीं पुढीलप्रमाणें घटक राज्यें होतील:– आसाम, बंगाल व ओरिसा हीं राज्यें आजच्याप्रमाणेंच राहतील. राज्यांच्या सीमा ठरविण्यासाठीं सगळीकडे जीं समान तत्त्वें लावलीं जातील त्यानुसार फक्त त्यांच्या सीमाप्रदेशांत कदाचित् थोडा फेरबदल होईल. गुजरात राज्यांत, मुंबई व सौराष्ट्र राज्यांतील सर्व गुजराती भाषिक प्रदेशाचा समावेश होईल आणि त्यांत कच्छहि समाविष्ट केलें जाईल. कर्नाटक राज्यांत म्हैसूर, कूर्ग, हैद्राबाद, उरलेलें मद्रास आणि मुंबई या राज्यांतील कन्नड भाषिकांचा सर्व प्रदेश समाविष्ट होईल. केरळ राज्यांत मल्याळी भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती असलेला सर्व प्रदेश समाविष्ट होईल; त्याचप्रमाणें तामिळ भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती असलेल्या प्रदेशाचें तामिळ-नाड राज्य होईल; सध्यांच्या आंध्र राज्यांत हैद्राबाद राज्यांतील तेलगू भाषिकांचे सर्व प्रदेश मिळवून आंध्र राज्य होईल. पंजाब आणि पेप्सू राज्यांचे प्रदेश एकत्र करून पंजाब राज्य बनविलें जाईल आणि त्या राज्यांत सर्व पंजाबी–भाषिक प्रदेशांचा समा-वेश होईल. परंतु पंजाबचे बाबतींत तेथील बऱ्याच लोकांची खरी मातृभाषा कोणती याबद्दल वाद असल्यामुळें परिस्थिती थोडी गुंतागुंतीची झाली आहे. महाराष्ट्र राज्यांत सध्यांच्या मुंबई, मध्यप्रदेश व हैद्राबाद या तीन राज्यांतील सर्व मराठी-भाषिक प्रदेश समाविष्ट होईल. हीं राज्यें झाल्यावर काश्मीर राहते आणि त्याची घडण ठरवितांना असे कांहीं विचित्र प्रश्न निर्माण होतात कीं ज्यांचें निराकरण कोण-त्याहि अंतर्गत निवाड्यानें होणें शक्य नाहीं. त्यामुळें येथील पुष्कळ मोठ्या प्रदेशाचे बाबतींत घटनेंत निर्देश केलेल्या भाषेचा–काश्मिरी भाषेचा आधार उपयोगी पडत नाहीं. सध्यांच्या राजस्थान राज्याच्या सरहद्दीमध्यें जरूर पडल्यास थोडा फेरबदल करून व त्यामध्यें अजमीर समाविष्ट करून राजस्थान राज्याची पुनर्घटना करण्यास कांहींच हरकत नाहीं. राजस्थानमध्यें प्रामुख्यानें बोलल्या जाणाऱ्या भाषा म्हणजे मेवाडी, मारवाडी व जयपुरी या होत. परंतु त्या राज्यघटनेंत निर्दिष्ट केलेल्या भाषा नाहींत. त्या बोली आहेत आणि बहुतेक राजस्थानची साहित्यिक अंगर लिखित भाषा सध्यां

हिंदी हीच आहे. तथापि मेवाडी, मारवाडी व त्यासारख्या इतर बोली बोलणाऱ्या लोकांची प्रामुख्यानें वस्ती असणारा हा प्रदेश भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टया एक वेगळा स्वतंत्र घटक बनतो हें स्पष्ट आहे. या प्रदेशाच्या भाषेचा राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टांत उल्लेख नाहीं एवढया एका वैगुण्याखेरीज भारतांतील राज्यांची योग्यप्रकारें संघटना करण्यास आवश्यक म्हणून आम्हीं वर सांगितलेले सर्व गुण अगर लक्षणें या प्रदेशांत आहेत.

(४७) यानंतर सध्यांच्या बिहार, उत्तर प्रदेश, मध्य भारत, विंध्य प्रदेश, भोपाळ, हिमाचल प्रदेश आणि हिंदी भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती असलेला मध्य प्रदेशाचा भाग या सर्व राज्यांच्या प्रदेशाचा विचार करावा लागेल. या प्रदेशांतील राज्यांची पुनर्रचना कशी होऊं शकेल अगर व्हावी याचा आम्ही विशेष विचार केलेला नाहीं. तसेंच दिल्लीच्या भवितव्याचाहि आम्ही विचार केलेला नाहीं. या मोठया प्रदेशांतील राज्यांची पुनर्रचना करण्याच्या महत्त्वाच्या प्रश्नाबाबत मत देण्यास आम्हीं विशेष लायक आहोंत असें आम्हीं मानीत नाहीं. तथापि सर्वसाधारण-पणें विचार करतां या एकंदर प्रदेशाची फेर विभागणी करून त्यांतून सोयीस्कर असे राज्यघटक बनविण्यांत येतील असें आम्हीं धरून चालतों. अशारीतीनें पुनर्रचित राज्यांचा जो नकाशा तयार होईल त्यामध्यें हिंदुस्थानांत एकंदर १६ ते २० राज्य-घटक होतील. आम्हीं सुचविलेला कोणताहि पुनर्रचित राज्यघटक सध्यांच्या आसाम राज्यापेक्षां लहान होणार नाहीं आणि सध्यांच्या बिहार आणि उत्तर प्रदेश राज्यापेक्षां मोठाहि होणार नाहीं. राज्यकारभार व राज्याचा आयव्यय या बाबींचा सर्वसाधारण-पणें विचार करून राज्याचे आकाराबाबत ज्या कमाल व किमान मर्यादा ठरतात त्यामध्यें बसणारीं अशीं हीं सर्व राज्यें होतील.

राज्यांच्या घटनात्मक दर्जांत भेदाभेद नको

(४८) हिंदी संघराज्यांतील सर्व राज्यांचा घटनात्मक दर्जा एकच समान असावा असें धरून आम्हीं विचार करीत आलों आहोंत. म्हणून राज्याराज्यांतील 'अ' 'ब' आणि 'क' हे सध्यांचे दर्जात्मक फरक नाहींसे करून टाकले पाहिजेत असें आमचें मत आहे. आमच्या मतें हे फरक म्हणजे संक्रमण कालांतील ऐतिहासिक अवशेष असून यापुढेंहि ते तसेच राहूं देणें युक्त ठरणार नाहीं.

(४९) 'ब' विभागीय राज्यें एक तर पूर्वीची देशी संस्थानें किंवा त्या संस्थानांचे संघ आहेत. या संस्थानी प्रदेशाचें भारतीय संघराज्यांत सामीलीकरण सुलभ व्हावें या उद्देशानें ह्या राज्यांना कांहीं विशेष घटनात्मक दर्जा देण्यांत आला. त्यापैकीं राजप्रमुखपद हें महत्त्वाचें होय. ही राजप्रमुखाची जागा यापुढें चालू ठेवणें कितपत जरूरीचें आहे, उपयुक्त आहे यासंबंधीं लोकमत प्रदर्शित होऊं लागलेंच आहे. यापैकीं एकाचें बाबतींत म्हणजे जम्मू-काश्मीर राज्यांत हें राजप्रमुखपद नष्ट करण्यांत आलेंच आहे. दुसऱ्या महत्त्वाचे ठिकाणीं म्हणजे हैद्राबाद राज्यांत तें प्रक्षोभक विरोधी टीकेचें एक विशेष लक्ष्य होऊन बसलें आहे. आणि इतर दुसऱ्या कोणाच्याहि बाबतींत तें यापुढें चालूं ठेवावें अशी प्रबळ इच्छा किंवा त्यासंबंधीं विशेष अनुकूल मत निर्माण झालेलें नाहीं. म्हणून कांहीं राजप्रमुखांचे बाबतींत, व्यक्तिशः ते नव्या व्यवस्थेंत बसूं शकतील अशी कांहीं सोय अगर तरतूद करून घेतली तरी, राजप्रमुखाची जागा व त्यामुळें होणारे 'अ' व 'ब' असले राज्यांच्या घटनात्मक दर्जांतील भेदाभेद यापुढें चालूं ठेवण्यांत येऊं नयेत.

(५०) 'क' विभागीय राज्यें म्हणजे एक संकीर्ण मेळावाच आहे. ब्रिटिश राजवटींतील कांहीं अवशेष व सामीलीकरण होत असतांना कांहीं लहान संस्थानांचे बाबत निर्माण झालेले विशेष प्रश्न या सर्वांचा परिणाम म्हणून तीं अस्तित्वांत आलीं आहेत. अजमीर व कूर्गसारखीं राज्यें पूर्वी देशी संस्थानाच्या हद्दींतील ब्रिटिशांच्या ताब्यांतील प्रदेश होते. आणि कच्छ, भोपाळसारखीं या वर्गांतील राज्यें सामिलीकरणाच्या वेळीं त्या त्या प्रदेशांत जी विशिष्ट परिस्थिती होती त्याकडे लक्ष देऊन बनविण्यांत आलीं. परंतु यापुढेंहि तीं तशींच वेगळीं राहूं देण्यास कोणतेंच विशेष कारण नाहीं. जमाखर्चाची तोंडमिळवणी व राज्यकारभाराची सोय या दोन्ही दृष्टीकोणाशीं उघडउघड विसंगत असणारी ही गोष्ट आहे. उलट, त्यांच्या विशिष्ट घटनात्मक दर्जामुळें अनेक अडचणी निर्माण होत आहेत. कांहीं विशिष्ट राज्यांचे बाबतींतच संघराज्य सरकारनें कांहीं जादा अधिकार वापरावेत हें अत्यंत अनिष्ट आहे. संघराज्यांत सामील झालेल्या कोणत्याहि प्रदेशाचा अगर लोकसमूहाचा दर्जा त्यांतील दुसऱ्याहून कमी असतां कामा नये, या सर्वसाधारण तत्त्वानुसार 'क' वर्गीय राज्यें यापुढें नाहींशी झालींच पाहिजेत. 'क' वर्गीय राज्यांतील लोक अन्य वर्गीय राज्यांतील लोकांपेक्षां कोणत्याच तऱ्हेनें वेगळे नसतांना त्यांना घटनात्मक वेगळा दर्जा देण्याची कांहींच गरज नाहीं. म्हणून अंदमान व निकोबार बेटांची

विशेष बाब सोडली तर भारतीय संघराज्यांत समाविष्ट होणारा बाकीचा सर्व प्रदेश एकाच दर्जाचा असला पाहिजे. त्यांतील प्राथमिक घटक जीं राज्यें तीं सर्व एकाच घटनात्मक दर्जाचीं व संघराज्य सरकारशीं एकाच तऱ्हेचे संबंध असणारीं असलीं पाहिजेत. आणि सध्यां 'अ' विभागीय राज्यांचा जो दर्जा व संबंध आहेत तेच इतर सर्वांचे असले पाहिजेत.

(५१) आम्ही सुचविल्याप्रमाणें पुनर्रचना केल्यावर जीं राज्यें होतील त्यांची संख्या सध्यांपेक्षां कमीच होईल. 'क' वर्गीय राज्यें नष्ट केल्यानें कारभार व जमाखर्चाचे दृष्टीनें केंद्र सरकारला निष्कारण भारभूत होणारे कितीतरी लहान लहान घटक आपोआप नाहींसे होतील. शिवाय हीं नवीं राज्यें विद्यमान 'अ' व 'ब' वर्गीय राज्यांशीं तुलना करतां आर्थिक दृष्टया व राजकीय सामर्थ्याचे दृष्टीनेंहि अधिक बलवान ठरतील. सध्यां जीं 'अ' वर्गीय मोठीं राज्यें आहेत त्या आकारमानाचींच सर्वसाधारणपणें तीं होतील व त्यांची साधनसंपत्ति, उत्पन्नहि तेवढेंच असेल.

(५२) या पद्धतीनें राज्यांची पुनर्रचना झाल्यास ती आर्थिक विकासाच्या योजना आंखण्याचे दृष्टीनें व विशेषतः विकासयोजना बऱ्याचशा खालून म्हणजे त्या त्या प्रदेशांतील लोकांकडून सुचविल्या जाण्याचे दृष्टीनें विशेष फायद्याची ठरणार आहे. सामान्यतः मोठया राज्यांना स्वतःच्या क्षेत्रमर्यादेंत विकासयोजनांची बरीचशी एकात्मता साधणें शक्य असतें. समान राजकीय भावना व एक समान उद्दिष्ट गांठण्याची लोकांची तळमळ यामुळें विकासयोजना लोकशाही पद्धतीनें सुरू करणें सुलभ होईल व सुरू झाल्यानंतर पुढें त्या अधिक फलदायीहि होतील. कोणताहि विकासाचा कार्यक्रम नेटानें पार पाडण्यास लोकांमध्यें जी एक भावनात्मक उठावणी व्हावी लागते ती सध्यांच्या मिश्र राज्यापेक्षां नव्या पुनर्घटित एकजिनसी राज्यांत मोठया प्रमाणांत होईल.

लहान राज्यांच्या मागणीची चिकित्सा

(५३) राज्यघटक लहान असणें जरूर आहे असें जें मत बरेच वेळां मांडण्यांत येतें त्याचाहि येथें थोडा विचार करूं. राज्यें आकारानें मोठीं असण्यापेक्षां तीं लहान लहान पण संख्येनें मोठीं असलीं तर संघराज्याचा कारभार अधिक सुरळीत चालेल असें सांगण्यांत येतें. या प्रश्नासंबंधींचें प्रत्येकाचें मत लोकशाही संघराज्य

व त्याचा कारभार यासंबंधींचा प्रत्येकाचा जो दृष्टिकोण असेल त्यावर बरेचसें अवलं-बून राहील. राज्यसरकारें व संघसरकार यांच्या हितसंबंधांत विरोध असतोच आणि घटकराज्यें लहान लहान व कमी बलवान असलीं म्हणजे संघराज्य सरकारचा कारभार सुरळीत चालूं शकतो असा दृष्टिकोण स्वीकारल्यास वरील प्रश्नाचें एक तऱ्हेनें उत्तर देतां येईल. तथापि हा दृष्टिकोन बरोबर आहे असें आम्हांस वाटत नाहीं. राज्यसरकारें व केंद्र सरकार यांच्यामध्यें सत्तेची विभागणी होऊन संघराज्याची उभारणी झालेली असते. संघराज्याचे घडणींतील—अंतर्गत रचनेंतील व हितसंबंधांतील विविधता व त्याचा मोठा क्षेत्रविस्तार यामुळें अशी सत्ताविभागणी करणें जरूर असतें. म्हणून प्रादेशिक स्वरूपाचे बरेच सत्ताधिकार राज्यसरकारांकडे सोंपविलेले असतात व राष्ट्ररक्षणासाठीं आणि आर्थिक व राजकीय एकात्मता टिकविण्यासाठीं लागणारे सार्वत्रिक स्वरूपाचे सर्व सत्ताधिकार संघराज्य—सरकारकडे सुपूर्त केलेले असतात. संघ व राज्य सरकारांची कायदे करण्याबाबत कांहीं समान क्षेत्रें राहिल्यामुळें आणि प्रत्येक सरकारचा आपली सत्ता वाढविण्याकडे कल असल्यामुळें संघ—सरकार व राज्यसरकारें यांच्यामध्यें झगडे निर्माण होण्याचे प्रसंग येतात हें निःसंशय. हे तंटे मिटविण्याची घटनात्मक तरतूदहि बऱ्याच बाबतींत करण्यांत आली आहे आणि याबाबतींतील समतोल राजकीय विकासाचा देशांतर्गत व देशबहिर्गत जो कल असेल त्यावर अखेर अवलंबून असतो. उदाहरणार्थ, कॅनडाच्या निम-संघराज्यांतील मध्यवर्ती सत्ता अगर सरकार प्रबल राहील अशी कॅनडाच्या घटनेंत व्यवस्था असली तरी प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र कॅनडाच्या सरकारचें स्वरूप सध्यां ठळकपणें संघराज्य सरकारचें झालेलें आहे. उलट ऑस्ट्रेलियाची घटनात्मक ठेवण स्पष्टपणें संघराज्यात्मक असली तरी त्याचें व्यवहारांतील स्वरूप मात्र तेवढें संघराज्यसत्तेचें राहिलेलें नाहीं, हें आपण जाणतोंच.

(५४) या विकासाची भविष्यकालीन दिशा अगर स्वरूप कोणतेंहि असो, पुढें संघराज्य सरकारला राज्यांचें नियंत्रण करणें सोपें जाणार नाहीं या भीतीनें आज जाणूनबुजून लहानलहान व तुलनेनें दुर्बल अशीं राज्यें निर्माण करणें केव्हांहि शहाणपणाचें ठरणार नाहीं. प्रथम, बलवान राज्यसरकारें ज्या दृष्टिकोणाबद्दल अगर मुद्याबद्दल आग्रह धरतील तो एकंदर राष्ट्रीय हितास अवश्यमेव विघातक असलाच पाहिजे असें मानण्यास कोणतीच जागा नाहीं. तसेंच प्रत्येक बाबतींत मध्यवर्ती सरकार त्यांच्या हिताकडे अधिक चांगल्या रीतीनें लक्ष पुरवितें किंवा तें पुरवूं शकेल असें

म्हणण्यासहि कोणताच आधार नाहीं. प्रत्येक सरकारनें, मग तें समान दर्जाचें असो कीं कनिष्ठ असो, त्याच्यावर जो कार्यभार सोंपविला आहे किंवा त्याचें जें कायदेशीर कार्यक्षेत्र आहे त्यामध्यें स्वतःच्या दृष्टीकोणाचा आग्रह धरलाच पाहिजे आणि असें झालें तरच इतर लोकशाही प्रक्रियाप्रमाणें देशाचें राजकीय व आर्थिक कल्याण सामान्यतः साधणार आहे. दुसरें असें कीं, दुर्बल राज्यसरकारें स्वतः कोणतेंच कार्य अंगावर घेणार नाहींत. त्यामुळें कोणतीहि विकासाची योजना, अगर कार्यक्रम सुरू करण्याबाबत किंवा नेटानें तो पुरा करण्याबाबत त्यांचेकडून विशेष सक्रीय मदत होणार नाहीं. प्रबल राज्यसरकार वेळींप्रसंगीं दुराराध्य व शिरजोर होण्याची भीति निःसंशय असते, परंतु राज्यसरकार प्रबल असलें तरच तें आपल्या अंतर्गत विकासाकडे चांगल्या रीतीनें लक्ष देऊं शकतें व प्रत्येक वेळीं केंद्राकडे मदतीची व सल्ल्याची याचना करीत नाहीं. आणि मोठीं व बलवान राज्यें असलीं म्हणजे मध्यवर्ती सरकारलाहि स्वतःच्या अर्थबळावर व मनुष्यबळावर फारसा ताण न येऊं देतां त्या राज्यांतील विकासयोजनांचें कार्य पुढें रेटणें शक्य होतें. म्हणून कारण नसतांना राज्यसरकारें दुर्बल करणें अखेर एकंदर संघराज्यालाहि उपकारक ठरणार नाहीं. चालू राज्यकारभार हांकण्यासाठीं किंवा लहान राज्यांच्या भविष्यकालीन विकासासाठीं ज्या पुढारीपणाची अगर मार्गदर्शनाची सतत गरज भासणार तें गमावून त्याऐवजीं कांहीं राजकीय कटकटी कमी होणें किंवा मध्यवर्ती सरकारला राजकीय कारभारांत कमी लक्ष घालावें लागणें, ही त्यामानानें फार जबर किंमत ठरेल. सरकारी आयव्ययाचे दृष्टीनें जीं राज्यें लहान व दुर्बल असतात तीं राजकीय सामर्थ्याचे दृष्टीनेंहि लहान व दुर्बल ठरतात. अशीं कमजोर घटक राज्यें एकंदर संघराज्यालाहि दुर्बल करतील आणि देशामध्यें सर्वत्र लोकशाही विकासाचा मार्ग कठीण करून टाकतील. भारतांतील घटक राज्यांचा आकार केवढा असावा हें ठरवितांना आपणांस उपलब्ध असलेल्या साधनसंपत्तीचें, तसेंच तंत्रज्ञ मनुष्यबळाचें सर्वसाधारण दुर्भिक्ष्य विचारांत घेऊनच तो ठरवावा लागेल. द्रव्यबळ आणि मनुष्यबळाची विपुल साधनसंपत्ती असणाऱ्या इतर देशांत जे राज्यघटक मोठे ठरतील ते भारतांतहि मोठेच ठरतील असें नाहीं. सध्यां 'अ' वर्गीय राज्यांत देखील इतरांच्यामानानें आर्थिक दृष्ट्या दुर्बल असणाऱ्या कांहीं राज्यांना मध्यवर्ती सरकारकडून बरेंच आर्थिक सहाय्य घ्यावें लागतें. म्हणून असे दुर्बल घटक अधिक निर्माण करणें हें केव्हांहि राजकीय शहाणपणाचें कृत्य ठरणार नाहीं.

राज्यांच्या सीमा कशा ठरवाव्यात ?

(५५) राज्यपुनर्रचनेच्या प्रश्नांत नवीन राज्यांच्या सीमा ठरविणें ही एक बरीच महत्त्वाची गोष्ट आहे. नवीन राज्यें बनविण्यासाठीं राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टांत नमूद केलेल्या मुख्य प्रादेशिक भाषा बोलणारांचे जे प्रदेश आहेत—ज्या प्रदेशांत या भाषा बोलणारांची प्रामुख्यानें वस्ती आहे, तेंच क्षेत्र आधारभूत मानण्यांत यावें असें आम्ही सुचविलें आहे. प्रादेशिक भाषांचे हे प्रदेश कसे निश्चित करावेत हा सीमा ठरवितांना निर्माण होणारा मुख्य प्रश्न आहे. आणि त्यासाठीं ते निश्चित करण्याचीं तत्त्वें व कार्यपद्धति सांगणें जरूर आहे. हें करतांना कांहीं महत्त्वाच्या मूलभूत गोष्टी लक्षांत ठेवणें जरूर आहे. पुनर्विभागणी व्हावयाची तें सर्व क्षेत्र नवीन होणाऱ्या राज्यघटकांत पूर्णपणें विभागलें गेलें पाहिजे. म्हणून ही वांटणीची पद्धत अशी असली पाहिजे कीं त्यांतील कोणताहि भाग अगर प्रदेश कोणा-तरी एकाच्याच वांटयास जाईल, एकाच प्रदेशावर दोघांचे हक्क रहाणार नाहींत व कोणाच्याहि वांटयास न गेलेला असा अविभाजित प्रदेशहि तेथें शिल्लक उरणार नाहीं. तसेंच यांतून निर्माण होणाऱ्या प्रत्येक नव्या घटकाचें क्षेत्र एकत्रित व सलग भूप्रदेशाचें असलें पाहिजे आणि त्याची सीमाहि सरळ अखंडित असली पाहिजे. यावरून हें स्पष्ट होतें कीं एका राज्यघटकाच्या क्षेत्रमर्यादेंत समाविष्ट होणारा सर्व प्रदेश त्या घटकाच्याच मालकीचा होईल आणि त्यामध्यें दुसऱ्या राज्यघटकाच्या मालकीचीं कोणतींहि बेटें राहणार नाहींत. राजकीय एकात्मतेचा कोणताहि निकष लावला तरी प्रत्येक राज्यघटकाच्या क्षेत्रमर्यादेंत संमिश्र लोकसंख्या असणारे कांहीं भाग राहणार हें स्पष्ट आहे. हे भाग त्या राज्यघटकांतील भाषिक अल्पसंख्यांकांची वस्ती असलेले विभाग अगर टापू म्हणून मानले जावेत व कोणत्याहि परि-स्थितींत ज्या राज्याच्या परिसीमेंत ते येतात तेथील राज्यसत्तेचा त्यांच्यावर अधिकार चालत नाहीं असे बाहेरचे विभाग मानले जाऊं नयेत.

(५६) एका राज्यांत समाविष्ट होण्यास आवश्यक तीं सर्व लक्षणें असलेल्या प्रदेशाच्या सीमा ठरविण्याची निश्चित कार्यपद्धति कोणती असावी यावद्दल थोडें विस्तारानें सांगणें अवश्य आहे. सीमा ठरविण्यासाठीं, प्रदेशाचा केवढा भाग मूळ घटक म्हणून धरण्यांत यावा, म्हणजे अंतर्गत घडण विभिन्न असली तरीहि ज्या भागाची पुन्हां विभागणी होऊं शकणार नाहीं असा मूलभूत घटक कोणता मानावा

यासंबंधीं प्रथम निर्णय देणें जरूर आहे. यासाठीं एक जिल्हा किंवा तालुका अगर तहशील हा घटक मानण्यांत यावा असें कांहीं वेळां सुचविलें जातें. प्रदेशाची विभागणी करतांना एक तालुका अगर तहशील हा एकसंघ, एकजीव असा प्राथमिक घटक मानला जाण्यास कोणतेंच समर्पक कारण नाहीं. बहुतेक सर्व ठिकाणीं तालुका अगर तहशील हे असे घटक नाहींत कीं ज्यांना कांहीं ऐतिहासिक अगर पारंपरिक विशेष महत्त्व आहे किंवा ज्यांबद्दल तेथील रहिवाश्यांमध्यें भावनात्मक आपुलकी अगर प्रेम आहे. तालुके अगर जिल्हे बनविण्यांत आले ते त्यांत समाविष्ट होणाऱ्या भागाचें कांहीं वैशिष्टय आहे हें लक्षांत घेऊन हेतुपुरस्सर बनविण्यांत आलेले नाहींत. देशी संस्थानांचें विलीनीकरण करण्याच्या अलीकडल उपक्रमामुळें पुष्कळ तालुक्यांच्या अगर तहसिलींच्या रचनेंत खूप फरक झाला असून त्यांच्या सरहद्दी बदलल्या आहेत. मग भाषिक प्रांतांच्या सरहद्दी ठरवितांना हाच उपक्रम पुढें चालू ठेवून दोन भाषिक प्रदेशांच्या सरहद्दीवर जे तालुके असतील त्यांच्या रचनेंत जरूर तो फेरबदल कां करतां येणार नाहीं ? राज्यकारभाराचा सर्वांत कनिष्ठ घटक जें खेडें अगर गांव तेंच या सरहद्द निश्चितीच्या उपक्रमांत किमान नैसर्गिक घटक म्हणून मानण्यांत यावें. 'अ' व 'ब' विभागीय राज्यांच्या सीमा निश्चित करतांना वेगवेगळें एकेक गांव एका राज्याच्या क्षेत्रमर्यादेंतून दुसऱ्या राज्याच्या क्षेत्रमर्यादेंत कसें घातलें गेलें हें राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टाकडे पाहिलें असतां कळून येण्यासारखें आहे. आणि अशा रीतीनें सीमानिर्णय करतांना खेडेगांव हाच परिणामतः प्राथमिक अविभाज्य घटक धरण्यांत आलेला आहे हेंहि त्यावरून कळून येण्यासारखें आहे.

(५७) म्हणून खेडेगांव हा मूळ घटक धरून व त्या अनुरोधानें भाषिक प्रदेशांतील उपलब्ध माहिती जुळवून ती नकाशावर चित्रित करण्यांत यावी. दोन भाषिक प्रदेशांच्या सीमा एकमेकास भिडतात तेथील प्रदेशाबाबत नेहमींच वाद होण्याचा संभव असतो. म्हणून त्या भागाला सरहद्दीवरील विवाद्य प्रदेश म्हटलें जातें आणि हा विवाद्य भाग शेजारच्या दोन्ही भाषिक प्रदेशांतील रहिवाशी आपापल्या भाषिकांची वस्ती असणारा प्रदेश आहे असा नेहमीं आग्रह धरीत असतात. आणि या विवाद्य भागाबाबत निर्णय देण्याचें महत्त्वाचें काम 'सरहद्द कमिशन' सारख्या एखाद्या अधिकारी संस्थेला करावें लागतें. भाषा हा पुनर्रचनेचा मुख्य आधार हें एकदां मान्य केल्यानंतर सीमा ठरविण्यासाठीं लागणारी उपयुक्त माहिती म्हणजे सरहद्दीवरील विवाद्य पट्ट्यामध्यें येणाऱ्या निरनिराळ्या गांवांची लोकसंख्या व प्रत्येक गांवांतील निरनिराळ्या भाषिकांचें प्रमाण ही होय.

(५८) आमच्या कल्पनेप्रमाणें सीमानिर्णयाची सविस्तर प्रक्रिया पुढीलप्रमाणें होईलः—प्रथम दोन भाषिक प्रदेशांच्या सरहद्दीवरील विवाद्य भाग अगर क्षेत्र कोणतें तें ठरविण्यांत येईल. नंतर १९५१ च्या शिरगणतीच्या आधारें या विवाद्य पट्टयांत येणाऱ्या प्रत्येक गांवांतील निरनिराळ्या भाषिकांची संख्या व त्यांचें परस्पर प्रमाण नकाशावर दाखविलें जाईल. कोणत्याहि सरहद्दीवरील प्रदेशांतील भाषिक माहितीचा सीमानिर्णयाचे दृष्टीनें विचार करतांना कोणत्या तरी फक्त दोन भाषांचा संबंध येतो. ज्या दोन भाषिक प्रदेशांतील सीमा निश्चित करावयाची असते त्या दोन भाषिकांची प्रत्येक गांवांतील लोकसंख्या व त्यांचें परस्पर प्रमाण हींच महत्वाचीं असतात. आणि या दोन भाषिकांखेरीज तेथील अन्यभाषिकांची संख्या त्या प्रदेशाच्या सीमा निश्चित करतांना विचारांत घ्यावयाची नसते. नकाशावर विवाद्य पट्टा दाखवून व त्यांत वरीलप्रमाणें सर्व माहिती चित्रित करून त्यानुरोधानें त्यांतून जाणारी सरहद्द रेषा काढण्यांत यावी आणि ती सलग व अखंडित होईल इकडे लक्ष दिलें जावें, व दोन्ही भाषिकांपैकीं जास्तींत जास्त लोकांचें समाधान होऊं शकेल अशा रीतीनें ती काढण्याचा प्रयत्न व्हावा. कांहीं वेळां एकाद्या गावांतील बहुसंख्य लोकवस्ती ज्या भाषिक प्रदेशांत तें मोडतें त्या भाषिकांची असली तरी सलग अखंडित सीमा असावी ह्या तत्वास बाध येण्याचा संभव असल्यास तें गांव त्या भाषिक प्रदेशांत समाविष्ट करणें शक्य होणार नाहीं. सलग अखंडित सीमा कशास म्हणावें ही कदाचित् मतभेदाची बाब होईल. परंतु आमच्या मतें, कोणत्या तत्त्वानुसार व पद्धतीनें सीमा ठरविण्यांत याव्या तें सुरवातीस स्पष्टपणें नमूद करून नंतर सीमेसंबंधीं प्रत्यक्ष निवाडा देण्याची कामगिरी एकाद्या निःपक्ष लवादाकडे सोपविल्यास भागण्यासारखें आहे.

(५९) ज्यावेळीं जंगल अगर वाळवंट यासारख्या निर्जन प्रदेशांतून किंवा दोन्ही बाजूच्या प्रदेशांतील मुख्य भाषिकांची वस्ती जेथें अगदींच थोडी आहे अशा एकाद्या वन्य जमातीच्या प्रदेशांतून सीमारेषा काढावी लागते त्यावेळीं गांववार भाषिक लोकसंख्येच्या माहितीचा सीमानिर्णयाचे दृष्टीनें कांहींच उपयोग होत नाहीं. अशा प्रसंगीं, त्या प्रदेशाच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करून उदाहरणार्थ, त्या प्रदेशाचा पाणलोट (वॉटरशेड) कोणीकडे आहे तें पाहून त्यानुरोधानें सीमारेषा निश्चित करावी लागेल, किंवा त्या प्रदेशाच्या कांहीं विशिष्ट

सामाजिक लक्षणांवरून ती ठरवावी लागेल. सरहद्दीवरील वन्य जमातींचे टापू कोणत्या भाषिक राज्यांत समाविष्ट करावेत या प्रश्नाचा निर्णय, त्या वन्य जमातींचे ज्या भाषिक प्रदेशांशीं घनिष्ट संबंध असतील किंवा दोहोंपैकीं ज्या भाषिक गटांत हळूहळू मिसळून जाण्याकडे त्यांची प्रवृत्ति असेल त्यानुसार देण्यांत यावा व त्याप्रमाणें त्या दोन राज्यांमधील सीमारेषा निश्चित करण्यांत यावी. ज्यावेळीं सरहद्दीवरील प्रदेशांत त्या प्रदेशांतील प्रमुख भाषिकांची संख्या अत्यंत थोडी असते व त्यामुळें भाषिक विरगणतीची माहिती तेथें उपयोगी पडत नाहीं अशा वेळीं, किंवा कोणत्याहि स्पष्ट भौगोलिक लक्षणांवरून नैसर्गिक सीमारेषा निश्चित ठरवितां येत नाहीं अशावेळीं, वरील गोष्टी लक्षांत घेऊन सीमा निश्चित करण्याचा प्रसंग येतो.

(६०) त्या प्रदेशांतील प्रमुख भाषिकांचीच संपूर्ण वस्ती असणाऱ्या प्रदेशाची सीमारेषा ठरवितांना भौगोलिक किंवा आर्थिक लक्षणांना आम्हीं कांहींही महत्व देत नाहीं. एकदां भाषा हा आधार मानल्यावर सरहद्दी निश्चित करण्याचेबाबत समाधानकारक निर्णय द्यावयाचा असेल तर तो कोणत्याहि कारणासाठीं सोडून देतां येणार नाहीं. ओरिसाचें नवें राज्य बनविण्यांत आलें तेव्हां ओरिसा व मद्रास यांची सरहद्द ठरवितांना व नवें आंध्र राज्य व म्हैसूर यांमधील सीमारेषा ठरवितांनाहि हेंच भाषिक तत्त्व अंगिकारलें होतें, हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. जस्टिस मिश्र यांचा आंध्र राज्याच्या सीमानिर्णयाचा अहवालहि यासारख्या तत्त्वावरच आधारलेला आहे. जरी त्यांनीं विभागणी करतांना संबंध तालुका हा एक गट अगर घटक मानून विभागणी केली असली तरी सरहद्दीवरील प्रत्येक खेड्याच्या माहितीची नीट छाननी करून नंतरच त्यांनीं ती सुचविली आहे.

राज्यपुनर्रचनेमुळें निर्माण होणारे कांहीं प्रश्न

(६१) भाषावार पुनर्रचना केल्यामुळें कोणत्याहि राज्यांतील रहिवाशांच्या दर्जांत अगर स्थितींत कोणताहि बदल होत नाहीं, मग ते कोणतीहि भाषा बोलणारे असोत. एक भाषा हा राज्यपुनर्रचनेसाठीं आधार मानलेला असला तरी त्याचा अर्थ असा नव्हे कीं त्या राज्यांतील प्रमुख भाषिकांत आणि तेथील अन्यभाषिकांत कांहीं भेदाभेद करण्यांत येत आहे. ही पुनर्रचना करणें कां जरूर आहे याचें मुख्य कारण आम्हीं वर सांगितलेंच आहे तें हें कीं, एका राज्यांत राहणाऱ्या बहुसंख्य रहिवाशांमध्यें कांहीं समान भाषिक, सामाजिक व सांस्कृतिक लक्षणें असणें इष्ट आहे.

यामुळें त्या राज्यांत राहणाऱ्या इतर भाषिक रहिवाशांना वेगळ्या रीतीनें वागविलें जाईल, भाषिक बहुसंख्य व भाषिक अल्पसंख्य यांमध्यें भेदाभेद केला जाईल किंवा त्या राज्यांतून इतर भाषिक अल्पसंख्याकांना हाकलून देण्याची इच्छा आहे, असा याचा बिलकूल अर्थ नाहीं. सध्यां अस्तित्वांत असलेल्या एकभाषी अगर बहुभाषी राज्यांत राहणाऱ्या नागरिकांची जी स्थिति आहे त्यापेक्षां कोणतीहि वेगळी स्थिति या नव्या राज्यांत राहणाऱ्या नागरिकांची होणार नाहीं हें येथें आग्रहानें सांगणें जरूर आहे. आज उत्तर प्रदेशांत हिंदी–इतर भाषिकांची जी स्थिति आहे, किंवा पश्चिम बंगालमध्यें बंगाली–इतर भाषिकांची जी स्थिति आहे, ओरिसांत उडियेतर भाषिकांची, किंवा सौराष्ट्रांत गुजराती–इतर भाषिकांची जी स्थिति आहे त्यापेक्षां कोणतीहि वेगळी स्थिति या नव्या पुनर्रचित राज्यांतील मुख्य–भाषिकेतर अन्यभाषिकांची होणार नाहीं.

(६२) म्हणून या पुनर्रचनेमुळें खास असे कोणतेही घटनात्मक अगर राजकीय प्रश्न निर्माण होत नाहींत. एका दिशेनें कांहीं त्रास होण्याचा संभव आहे व त्यामुळें सर्व राज्यांत बाहेरून येणाऱ्या लोकांना संक्रमणावस्थेंतील कांहीं अडचणींना निःसंशय तोंड द्यावें लागेल. नजीकच्या भविष्य काळांत अखिल हिंदुस्थानांत जें संक्रमण घडून येणार आहे त्याचेंच हें पुरोगामी लक्षण म्हणावें लागेल. राज्यकारभारांतील इंग्रजी भाषेचें महत्त्व कमी झाल्यामुळें बुद्धिजीवी नोकरवर्गास देशभर इकडून तिकडे कोणत्याहि राज्यांत जाण्यायेण्याची जी सुलभता होती ती नाहींशी होईल आणि एका भाषिक राज्यांतून दुसऱ्या भाषिक राज्यांत जाणारे लोक यापुढें प्रादेशिक भाषेची आजच्याप्रमाणें उपेक्षा करूं शकणार नाहींत. राज्यकारभारांत प्रादेशिक भाषेचें महत्त्व हळूहळू वाढत जाणार आणि त्या राज्यांत नोकरी करूं इच्छिणाऱ्या बहुतेकांना त्या प्रादेशिक भाषेचें ज्ञान अत्यंत आवश्यक होणार. एकंदरीनें ही सर्व उपकारक चळवळ आहे असेंच म्हटलें पाहिजे. आतांपर्यंत एका प्रदेशांतून दुसऱ्या प्रदेशांत बुद्धिजीवी लोक मोठया प्रमाणांत गेलेआले तरी निरनिराळ्या प्रदेशांमध्यें कोणत्याहि विशेष प्रकारची एकत्व भावना किंवा परिणामकारक संघटण निर्माण झालेलें नाहीं. कारण इंग्रजीचा वरचष्मा असल्यामुळें बाहेरून येणाऱ्या लोकांना त्या प्रदेशांतील लोकांची भाषा, चालीरिती, कल्पना, समजुती या कशांचाहि परिचय करून घेण्याची गरजच भासली नाहीं.

आतां नव्यानें ज्या गोष्टींची गरज भासणार, त्या अंतीं कितीहि फायद्याच्या असल्या तरी, मध्यंतरीं संक्रमणावस्थेंत त्यामुळें कांहीं अडचणी निर्माण होणार हें निःसंशय. राज्य-सरकारांनीं आपलें भाषाविषयक धोरण उदार ठेवलें नाहीं तर ज्या राज्यांत भाषिक अल्पसंख्यांकांचे मोठमोठे गट कायमची वस्ती करून राहिले आहेत तेथें त्यांची कठीण परिस्थिति होण्याचा संभव आहे.

(६३) भाषावार पुनर्रचना केल्यामुळें भाषिक अल्पसंख्यांकांचा प्रश्न विशेष प्रामुख्यानें पुढें येईल. धार्मिक अल्पसंख्याक, वन्य जमाती किंवा अस्पृश्य जाती यासारखे अल्पसंख्यांकांचे जे गट आहेत त्यांचे बाबतींत विशेष नवे प्रश्न पुनर्रचित राज्यांत निर्माण होणार नाहींत. विद्यमान राज्यांत त्यांचे प्रश्न आपणापुढें आहेतच, आणि नवीन पुनर्घटित राज्यांत ते वाढणारहि नाहींत किंवा कमीहि होणार नाहींत. भाषिक अल्पसंख्यांकांचा प्रश्न सध्यां देखील पुष्कळ राज्यांतून आहे; परंतु फरक एवढाच होईल कीं, नवीन राज्यरचनेचा परिणाम म्हणून सर्व लक्ष याच प्रश्नावर केंद्रित होईल. म्हणून भाषिक अल्पसंख्यांकांचे हे प्रश्न कोणते त्याचें थोडें दिग्दर्शन करून ते कशा रीतीनें हाताळले जावेत हेंहि येथें सांगणें इष्ट आहे.

(६४) आपल्या राज्यघटनेच्या ३४७ कलमांत अशी तरतूद आहे कीं, राष्ट्राध्यक्षांची त्या विशिष्ट परिस्थितीबाबत खात्री करून देण्यांत आली तर ते आपल्या अधिकारांत एकादी भाषा त्या राज्यामध्यें सर्वत्र किंवा त्या राज्याच्या विशिष्ट भागांत कारभाराची भाषा म्हणून मानली जावी असा आदेश देऊं शकतात. यामुळें भाषिक अल्पसंख्यांकांना खास संरक्षण मिळत आहे. तथापि राष्ट्राध्यक्षां-कडून याबाबतचे खास अधिकार वापरले जाण्याचा सहसा प्रसंग येऊं नये आणि राज्यसरकारांनींच आपणहून आपल्या अधिकारांत याबद्दल योग्य ती व्यवस्था करणें आवश्यक आहे. राज्यसरकारांच्या अधिकारक्षेत्रांत निर्माण होणारे दोन मुख्य प्रश्न म्हणजे भाषिक अल्पसंख्यांकांना त्यांच्या मातृभाषेंतून शिक्षण मिळण्याची सोय हा एक व दुसरा त्यांच्या भाषेचा राज्यकारभारांत वापर करणें. सध्यांहि कांहीं राज्यांत अशा कांहीं सोयी करण्यांत आल्या असून विशिष्ट संख्येच्या मुलांच्या पालकांनीं आपल्या मुलांना त्यांच्या मातृभाषेंतून शिक्षण मिळावें अशी इच्छा प्रदर्शित केली तर त्यांचेमार्फत त्या विशिष्ट भाषेंतून प्राथमिक शिक्षण देण्याची सोय करण्यांत येते. हेंच तत्त्व पुढें माध्यमिक शिक्षणाच्या क्षेत्रांतहि लागू करतां येण्यासारखें आहे. त्या विशिष्ट भागांत

आपल्या मातृभाषेंतून प्राथमिक शिक्षण मिळावें असें ज्यांना वाटतें त्या भाषिकांच्या लोकसंख्येचें तेथील प्रमाण पाहून किंवा माध्यमिक शिक्षण आपणांस आपल्या मातृभाषेंतून मिळावें अशी इच्छा प्रदर्शित करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या संख्येवरून हें तत्त्व कसें व कोठें लागूं करावयाचें तें ठरवितां येईल. आणि या सोयी वरच्या दर्जाच्या शिक्षणावस्थेंत करावयाच्या झाल्यास त्या मागणारांची संख्याहि प्रत्येक वरच्या अवस्थेंत जास्त जास्त होत गेली पाहिजे. अशा रीतीनें शिक्षणविषयक सोयी करण्यांत आल्यास भाषिक अल्पसंख्याकांच्या सांस्कृतिक व भाषिक विकासाचा सर्वसामान्य प्रश्नहि आपोआप सुटेल. भाषिक अल्पसंख्याकांची पुष्कळ लोकसंख्या ज्या राज्यांतून आहे तेथील राज्यसरकारांनीं शिक्षणाच्या वरच्या अवस्थांतहि वर सांगितल्याप्रमाणें त्यांच्या मातृभाषेद्वारां शिक्षण देण्याची सोय केली तर या शिक्षणविषयक धोरणामुळें साहजिकपणेंच त्यांच्या सांस्कृतिक व साहित्यिक आविष्कारास उत्तेजन मिळेल.

(६५) नंतर दुसरा प्रश्न म्हणजे स्थानिक सरकारच्या कारभारांत भाषिक अल्पसंख्याकांच्या भाषेचा वापर करण्याचा. जेथें भाषिक अल्पसंख्याकांची बरीच वस्ती आहे, उदाहरणार्थ, ज्या ठिकाणीं त्यांची वस्ती एकंदर लोकसंख्येच्या १५ ते २० टक्क्यांपेक्षां अधिक आहे अशा ठिकाणीं स्थानिक कारभारांत त्यांच्या भाषेला मान्यता मिळून तिचा वापर करण्यास परवानगी मिळणें इष्ट आहे. म्हणजे सर्व महत्त्वाच्या नोटीसा, जाहीरनामे वगैरे भाषिक अल्पसंख्याकांच्या भाषांमधूनहि प्रसिद्ध केले जावेत आणि त्यांना आपल्या भाषांतून स्थानिक सरकारशीं पत्रव्यवहार करण्यास अगर स्थानिक सरकारच्या सभा-संमेलनप्रसंगीं आपल्या मातृभाषांतून आपले विचार प्रदर्शित करण्यास परवानगी असावी. सरहद्दीवरील द्विभाषिक टापूंमध्यें मात्र शिक्षणाचे व राज्यकारभाराचे प्रश्न जास्त तीव्र होतील; सरहद्दीवरील द्विभाषिक टापू कोणत्या तरी एका राज्यांत घातला जाणार. तसेंच सीमारेषा तुटक न होतां अखंडित असावी, हें तत्त्वहि अंमलांत आणावें लागणार. आणि या दोन्ही कारणांमुळें भाषिक राज्यांच्या सरहद्दीवरील दोन्ही बाजूच्या कांहीं टापूंत भाषिक अल्पसंख्याकांची बरीच मोठी वस्ती राहणें अपरिहार्य आहे. या अल्पसंख्याकांना न्याय द्यावयाचा तर स्थानिक सरकारी कारभारांत व शिक्षणक्षेत्रांत त्यांच्या भाषेचा वापर करण्याचे खास हक्क त्यांना देण्यांत आले पाहिजेत. स्थानिक

कारभाराचें हें क्षेत्र एकादी म्युनिसिपालिटी, ग्रामपंचायत किंवा एकादें तालुका बोर्डहि असूं शकेल.

(६६) हा प्रश्न सरहद्दीवरील भागांत विशेष तीव्र होणार असला तरी वर जे उपाय सुचविले आहेत त्यांचा वापर राज्याच्या इतर भागांत करण्यांत आल्यास तेथेंहि त्याचा चांगलाच परिणाम होणार आहे. अर्थात् हे वर सांगितलेले उपाय कांहीं नवीन आहेत असें नाहीं. घटनेंत अल्पसंख्याकांच्या संरक्षणाची जी सर्वसाधारण हमी देण्यांत आली आहे तिचेंच हें विशेष स्पष्टीकरण म्हणावें लागेल. तथापि राज्यपुनर्रचनेचा परिणाम म्हणून नव्यानें निर्माण होणाऱ्या भाषिक अल्पसंख्याकांना योग्य तें आश्वासन देण्याचे दृष्टीनें हें विशेष स्पष्टीकरण येथें अवश्य आहे, आणि त्याचा अंतर्भाव अखिल भारतास लागू होणाऱ्या सरकारी नियमांत, हुकुमांत अगर कायद्यांत योग्य रीतीनें केला जाणें जरूर आहे.

भाग दुसरा

भाग दुसरा

मराठी भाषिक प्रदेशाचें राज्य व त्यामुळें निर्माण होणारे प्रश्न

विभाग पहिला

भावी महाराष्ट्र राज्याची अंतर्रचना व साधनसंपत्ति

मराठी–भाषिक समाजाची व प्रदेशाची एकजीवता

(६७) मराठी–भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती असणारा सर्व सलग प्रदेश एकत्र करून त्याचें एक राज्य बनविण्यांत यावें या मागणींत नवीन असें कांहींच नाहीं. आसामी, बंगाली व उडिया भाषिकांनीं ही स्थिति पूर्वीच गांठली आहे. तामीळ व मल्याळी भाषिक आज ज्या राज्यामध्यें राहतात त्यांच्या सरहद्दीमध्यें किरकोळ फेरफार केल्यास ते या स्थितीप्रत पोहोचूं शकतील. आंध्र राज्य निर्माण झाल्यानें तेलगू भाषिकांनीं या दिशेनें पुढचें पाऊल टाकलेंच आहे आणि हैद्राबाद राज्याचें अपरिहार्य विभाजन प्रत्यक्ष घडून आल्यावर तेलगू भाषिकांचा सर्व प्रदेश एका राज्यांत येईल. बल्लारी म्हैसूरला जोडल्यानें कन्नड भाषिकांचीहि थोडी प्रगति झाली असून, बाहेरचे दुसरे लोक कांहींहीं म्हणोत, स्वभाषिक लोकांचे एकच स्वतंत्र राज्य बनविण्यांत यावें अशी तेलगू व कन्नड भाषिकांची एकमुखी मागणी आहे. एक भाषा व एक संस्कृति असणारे लोक आपणहून खुषीनें कधींच निरनिराळ्या स्वतंत्र राज्यघटकांत विभागले गेले नाहींत. दुसऱ्याकडून जिंकले जाऊन ज्यावेळीं ते गुलाम बनले त्यावेळींच त्यांचे याप्रमाणें तुकडे झाले आहेत, किंवा क्वचित् प्रसंगीं आपसांतील तीव्र धार्मिक भेदामुळें ते झाले आहेत. सध्यां मराठीभाषिकांची जी राजकीय फाळणी झाली आहे ती त्यांनीं स्वतः केलेली किंवा त्यांच्या इच्छेमुळें घडून आलेली बिलकूल नाहीं. पूर्वी मोंगलांनीं किंवा ब्रिटिशांनीं

त्यांना जिंकलें त्याचा हा परिणाम असून तीच परिस्थिति पुढें राहू देण्यास कोणतेंहि सबळ कारण दिसत नाहीं.

(६८) सर्व मराठीभाषी प्रदेशांत लोकसमाज ठळकपणें सर्वत्र सारखा व एकजिनसी आहे. तसेंच मराठी प्रदेशांत आढळून येणाऱ्या जाती सर्वत्र सारख्या असून अनेक स्थानिक उपजातींमध्यें त्यांची सहसा विभागणी झालेली नाहीं आणि बहुतेक मोठया जाती सगळीकडे विस्तृत क्षेत्रावर पसरलेल्या आहेत. मराठी प्रदेशांतील ग्रामीण समाज मुख्यतः मराठा किंवा मराठा—कुणबी या जातीचा बनला असून, प्रत्येक मराठीभाषी विभागांतील प्रमुख शेतकरीवर्गहि बहुतेक याच जातीचा आहे. आणि महार समाज सर्व मराठी प्रदेशावर इतका सर्वव्यापी आहे कीं ज्या ज्या ठिकाणीं महार जातीची वस्ती आढळते तो भाग निःशंकपणें मराठी भाषिकांचा मानण्यास हरकत नाहीं असें पुष्कळ वेळां म्हटलें जातें. या प्रदेशांतील कोणताहि एक भाग तेथील विशिष्ट सामाजिक रचनेमुळें अगर विशिष्ट सामाजिक प्रश्नामुळें इतराहून वेगळा दिसतो अशी परिस्थिति नाहीं आणि ज्ञात इतिहासकालापासून तो असाच असल्याचें दिसून येतें. मराठी साहित्यिक व सांस्कृतिक परंपरा तसेंच मराठी सामाजिक व धार्मिक तत्त्वज्ञान—विचार किंवा मराठी सामाजिक अगर धार्मिक चळवळी सध्यांच्या सर्व मराठीभाषिक प्रदेशांत सामान्यपणें एकाचवेळीं प्रसार पावल्याचें दिसून येतें. या प्रदेशांतील लोकसमाजांत अशी कोणतींच वांशिक, सामाजिक, सांस्कृतिक अगर राजकीय भिन्न लक्षणें नाहींत कीं ज्यांमुळें या मराठीभाषिक प्रदेशाचे आणखी राजकीय विभाग करणें जरूर वाटावें. या प्रदेशांतील लोकांच्या आर्थिक जीवनांतहि बरीच समानता आहे. मराठी प्रदेशाच्या बऱ्याच मोठया भागांत कापूस, ज्वारी, भुईमूग हा शेती-उत्पादन प्रकार प्रभावी असल्याचें दिसून येतें. आणि भांडवल पुरवठा व व्यापार या क्षेत्रांतील आपल्या प्रभावी सामर्थ्यामुळें मुंबई शहर, या सर्व मराठीभाषिक प्रदेशाला एकजीव करण्याचें कार्य करतें.

भौगोलिक रचना

(६९) भूगोलावरील महाराष्ट्र राज्याचें स्थान भारतीय संघराज्यांत १५ आणि २२ या उत्तराक्षांशांचे दरम्यान व ७२॥ आणि ८२ रेखांशांचे दरम्यान राहील. त्याचें पूर्व-पश्चिम जास्तींत जास्त अंतर अंदाजें ६०० मैल व दक्षिणोत्तर अंतर जास्तींत जास्त ४०० मैल होईल.

(७०) मराठीभाषिक प्रदेशाच्या नैसर्गिक सीमा कांहीं बाजूंनीं अगदीं स्पष्ट व रेखीव आहेत. पश्चिमेस अरबी समुद्र आहे. उत्तरेस सातपुड्याच्या रांगा आहेत आणि या रांगाच मुख्यतः मराठीभाषिकांचा प्रदेश हिंदी भाषिकांपासून वेगळा करतात. महानदीच्या खोऱ्यापासून वैनगंगेचे खोरें वेगळें करणारा पाणलोटाचा प्रदेश मराठी-भाषिक प्रदेशाची पूर्वेकडील सीमा दर्शवितो. वायव्येस गुजरातच्या मैदानांत तापी शिरते तेथपर्यंतचा सह्याद्रीचा जंगलमय भाग मराठी भाषिकांचा प्रदेश गुजरातपासून वेगळा करतो.

(७१) नद्यांच्या खोऱ्यानुसार विचार केला तर या प्रदेशाचे मुख्य तीन भाग पडतात. अगदीं उत्तरेकडील भाग म्हणजे तापीचें खोरें व तापीस मिळणाऱ्या पूर्णा नदीचें खोरें यांचा. पूर्णा-तापी खोऱ्यांच्या मिळून होणाऱ्या प्रदेशांत खानदेश-वऱ्हाडचा बहुतेक भाग समाविष्ट होतो. नंतर दक्षिणेकडील भाग जरा गुंतागुंतीचा असून, तो गोदावरी नदीच्या आंवतींभोंवती एकत्रित झालेला आहे. मध्य गोदावरी खोऱ्यांत मुंबई राज्यांतील नाशिक व अहमदनगर जिल्ह्यांचा मोठा भाग आणि हैद्राबाद राज्यांतील मराठवाड्याचा मोठा भाग समाविष्ट होतो. गोदावरीला मिळणाऱ्या व मराठवाड्यांतून उगम पावणाऱ्या दोन नद्या म्हणजे उत्तरेकडील पेनगंगा व दक्षिणेकडील मांजरा यांचीं खोरीं मध्य गोदावरी खोऱ्याचीं पूरक होतात. पेनगंगेला पुन्हां वर्धा व वैनगंगा या नद्या मिळत असल्यामुळें व पेनगंगा अखेर गोदावरीला मिळत असल्यामुळें पेनगंगा खोरें बरेंच विस्तृत होतें. वर्धा व वैनगंगा खोऱ्यांत मध्यप्रदेशाच्या नागपूर विभागांतील जिल्ह्यांचा बहुतेक प्रदेश येतो. अशा रीतीनें महाराष्ट्रांतील गोदावरी खोऱ्यांत मुंबई राज्याचा कांहीं भाग, सर्व मराठवाडा व नागपूर विभाग एवढ्या प्रदेशाचा अंतर्भाव होतो, आणि हा सर्व प्रदेश उत्तरेकडील तापी खोऱ्यांत समाविष्ट होणाऱ्या प्रदेशाहून अगदीं वेगळा आहे. खालीं आणखी दक्षिणेकडे गेल्यावर भीमा व कृष्णा नद्या येतात आणि त्या महाराष्ट्राच्या सरहद्दीपलीकडे एकमेकीस मिळतात. भीमा नदीच्या एकंदर प्रवाहाचा बराच मोठा भाग महाराष्ट्रांतून जातो. परंतु कृष्णेचा सुरवातीचा शें-दीडशें मैलांचा प्रवाह तेवढा महाराष्ट्रांतून वाहतो. पश्चिमेकडील समुद्रकिनाऱ्याच्या पट्टीचा कोंकण, हा अगदीं स्वतंत्र भौगोलिक लक्षणांचा प्रदेश असून या भागांतील पाणी व इतर नैसर्गिक साधनसंपत्ति कशी उपयोगांत आणावयाची हा खास

कोंकणचा असा प्रश्न आहे. तथापि जलविद्युतयोजनांमुळें घाटाखालील प्रदेशाचा घाटावरील प्रदेशांशीं जिव्हाळ्याचा संबंध येतो. म्हणून आज निरनिराळ्या राज्य-घटकांत विभागला गेलेला मराठीभाषिकांचा एकंदर प्रदेश निसर्गतः एकजीव आहे, हें वरील वर्णनावरून कळून येण्यासारखें आहे.

महाराष्ट्र राज्याचा क्षेत्रविस्तार व लोकसंख्या

(७२) मुंबई, हैद्राबाद व मध्यप्रदेश या तीन राज्यांतील खालीलप्रमाणें भाग घेऊन महाराष्ट्राचा क्षेत्रविस्तार व लोकसंख्या पुढीलप्रमाणें होईल:—

(अ) मुंबई राज्यांतून—

(१) पूर्व खानदेश (२) पश्चिम खानदेश (३) नाशिक (४) अहमदनगर (५) सोलपूर (६) पुणें (७) उत्तर सातारा (८) दक्षिण सातारा (९) कोल्हापूर (१०) रत्नागिरी (११) कुलाबा (१२) ठाणें (१३) डांग हे संपूर्ण मराठी जिल्हे व (१४) बृहन्मुंबई. एवढा सध्यांच्या मुंबई राज्याचा भाग नवीन होणाऱ्या महाराष्ट्र राज्यांत जाईल. इ. स. १९५१ च्या शिरगणतीप्रमाणें या भागाचें क्षेत्र व लोकसंख्या खालीलप्रमाणें:—

क्षेत्र (चौरस मैल)	५६५४३·२
लोकसंख्या	१९३४३१०२

यांतील मराठी-भाषिकांची लोकसंख्या १५११३५३० म्हणजे एकंदर लोकसंख्येच्या ७८ टक्के आहे. वर दिलेल्या जिल्ह्यांखेरीज बेळगांव, कारवार व सुरत जिल्ह्यांत मराठी व कोंकणी भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती असलेले कांहीं संपूर्ण तालुके व कांहीं तालुक्यांतून मराठी व कोंकणी भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती असणारीं कांहीं गांवें आहेत. बेळगांव जिल्ह्यांतील संपूर्ण चंदगड तालुका व कारवार जिल्ह्यांतील संपूर्ण सुपा तालुका हे प्रामुख्यानें मराठी व कोंकणी भाषिकांची वस्ती असलेले आहेत. तसेंच बेळगांव जिल्ह्यांतील खानापूर, चिकोडी व बेळगांव या तालुक्यांच्या बऱ्याच मोठ्या भागांत मराठी भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती आहे आणि कारवार जिल्ह्यांतील कारवार व हल्याळ तालुक्यांच्या बऱ्याच मोठ्या भागांतून कोंकणी भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती आहे. तसेंच बेळगांव जिल्ह्यांतील अथणी, रायबाग व हुकेरी तालुक्यांच्या कांहीं गांवांतून, धारवाड जिल्ह्यांतील धारवाड तालुक्याच्या कांहीं गांवांतून व विजापूर जिल्ह्यांतील विजापूर तालुक्याचा कांहीं गांवांतून मराठीभाषिकांची

प्रामुख्यानें वस्ती आहे आणि कारवार जिल्ह्यांतील यल्लापूर व अंकोला तालुक्याच्या कांहीं गांवांतून कोंकणी व मराठी भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती आहे. त्याचप्रमाणें सुरत जिल्ह्यांतील बांसदा व धरमपूर तालुक्यांचा बराच मोठा भाग व सोनगड—व्यारा तालुक्यांतील कांहीं गांवें मराठीभाषिक आदिवासींची प्रामुख्यानें वस्ती असणारीं आहेत. ज्यावेळीं सरहद्द कमिशनकडून राज्यांच्या सीमा निश्चितपणें ठरविल्या जातील त्यावेळीं वर सांगितलेला बेळगांव, कारवार, धारवाड, विजापूर व सुरत या जिल्ह्यांचा मराठी जिल्ह्यांशीं सलग असलेला सर्व भाग नवीन महाराष्ट्र राज्यांत समाविष्ट होईल. तसेंच सरहद्दी ठरवितांना दक्षिण सातारा जिल्ह्याच्या जत तालुक्यांतील कांहीं गांवें, आणि सोलापूर जिल्ह्याच्या अक्कलकोट व दक्षिण सोलापूर तालुक्यांतील कांहीं गांवें, कानडी भाषिकांची तेथें प्रामुख्यानें वस्ती असल्यामुळें व तो भाग कर्नाटकाशीं सलग असल्यामुळें कर्नाटक राज्यांत जाण्याचा संभव आहे. मराठी जिल्ह्यांतून बाहेर दुसऱ्या राज्यांत जाणाऱ्या भागाचें क्षेत्र व लोकसंख्या वजा करून सरहद्दीवरच्या जिल्ह्यांतील जो मराठीभाषिक भाग महाराष्ट्रांत समाविष्ट होईल त्याचें एकंदर क्षेत्र अंदाजें २६६० चौरस मैल व लोकसंख्या अंदाजें ८,३०,००० होईल. अशा रीतीनें मुंबई राज्यांतून महाराष्ट्र राज्यांत जी लोकसंख्या व क्षेत्र जाईल तें पुढीलप्रमाणेः—

	क्षेत्र (चौरस मैल)	लोकसंख्या
मराठी जिल्हे व बृहन्मुंबई	५६५४३	१९३४३१०२
सरहद्दीवरील भाग	२६६०	८३०.०००

(ब) मध्यप्रदेशांतून—

सध्यांच्या मध्यप्रदेश राज्यांतून (१) नागपूर, (२) भंडारा, (३) चांदा, (४) वर्धा, (५) अमरावती, (६) अकोला, (७) यवतमाळ व (८) बुलढाणा हे मराठी जिल्हे नव्या महाराष्ट्र राज्यांत जातील. १९५१ च्या शिरगणतीप्रमाणें या जिल्ह्यांचें क्षेत्र व लोकसंख्या पुढीलप्रमाणें—

क्षेत्र (चौरस मैल)	३६८८०
लोकसंख्या	७६०७०३८

यामध्यें मराठी भाषिक ५७२७५२४ म्हणजे एकूण लोकसंख्येच्या ७५ टक्के आहेत.

या जिल्ह्यांखेरीज बालाघाट, छिंदवाडा, बेतुल व निमाड जिल्ह्यांतील कांहीं तहसिली पूर्णपणें मराठी–भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती असणाऱ्या असून इतर तहसिलींत मराठी भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती असणारीं बरींच गांवें आहेत. छिंदवाडा जिल्ह्याच्या सौंसर तहसिलींत व बेतुल जिल्ह्यांतील भैंसदेही तहसिलींत तेथील एकुण लोकसंख्येच्या ५० टक्के वस्ती मराठीभाषिकांची आहे तर निमाड जिल्ह्याच्या बऱ्हाणपूर तहसिलींत ४० हून अधिक टक्के लोकवस्ती मराठी भाषिकांची आहे. बालाघाट जिल्ह्याच्या वाराशिवणी, बालाघाट व बैहार तहसिलींतून व बेतुल जिल्ह्याच्या मुलताई तहसिलींत मराठीभाषिकांची वस्ती ३० ते ४० टक्क्यांच्या दरम्यान आहे. आणि हे सर्व भाग मध्यप्रदेशांतील मराठी जिल्ह्यांशीं सलग आहेत. सरहद्द कमिशनच्या निर्णयानंतर हे भाग महाराष्ट्रांत समाविष्ट केले जाणें संभवनीय आहे. त्याचप्रमाणें सरहद्द कमिशनच्या निर्णयानंतर चांदा जिल्ह्यांतील सिरोंचा तहसिलींचा तेलगू–भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती असलेला व शेजारच्या तेलगू जिल्ह्यांशीं सलग असणारा बराच भाग आंध्र राज्यांत समाविष्ट केला जाण्याचा संभव आहे. मराठी जिल्ह्यांतून बाहेर दुसऱ्या राज्यांत जाणाऱ्या या प्रदेशांचें क्षेत्र व लोकसंख्या वजा जातां सरहद्दीवरच्या जिल्ह्यांतील जो सलग मराठीभाषी भाग महाराष्ट्रांत समाविष्ट होईल त्याचें क्षेत्र अंदाजें २८०० चौरस मैल व लोकसंख्या अंदाजें ५००००० होईल. अशा रीतीनें सध्यांच्या मध्यप्रदेश राज्यांतून नव्या महाराष्ट्र राज्यांत जी लोकसंख्या व क्षेत्र जाईल तें पुढीलप्रमाणें—

	क्षेत्र (चौरस मैल)	लोकसंख्या
मराठी जिल्हे	३६८८०	७६०७०३८
सरहद्दीवरील भाग	२८००	५०००००

(क) हैद्राबाद राज्यांतून—

सध्यां हैद्राबाद राज्यांत औरंगाबाद, परभणी, नांदेड, बीड, उस्मानाबाद हे संपूर्ण मराठी जिल्हे आहेत. या जिल्ह्यांखेरीज बिदर आणि अदिलाबाद जिल्ह्यांतून कांहीं तालुके पूर्णपणें मराठी भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती असणारे आहेत. १९५१ च्या शिरगणतीप्रमाणें हैद्राबादच्या पांच मराठी जिल्ह्यांचें क्षेत्र व लोकसंख्या पुढीलप्रमाणें—

क्षेत्र (चौरस मैल)	२३०६१
लोकसंख्या	४७७३७०२

यामध्यें मराठी भाषिकांची लोकसंख्या ३७५६६१३ म्हणजे एकूण लोकसंख्येचा ७८·६ टक्के आहे.

निलंगा, अहमदपूर व उदगीर या बिदर जिल्ह्यांतील तहसिली पूर्णपणें मराठी भाषिकांची बहुसंख्या असलेल्या आहेत व भावी महाराष्ट्र राज्यांत समाविष्ट केल्या जाणें संभवनीय आहे. तसेंच अदिलाबाद जिल्ह्यांतील किनावत, राजुरा व उतनूर या तहसिलींतहि मराठी भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती असल्यामुळें त्याहि महाराष्ट्रांत समाविष्ट केल्या जातील. याखेरीज बिदर जिल्ह्याच्या भाल्की, संतपूर, औराड व हुमणाबाद या तहसिलींत मराठी भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती असणारीं बरींच गांवें आहेत. तसेंच अदिलाबाद जिल्ह्याच्या बोथ, अदिलाबाद, असिफाबाद व शिरपूर तहसिलींतील कांहीं भाग आणि गुलबर्गा जिल्ह्यांतील आळंद तालुक्याचा कांहीं भाग यामध्येंहि मराठी भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती आहे. हे सर्व भाग मराठी जिल्ह्याशीं सलग असून सरहद्द कमिशनच्या निर्णयानंतर महाराष्ट्रांत समाविष्ट होतील. त्याचप्रमाणें नांदेड जिल्ह्यांतील मुधोळ आणि देगलूर तालुक्यांतील कांहीं भागांत तेलगू भाषिकांची बहुसंख्येनें वस्ती असल्यामुळें व तेलगू जिल्ह्यांशीं तो सलग असल्यामुळें सरहद्द कमिशनच्या निर्णयानें तो शेजारच्या आंध्र राज्यांत समाविष्ट केला जाण्याचा संभव आहे. मराठी जिल्ह्यांतून बाहेर दुसऱ्या राज्यांत जाणारें हें क्षेत्र व लोकसंख्या वजा जातां सरहद्दीवरील जिल्ह्यांचा मराठी जिल्ह्यांशीं सलग असणारा जो भाग भावी महाराष्ट्र राज्यांत समाविष्ट होईल त्याचें क्षेत्र अंदाजें ५१०० चौ. मैल व लोकसंख्या अंदाजें ७३५००० होईल. अशा रीतीनें सध्यांच्या हैद्राबाद राज्यांतून भावी महाराष्ट्र राज्यांत जें क्षेत्र व लोकसंख्या जाईल तीं पुढीलप्रमाणें:—

	क्षेत्र (चौरस मैल)	लोकसंख्या
पांच मराठी जिल्हे	२३०६१	४७७३७०२
सरहद्दीवरील भाग	५१००	७३५०००

(७३) याप्रमाणें भावी महाराष्ट्र राज्याची लोकसंख्या व क्षेत्र अंदाजें पुढीलप्रमाणें होईल.—

	क्षेत्र (चौरस मैल) (हजार)	लोकसंख्या (हजार)
(अ) मुंबई राज्यांतून	५९	२०१७३
(ब) मध्यप्रदेशांतून	४०	८१०७
(क) हैद्राबाद राज्यांतून	२८	५५०९
एकूण—महाराष्ट्र	१२७	३३७८९

विद्यमान राज्यांशीं तुलना

(७४) तुलनेसाठीं भारतीय संघराज्यांतील सध्यांच्या 'अ' व 'ब' विभागीय राज्यांचें १९५१ च्या शिरगणतीप्रमाणें क्षेत्रफळ व लोकसंख्या पुढें दिलीं आहेत—

'अ' विभागीय राज्यें

राज्य	क्षेत्रफळ	लोकसंख्या
उत्तर प्रदेश	१,१३,४०९	६,३२,१५,७४२
बिहार	७०,३३०	४,०२,२५,९४७
ओरिसा	६०,१३६	१,४६,४५,९४६
पश्चिम बंगाल	३०,७७५	२,४८,१०,३०८
आसाम	८५,०१२	९०,४३,७०७
आंध्र	६३,६०७	२,०५,०७,८०१
मद्रास	६०,३६२	३,५७,३४,४८९
मुंबई	१,११,४३४	३,५९,५६,१५०
मध्यप्रदेश	१,३०,२७५	२,१२,४७,५३३
पंजाब	३७,३७८	१,२६,४१,२०५

'ब' विभागीय राज्यें

म्हैसूर	२९,४८९	९०,७४,९७२
त्रावण-कोचीन	९,१४४	९२,८०,४२५
सौराष्ट्र	२१,४५१	४१,३७,३५९
मध्यभारत	४६,४७८	७९,५४,१५४
हैद्राबाद	८२,१६८	१,८६,५५,१०८
राजस्थान	१,३०,२०७	१,५२,९०,७९७
पेप्सू	१०,०७८	३४,९३,६८५
काश्मीर	९२,७८०	४४,१०,०००
अंदमान-निकोबार	३,२१६	३०,९७१

वर दिलेल्या निरनिराळ्या राज्यांच्या क्षेत्रांशीं व लोकसंख्येशीं महाराष्ट्राच्या संभाव्य क्षेत्राची व लोकसंख्येची तुलना केली असतां महाराष्ट्र राज्य फार मोठें होणार नाहीं व फार लहानहि होणार नाहीं असें आपण खात्रीनें म्हणू शकतों. ढोबळमानानें तें सध्यांच्या मुंबई राज्याएवढें होईल.

महाराष्ट्राची नैसर्गिक साधनसंपत्ति

(७५) महाराष्ट्रांतील पर्जन्य व नद्यांचें पाणी वाया न जाऊं देतां पाटबंधाऱ्यांच्याद्वारा शेतीस पुरविलें गेलें तर महाराष्ट्रांतील शेतीची कितीतरी वाढ होणें शक्य आहे. मुळा, कुकडी, गिरणा, वीर, खडकवासला, पूर्णा (मराठवाडा), पूर्णा (वऱ्हाड), वर्धा, पैनगंगा व वैनगंगा या पाटबंधाऱ्यांच्या योजनांबाबत महाराष्ट्रांत आज जोराची मागणी होत आहे. पावसाचें वाया जाणारें अमाप पाणी या नद्यांवरील धरणयोजनांनीं अडवून सांठवितां येईल व त्याचा उपयोग शेतीसाठीं करतां येईल विद्युतनिर्मितीच्या दृष्टीनें निसर्गाचे महाराष्ट्रावर फार उपकार आहेत. घाटांत पडणाऱ्या अमाप पावसाच्या पाण्याचा जलविद्युत्‌निर्मितीसाठीं आजच्यापेक्षां कितीतरी मोठ्या प्रमाणावर उपयोग करून घेतां येईल. पश्चिम घाटांतील अनेक जलविद्युत्‌-योजनांमुळें प्रचंड विद्युतशक्ति निर्माण होऊं शकेल आणि महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासास त्यामुळें केवढी मोठी मदत होईल. यवतमाळ जिल्ह्यांतील पैनगंगा योजना व त्यासारख्या वऱ्हाड–नागपूरकडील आणखी इतर योजना पुऱ्या झाल्यास महाराष्ट्राच्या पूर्वभागासहि त्यामुळें विजेचा बराच मोठा पुरवठा होईल. शेतीस पाणीपुरवठा करण्यासाठीं नद्यांवरील धरणयोजना, व त्याचे जोडीला ग्रिड पद्धतीनें विद्युत्‌निर्मितीयोजनाहि सुरू झाल्यास महाराष्ट्रांतील शेतीची व उद्योगधंद्याची खूप वाढ होणें शक्य आहे. खनिज संपत्तीच्या दृष्टीनें महाराष्ट्र विशेष संपन्न नसला तरी महाराष्ट्राच्या भूगर्भाची पाहणी केली असतां आढळून आलें आहे कीं महाराष्ट्राच्या कांहीं भागांत बरीच अनुत्खनित खनिज संपत्ति आहे. भंडारा, नागपूर, बालघाट व छिंदवाडा या जिल्ह्यांमध्यें, तसेंच कारवार जिल्ह्याच्या कांहीं भागांत मँगॅनीज बऱ्याच मोठ्या प्रमाणावर सांपडतें. रत्नागिरी जिल्ह्याच्या कांहीं भागांतहि मँगॅनीज सांपडतें. सातारा जिल्ह्याच्या पश्चिम भागांत कांहीं ठिकाणीं लोखंड सांपडतें. बेळगांव, कोल्हापूर व ठाणें जिल्ह्यांत बॉक्साईट (अल्युमिनियम) बऱ्याच मोठ्या प्रमाणावर सांपडतें व चांदा, अदिलाबाद, छिंदवाडा व यवतमाळ

या जिल्ह्यांत दगडी कोळसा सांपडतो. सध्यां चांदा व अदिलाबाद जिल्ह्यांतून कोळशाच्या खाणी चालू आहेतच. विद्युतशक्तीचा जवळपासच्या भागांतून पुरवठा झाल्यास कोल्हापूर व बेळगांवकडील भागांत अल्युमिनियमचे कारखाने काढणें शक्य आहे. रत्नागिरी जिल्ह्यांत समुद्रकांठच्या वाळूंत टिटॅनियम सांपडतें. तसेंच रत्नागिरी जिल्ह्याच्या दक्षिण भागांत क्रोमाईटहि सांपडतें. खनिज संपत्तीच्या दृष्टीनें वऱ्हाड-नागपूरचे जिल्हे अधिक संपन्न आहेत. महाराष्ट्रांतील खनिज संपत्ति तेथील स्वस्त व मुबलक मिळणाऱ्या विजेच्या सहाय्यानें उपयोगांत आणल्यास महाराष्ट्राचा औद्योगिक विकास पुढें नेतां येईल.

आयव्यय-साधनें

(७६) मुंबई, मध्यप्रदेश व हैद्राबाद या राज्यांतील जे मराठी जिल्हे भावी महाराष्ट्र राज्यांत समाविष्ट केले जाणार त्यांच्या सरकारी उत्पन्नाचे व खर्चाचे आंकडे त्या त्या राज्यसरकाराकडून जी माहिती मिळाली तिच्या आधारें पुढें दिले आहेत. सध्यां जें उत्पन्न येतें त्याचे हे आंकडे आहेत आणि पुनर्रचनेनंतर या जिल्ह्यांचें हेंच उत्पन्नमान राहील असें म्हणतां येत नाहीं, हें मागें सांगितलेंच आहे. पुष्कळ बाबतींत, उदाहरणार्थ रजिस्ट्रेशन, मोटार व्हेइकल कर, विक्री कर यासारख्या करांचे बाबतींत, त्यांचें उत्पन्न, करवसुलीचें ठिकाण, त्या विवक्षित करासंबंधींच्या कायद्याचें एकंदर स्वरूप, त्याबाबतची कारभारसंघटना व राज्यांतील एकंदर व्यापारउदीम यावर अवलंबून असतें. राज्याच्या सरहद्दींची पुनर्रचना झाल्यामुळें किंवा करपद्धतींत बदल झाल्यामुळें करवसूलीचीं ठिकाणें किंवा निरनिराळ्या ठिकाणीं वसूल होणाऱ्या करांच्या उत्पन्नाचें मान यामध्यें बराच फरक होत असतो. विशेषतः मुंबई शहरासारखीं जीं राजधानीचीं ठिकाणें व प्रचंड व्यापाराचीं केंद्रें आहेत त्यांचे बाबतींत वरील सिद्धांत विशेष लागू पडतो. म्हणून आज मुंबई शहरांत जेवढी उत्पन्नवसुली होते तेवढी राज्यपुनर्रचना झाल्यानंतरहि होत राहील व मुंबई राज्यांतील निरनिराळ्या भागांचें उत्पन्नहि आजच्याप्रमाणें तेथेंच वसूल होत राहील असें म्हणतां येत नाहीं, तसेंच तेथें वसूल होणाऱ्या उत्पन्नाचा कांहीं भाग बाजूच्या प्रदेशांच्या संभाव्य उत्पन्नांत मिळवितां येणार नाहीं, असेंहि म्हणतां येत नाहीं.

(७७) राज्यांच्या उत्पन्नाचा विचार करतांना किंवा नवीन राज्यांच्या एकूण उत्पन्नाच्या बाबी किती असूं शकतील याचा विचार करतांना, भावी कालांत मध्यवर्ती बाबींच्या उत्पन्नाची वांटणी कशी होईल, प्राप्ती कराचें उत्पन्न व मदत म्हणून दिली जाणारी रक्कम कशारीतीनें वाटलीं जातील याकडे लक्ष देणें जरूर आहे. याबाबत १९५२ च्या फायनान्स कमिशननें आपल्या अहवालांत जीं तत्त्वें ग्रथित केलीं आहेत किंवा जीं दिशा सूचित केली आहे ती विशेषतः लक्षांत घेणें जरूर आहे. मुंबईसारख्या राज्यांची एक मोठी तक्रार म्हणजे त्या राज्यांत वसूल होणाऱ्या प्राप्तीकराचे उत्पन्नाबाबत, विशेषत: मुंबई शहरांतील प्राप्तीकराचे उत्पन्नाबाबत होय. प्राप्तीवरील कर कोणत्या ठिकाणीं वसूल होतो या मुद्याला फायनान्स कमिशननें आपल्या शिफारसींत फारसें महत्त्व दिलेलें नाहीं. प्राप्ती-कराच्या उत्पन्नाची, योग्य वांटणी करण्याचे दृष्टीनें त्यांनीं पुढील तत्त्वें ग्रथित केलीं आहेत—(१) त्या त्या राज्यांतील लोकसंख्येवरून त्या राज्याच्या गरजांचें मोजमाप करणें. (२) त्या राज्यांतून मिळणारें प्राप्तिकराचें उत्पन्न. राज्यांतून मिळणारें प्राप्तीकराचें उत्पन्न म्हणजे केवळ त्या राज्यांतील महसूलवसुलीच्या ठिकाणीं गोळा झालेलें या कराचें उत्पन्न एवढा संकुचित अर्थ त्यांना अभिप्रेत नाहीं. याबाबत त्यांचेच शब्द उद्धृत करावयाचे झाल्यास, "(उत्पन्न) वांटणीच्या योजनेचा विचार करतांना तें उत्पन्न कोठून मिळालें या गोष्टीला अगदीं माफक महत्त्व देणें हेंच आमच्या मतें पूर्णपणें न्याय्य आहे. याबाबत एक गोष्ट लक्षांत ठेवणें अवश्य आहे तो ही कीं, ज्यांना स्थानिक म्हणून मानतां येतील अशीं, विशेषत: वैयक्तिक व लहान धंद्यांतील उत्पन्नाच्या कक्षेंत येणारीं, अनेक प्रकारचीं उत्पन्नें आज देशामध्यें सर्वत्र आहेत." यावरून फायनान्स कमिशननें त्या राज्यांतून मिळणारें प्राप्ती-कराचें उत्पन्न याचा अर्थ मोठमोठे औद्योगिक अगर व्यापारी संघ (कॉर्पोरेशन्स), संचालक मंडळ्या आणि मोठा व्यापार यांच्यावरील प्राप्तीकराचें उत्पन्न, ज्यामुळें मुख्यत: मुंबईतून मिळणारें प्राप्तीकराचें एकंदर उत्पन्न एवढें फुगतें, असा न घेतां त्या राज्यांमधील विशेषतः लहान धंद्यांतील उत्पन्न व वैयक्तिक उत्पन्न यावर होणारी करवसुली हीच त्यांना अभिप्रेत आहे असें दिसून येतें. यामुळें मुंबई शहरासारख्या एकाद्या विशिष्ट भागाचा प्राप्तीकरांतील हिस्सा अगदीं नव्या रीतीनें

ठरतो. आतापर्यंत ज्या पद्धतीनें हिशेब करीत असत त्यापेक्षां अगदीं वेगळ्या रीतीनें हा प्राप्तीकरांतील वांटा ठरवावा लागेल.

(७८) फायनान्स कमिशननें पुरस्कारिलेलें आणखी दुसरें धोरण म्हणजे निरनिराळ्या घटक राज्यांच्या खर्चाच्या गरजा व त्यांना मिळणारें कराचें उत्पन्न यांचें सर्वसाधारण मोजमाप करून, केंद्रसरकारकडून आर्थिक मदतीच्या रूपानें अगर अन्य मार्गानें प्रत्येकाची आयव्ययशक्ति शक्य तेवढी सम करण्यांत यावी, हें होय. केंद्राकडून दिल्या जाणाऱ्या मदतीचें (ग्रँट–इन्–एड) वांटप करण्याबाबत फायनान्स कमिशननें जी तत्त्वप्रणाली स्वीकारली आहे त्यामध्यें जमाखर्चाची तोंडमिळवणी करण्यासाठीं भासणारी गरज, कर-आकारणी करून उत्पन्न मिळविण्याचा केलेला प्रयत्न, खर्चांतील काटकसर, समाजोपयोगी सेवाकार्याचा दर्जा, सोपविण्यांत आलेल्या विशेष जबाबदाऱ्या आणि राष्ट्रीय महत्त्वाच्या कांहीं ठळक गोष्टी यांचा प्रामुख्यानें अंतर्भाव होतो व मदत वांटतांना या बाबींचा प्रामुख्यानें विचार होणें जरूर आहे असें कमिशनचें मत आहे. ज्या बाबींची यादी वर दिली आहे त्यावरून हें स्पष्ट आहे कीं त्या राज्यानें करआकारणी करून उत्पन्न वाढविण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला आहे, स्वतःच्या खर्चांत योग्य ती काटकसर केली आहे, मग इतकें करूनहि गरज भासल्यास संकलित उत्पन्नाची (मध्यवर्ती सरकारकडे जमा झालेल्या) फेरवांटणी मागण्याचा त्याला हक्क आहे. आपली गरज भागविण्यासाठीं मध्यवर्ती निधींतून त्याला जादा मदत मिळू शकेल. त्याच्या उलट कोणत्याहि कारणांमुळें कां होईना ज्या राज्याचें उत्पन्न अतिशय फुगलेलें आहे त्याला यापुढें तेवढें तें ठेवतां येणार नाहीं, त्यासाठीं त्याचा प्राप्तीकराचा हिस्सा व इतर उत्पन्न वांटणीमध्यें कमी केलें जाईल, आणि हे बदल दर ५ वर्षांनीं करण्याचा अधिकार फायनान्स कमिशनला राज्यघटनेनेंच दिलेला आहे.

(७९) महाराष्ट्र राज्यांत ज्या प्रदेशांचा समावेश होणार आहे त्या प्रदेशांच्या सरकारी जमाखर्चाचे संकलित आंकडे पुढें देण्यांत येत आहेत व त्यावर थोडें स्पष्टीकरणात्मक विवेचनहि केलें आहे.

मुंबई राज्यांतील १३ मराठी जिल्ह्यांचें व मुंबई शहराचें सरकारी उत्पन्न व खर्च

[आंकडे हजारीं]

उत्पन्न

	१९५०–५१	१९५१–५२	१९५२–५३	एकूण	सरासरी
मराठी जिल्हे	१६५१२५	१७९१४१	१७८३६८	५२२६३४	१७४२११·३३
मुंबई	२१७९४७	२०५६७६	१९४९५०	६१८५७३	२०६१९१·००
एकूण	३८३०७२	३८४८१७	३७३३१८	११४१२०७	३८०४०२·३३

समाईक उत्पन्न

	१९५०–५१	१९५१–५२	१९५२–५३	एकूण	सरासरी
* मुंबई शहरासह मराठी जिल्ह्यांचा वांटा	१३८५७	१४८७६	११११५	३९८४८	१३२८२·६७
एकूण जमा	३९६९२९	३९९६९३	३८४४३३	११८१०५५	३९३६८५·००

सर्वसाधारण खर्च

	१९५०–५१	१९५१–५२	१९५२–५३	एकूण	सरासरी
मराठी जिल्हे	२१९८३१	२२०७०४	२४३६९०	६८४२२५	२२८०७५·००
मुंबई	८८२९७	७६५८८	७२१२५	२३७०१०	७९००३·३३
एकूण	३०८१२८	२९७२९२	३१५८१५	९२१२३५	३०७०७८·३३

समाईक सर्वसाधारण खर्च

	१९५०–५१	१९५१–५२	१९५२–५३	एकूण	सरासरी
*मुंबई शहरासह मराठी जिल्ह्यांचा वांटा	३९९०३	४३८८९	४४८९५	१२८६८७	४२८९५·६७
एकूण	३४८०३१	३४११८१	३६०७१०	१०४९९२२	३४९९७४·००

भांडवली खर्च

मराठी जिल्हे	३०२४४	४५५७०	३४००५	१०९८१९	३६६०६·३३
मुंबई	१२५२०	१०७०५	–६४८३	१६७४२	५५८०·६७
एकूण	४२७६४	५६२७५	२७५२२	१२६५६१	४२१८७·००

समाईक भांडवली खर्च

*मुंबई शहरासह मराठी जिल्ह्यांचा वांटा	१०५८७	११०३	१०८०८	२२४९८	७४९९·३३
एकूण	५३३५१	५७३७८	३८३३०	१४९०५९	४९६८६·३३
एकूण खर्च	४०१३८२	३९८५५९	३९९०४०	११९८९८१	३९९६६०·३३

* समाईक उत्पन्न व खर्चाची वांटणी लोकसंख्येच्या प्रमाणांत केली आहे.

मध्यप्रदेशांतील ८ मराठी जिल्ह्यांचें सरकारी उत्पन्न व खर्च

[आंकडे लक्ष रुपयांत]

उत्पन्न

	१९५०–५१	१९५१–५२	१९५२–५३	एकूण	सरासरी
मराठी जिल्हे	७५९	७९४	९६०	२६१३	८७१·००

सर्वसाधारण खर्च (भांडवली खर्चासह) *

मराठी जिल्हे	७४३	७५८	६६७	२१६८	७२२·६७

विकास योजनांवरील खर्च (भांडवली खर्चासह) *

मराठी जिल्हे	१४२	१४०	१७२	४५४	१५१·३३
एकूण खर्च	८८५	८९८	८३९	२६२२	८७४·००

व्यवस्था खर्च *

[आंकडे हजारीं]

मराठी जिल्हे	४५५८	४३५८	४७४६	१३६६२	४५५४·००

* यांत अंतर्भूत असलेल्या व्यवस्था (ओव्हरहेड) खर्चाची वांटणी लोकसंख्येच्या प्रमाणांत केली आहे.

मराठवाड्याचें सरकारी उत्पन्न व खर्च

(१९५१–५२ मधील प्रत्यक्ष जमाखर्चावरून)

मराठवाड्याच्या पांच जिल्ह्यांचें उत्पन्न, जमेच्या बाबी क्रमांक ७ ते १३ व इतर बाबी याखालीं झालेलें...	३,३१,९३,४७४
अदिलाबाद व बिदर जिल्ह्यांतील तहसिलींचें उत्पन्न, जमेच्या बाबी क्रमांक ७, ८ व १०५ याखालील फक्त...	२८,५७,९२३
एकूण	३,६०,५१,३९७

जमेच्या बाबी क्रमांक ९,११,१२ व १३ आणि इतर बाबी याखालीं वरील सहा तालुक्यांतून होणारें अंदाजें उत्पन्न व तसेंच या सहा तालुक्याखेरीज सरहद्दीवरील इतर द्विभाषिक भागांचें (महाराष्ट्रांत समाविष्ट होण्याची शक्यता असणाऱ्या) क्रमांक ७ ते १३ व इतर बाबीखालीं होणारें अंदाजें उत्पन्न मिळून आणखी २० लक्ष रु. मिळतील व त्यामुळें मराठवाड्याचें वर दिलेल्या बाबीखालीं येणारें एकूण उत्पन्न ३८० लक्ष रु. पर्यंत जाईल.

वर दिलेल्या बाबीपुरतेंच जिल्हावार उत्पन्नाचे आंकडे मिळाले आहेत. पण जमेच्या आणखी बऱ्याच बाबी राहतात. सबंध, हैद्राबाद राज्याची वरील बाबींखालीं होणारी जमा १७१० लक्ष रुपये आहे. आणि त्याच वर्षाच्या (१९५१–५२) प्रत्यक्ष हिशेबावरून हैद्राबाद राज्याचें एकूण महसुली उत्पन्न २९८७ लक्ष रुपये आहे. सुमारें १२ कोटी रुपयांची ही तफावत, उत्पन्नाच्या बाबी क्रमांक २, ४, १३, २०, ४६ व ५१ याखालीं होणाऱ्या उत्पन्नामुळें आहे. या बाबींचे जिल्हावार उत्पन्नाचे आंकडे मिळू शकले नाहींत. हैद्राबाद राज्याच्या या बाबींच्या उत्पन्नांतील मराठवाड्याचा हिस्सा, लोकसंख्येच्या प्रमाणांत वांटणी केली असतां अंदाजें ३५० लक्ष रु. होईल. अशा रीतीनें मराठवाड्याचें एकूण सरकारी उत्पन्न अंदाजें ७३० लक्ष रु. होईल.

१९५१–५२ सालांतील प्रत्यक्ष जमाखर्चाच्या हिशेबामध्यें मराठवाड्याच्या पांच जिल्ह्यांची, खर्चाच्या बाबी क्रमांक ७ ते १५, १८, २२, २५, २६, २८ ते ३०, ३७ ते ४३, ४७, ५०, ५४, ५४अ, व ५५ यावर झालेल्या

खर्चाची एकूण रक्कम २,८२,७० हजार रु. आहे. आदिलाबाद व बिदरचे सहा तालुके व सरहद्दीवरील महाराष्ट्रांत समाविष्ट होणारा इतर द्विभाषिक भाग यांचा वरील बाबींवर होणारा खर्च अंदाजें ४५ लक्ष रु. होईल, व अशा रीतीनें सबंध मराठवाड्याचा वरील बाबींवर होणार एकूण खर्च ३,२७,७० हजार रु. होईल.

फक्त वरील बाबींचेंच जिल्हावार खर्चाचे आंकडे मिळाले आहेत. आणि या बाबींवर हैद्राबाद राज्यांतील एकूण खर्च १०,८५,८० हजार रु. आहे. १९५१–५२ च्या प्रत्यक्ष जमाखर्चाप्रमाणें हैद्राबाद राज्याचा एकूण खर्च २८,१९,२९ हजार रु. आहे. हा फरक अर्थात् ज्या बाबींचे जिल्हावार आंकडे उपलब्ध नाहींत त्यामुळें आहे. परंतु त्या खर्चाची वांटणी करून त्यांतून मराठवाड्याचा न्याय्य हिस्सा ठरविण्यास कोणतेंहि साधन उपलब्ध नाहीं. लोकसंख्येच्या प्रमाणांत त्याची वांटणी होऊं शकत नाहीं.

भावी महाराष्ट्राचें सरकारी उत्पन्न व खर्च

[आंकडे हजारीं]

	१९५०–५१	१९५१–५२	१९५२–५३	सरासरी
उत्पन्न				
मुंबई शहरासह मुंबई राज्यांतील मराठी जिल्हे	३,९६,९२९	३,९९,६९३	३,८४,४३३	३,९३,६८५
नागपूर–वऱ्हाड (८ मराठी जिल्हे)	७५,९००	८९,४००	९६,०००	८७,१००
मराठवाडा	....	७३,०००	....	....
एकूण महाराष्ट्र	....	५,७२,०९३	....	....
खर्च				
मुंबई शहरासह मुंबई राज्यांतील मराठी जिल्हे	४०१३८२	३९८५५९	३९९०४०	३९९६६०
नागपूर–वऱ्हाड (८ मराठी जिल्हे)	८८५००	८९८००	८३९००	८७४००
मराठवाडा	....	आंकडे उपलब्ध नाहींत	....	....

सन १९५१–५२ मधील महाराष्ट्राचें दरडोई सरकारी उत्पन्न *

महाराष्ट्र...	१७·३
मुंबई शहरासह	
मुंबई राज्यांतील	
मराठी जिल्हे...	२०·६६
नागपूर–वऱ्हाड...	११·७
मराठवाडा...	१३·२

(८०) वर दिलेली माहिती त्या त्या राज्यसरकाराकडून जशी मिळाली तशीच वर दिली आहे. मराठवाड्याचे बाबतींत उत्पन्नाच्या कांहीं बाबींचेच फक्त जिल्हावार वेगळे आंकडे मिळाले. इतर सर्व बाबींचे मिळूं शकले नाहींत. या इतर बाबींच्या उत्पन्नाचा अदमासें कांहीं हिशेब करून मराठवाड्याचा एकूण उत्पन्नाचा अंदाजी आंकडा आम्हीं दिला आहे. मध्यप्रदेशांतील मराठी जिल्ह्यांच्या बाबतींत तेथील सरकारनें उत्पन्नाची व खर्चाची जी वांटणी केली आहे तेच आंकडे आम्हीं दिले आहेत. मुंबई राज्यांतील मराठी जिल्ह्यांबाबतहि अशीच परिस्थिती आहे. या आंकडेवार माहितीचा अर्थ लावतांना तें उत्पन्न कोणत्या ठिकाणीं वसूल झालें हा मुद्दा विशेष लक्षांत ठेवणें जरूर आहे. मुंबई सरकारनें आपल्या जमाखर्चाचे जे जिल्हावार आंकडे प्रसिद्ध केले आहेत त्यामध्यें ही गोष्ट विशेष नजरेस येण्यासारखी आहे. या अंकडेवार माहितीवरील विवरणात्मक टिपणींमध्यें सरकारनें नमूद केलें आहे कीं, उत्पन्नाची ही वांटणी खजिन्याच्या अनुरोधानें म्हणजे त्या जिल्ह्याच्या खजिन्यांत सरकारी महसूलाची अगर करांची जी रक्कम जमा झाली असेल तें त्या जिल्ह्याचें उत्पन्न असें समजून ही वांटणी केली आहे. या पद्धतीनें वांटणी करतांना मध्यप्रदेशांतील मराठी जिल्ह्यांचा हिस्सा ठरविण्याबाबत विशेष भानगडी निर्माण होत नाहींत, कारण ज्या ठिकाणीं साहजिकपणें करभरणा अगर महसूल-वसुली केंद्रित होण्याचा संभव तें राजधानीचें शहर–नागपूर मराठी जिल्ह्यांतच आहे. परंतु मुंबई राज्यांत ही वांटणी करतांना राजधानीचें मुंबई शहर मराठी जिल्ह्यांतून वेगळें काढून मुंबई शहराच्या खजिन्यांत भरणा होणारी महसूलाची अगर कराची सर्व रक्कम तें मुंबई

* फायनान्स कमिशननें दिलेल्या निरनिराळ्या राज्यांच्या दरडोई उत्पन्नाशीं तुलना करण्यासाठीं अंदाजीं हिशेब करून काढलेलें.

शहराचें उत्पन्न असें धरल्यामुळें मराठी जिल्ह्यांचें उत्पन्न ठरवितांना मोठी गोंधळाची परिस्थिति निर्माण होते. या प्रदेशाच्या आर्थिक जीवनांतील मुंबई शहराचें महत्त्वाचें स्थान लक्षांत घेतां करवसुली अगर महसुलवसुली तेथें अतिशय केंद्रित होणार हें उघड आहे. अनेक करांचा प्रत्यक्ष मुंबई शहराशीं कांहींहि संबंध नसतांना केवळ भोंवतालच्या प्रदेशाच्या आर्थिक जीवनाचें तें केंद्र असल्यामुळें तसेंच राजधानीचेंहि तें केंद्र असल्यामुळें त्या करांचा भरणा मुंबई शहराच्या खजिन्यांत होतो. उत्पन्नाची वांटणी करतांना करवसुलीच्या केंद्राला महत्त्व देऊन महसूलाच्या विभागानुसार किंवा खजिन्याच्या केंद्रानुसार उत्पन्नाचे आंकडे जमविल्यास त्यांच्यावर काय परिणाम होऊं शकतो हें आर्थिक क्षेत्रांत महत्त्वाचें स्थान असणाऱ्या मुंबई शहराच्या उदाहरणावरून स्पष्टपणें कळून येतें. वांटणीच्या या पद्धतीमुळें विशेषतः 'इतर कर' या संकीर्ण शीर्षकाखालीं जें उत्पन्न दाखविण्यांत आलें आहे त्याचा किती विपरीत अर्थ होऊं शकतो हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. गेल्या दोनतीन वर्षांतील 'इतर कर' या शीर्षकाखालीं येणाऱ्या निरनिराळ्या करांच्या उत्पन्नाचें वेगवेगळे आंकडे मिळूं शकले नाहींत. परंतु त्याआधींच्या वर्षांतील या शीर्षकाखालीं येणाऱ्या करांच्या उत्पन्नाची वेगवेगळी फोड असलेली जी माहिती प्रसिद्ध झाली आहे त्यावरून या विपरीत अर्थाचें सर्वसामान्य स्वरूप कळून येईल वसुलीच्या केंद्रानुसार उत्पन्नाची वांटणी केल्यामुळें या शीर्षकाखालीं जमा होणाऱ्या उत्पन्नाचा केवढा विपरीत अर्थ होऊं शकतो हें उसावरील कराच्या उत्पन्नाची जी वांटणी करण्यांत आली आहे त्यावरून स्पष्ट होतें. १९४६ ते १९५० या चार वर्षांचा विक्रीकर खात्याच्या कारभाराचा जो अहवाल १९५४ सालीं प्रसिद्ध झाला आहे त्यामध्यें पान ५९ वर उसावरील कराच्या उत्पन्नाबाबत माहिती दिलेली आहे. १९४९-१९५० या वर्षांतील या कराचें एकूण उत्पन्न एक कोटी सहा लाख रुपयांपेक्षां थोडें अधिक होतें. आणि यापैकीं ६८ लाख रुपयांपेक्षां अधिक रक्कम मुंबई शहरांत वसूल झालेली होती. हा उसावरील कर पूर्णपणें महाराष्ट्राच्या जिल्ह्यांतून मिळतो हें सांगण्याची गरज नाहीं. महाराष्ट्रांतील बऱ्याच साखर कारखान्यांच्या मुख्य कचेऱ्या मुंबईत असल्यामुळें त्यांनीं हा कर मुंबईच्या खजिन्यांत भरला आहे. मुंबईच्या खजिन्यांत भरणा झाला म्हणून तें मुंबई शहराचें उत्पन्न धरणें ही केवढी चूक आहे हें या उदाहरणावरून कळून येण्यासारखें आहे. आणि याचप्रमाणें दुसरी महत्वाची चूक विक्रीकराच्या उत्पन्नाची विभागणी करतांना झालेली आहे. मुंबई राज्यांत वसूल

होणाऱ्या विक्रीकराच्या एकूण उत्पन्नापैकीं अर्ध्यापेक्षां अधिक रक्कम प्रेसिडेन्सी खजिन्यांत म्हणजे मुंबई शहरांत भरणा होते. मुंबईत कर भरणें सोयीचें म्हणून किंवा विक्रीकर खात्याच्यां कारभाराशीं संबंध असणाऱ्या इतर कांहीं कारणासाठीं या कराचा भरणा मुंबई शहरांत होतो व त्यामुळें मुंबई खजिन्यांत भरणा होणाऱ्या या कराच्या उत्पन्नाचा आंकडा खूपच फुगतो. या कराचा मोठा भरणा मुंबईत होत असला तरी त्याचें उगमस्थान बऱ्याच प्रमाणांत बाहेरच्या जिल्ह्यांत आहे हें नाकारतां येणार नाहीं. याचप्रमाणें कोर्ट फी स्टँप, रजिस्ट्रेशन व मोटारकर इत्यादि करांच्या बाबतींतहि करवसुलीचें केंद्रीकरण मुंबईत होत असल्याचें दिसून येतें. अशा परिस्थितींत मराठी जिल्हे मुंबई शहरापासून वेगळे केल्यास जमाखर्चाचे दृष्टीनें मराठी जिल्हे तुटीचेच ठरणार हें उघड आहे, त्यांत अनपेक्षित असें कांहींच नाहीं. मराठी प्रदेशाचें आर्थिक जीवन मुंबईशीं कसें एकजीव आहे आणि मुंबईमध्यें तें केवढया मोठया प्रमाणावर केंद्रित झालें आहे हेंच या तुटीच्या प्रमाणावरून सिद्ध होतें. म्हणून मुंबई राज्यांतील मराठी प्रदेशाच्या आर्थिक निर्वाहक्षमतेबाबत येथें चर्चा करण्याचें कारणच नाहीं. मुंबई शहरासह मराठी प्रदेशाचें जें उत्पन्न आहे तें दरडोई उत्पन्नाच्या भाषेंत सांगावयाचें झाल्यास हिंदुस्थानांतील दुसऱ्या कोणत्याही प्रदेशापेक्षां सर्वांत अधिक आहे. आणि गुजराती व कानडी जिल्हे वेगळे झाल्यामुळें उत्पन्नांत होणारी योग्य ती घट लक्षांत घेऊनहि मुंबई राजधानी असणाऱ्या या मराठी प्रदेशाच्या दरडोई उत्पन्नावर फारसा परिणाम होणार नाहीं.

(८१) वरील मुद्दे लक्षांत घेऊन वर दिलेल्या जमाखर्चाच्या आंकडयांचें आपणांस विवरण करतां येईल. त्यावरून आपणांस दिसून येतें कीं, पुनर्रचनेनंतर महाराष्ट्र राज्यांत समाविष्ट होणाऱ्या सर्व प्रदेशांचें १९५१–५२ मधील दरडोई सरकारी उत्पन्न ११·७ रुपयांपेक्षां अधिक आहे, म्हणजे फायनान्स कमिशननें आपल्या अहवालांत १९५१–५२ सालांतील दरडोई उत्पन्नाची अखिल भारतीय सरासरी ११·७ रुपये दिली आहे त्यापेक्षां अधिक आहे. म्हणजे या पुनर्रचित महाराष्ट्र राज्याचें दरडोई उत्पन्न अखिल भारतीय सरासरीपेक्षां अधिक होईल. सध्यां तीन वेगळ्या राज्यांत असणाऱ्या प्रदेशांचें मिळून महाराष्ट्र राज्य बनणार असल्यामुळें या तिन्ही प्रदेशांतील खर्चाचें प्रमाण अगर विकासाचा दर्जा सारखा असणार नाहीं हें उघड आहे. नोकरांच्या पगाराच्या श्रेणी व त्यावर होणाऱ्या खर्चाचें

प्रमाण या तिन्ही भागांत सारखें आहे असें नाहीं. तसेंच या तिन्ही भागांचा विकास सारखाच किंवा एकाच दिशेनें झालेला आहे असेंहि नाहीं. ज्या भागांचें उत्पन्न जास्त आहे त्यांचा खर्चहि त्याच प्रमाणांत जास्त आहे व ज्यांचें उत्पन्न कमी आहे त्यांचा खर्चहि त्याच प्रमाणांत कमी आहे असें ढोबळ मानानें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं. पुनर्रचनेनंतर हे तिन्ही भाग एकत्र येतील त्यावेळीं उत्पन्न-खर्चाच्या दोन्ही बाजूंत कांहीं जुळवाजुळव करून तें एका पातळीवर आणण्याचा प्रयत्न केला जाईलच. कर-आकारणी बहुतेक सर्व ठिकाणीं सारखी राहील. परंतु जे भाग मागासलेले आहेत व जेथें विकास योजनांवर व इतर लोककल्याणकारी कार्यक्रमावर कमी खर्च होतो तेथें तो वाढविण्यांत येईल. सुरवातीस कांहीं भांडवली खर्च विशिष्ट दिशेनेंच करावा लागणार हें निःसंशय. तथापि मुंबई व मध्यप्रदेशांतील मराठी जिल्ह्यांत विकाससाधनभूत अशा मोठमोठया भांडवली संस्था बऱ्याच असल्यामुळें यापुढें त्या भागांत भांडवली खर्च करण्याची फारशी गरज भासणार नाहीं. मराठवाडयामध्येंच अशा भांडवली खर्चाची अधिक गरज भासणार. कारण, या भागांत भांडवली साधनांची वाढ फारच थोडी झाली असून तो या दोन भागांच्या मानानें बराच मागासलेला आहे. हें पुनर्घटित महाराष्ट्र राज्य सामान्यपणें जमाखर्चाचे दृष्टीनें निर्वाहक्षम होईल एवढेंच नव्हे तर कोणत्याहि विद्यमान राज्यापेक्षां किंवा दुसऱ्या कोणत्याहि नव्या पुनर्घटित राज्यापेक्षां आर्थिक दृष्ट्या अधिक सामर्थ्यसंपन्न होईल.

(८२) आयव्ययाचे दृष्टीनें निर्वाहक्षम याचा दोन प्रकारें अर्थ होऊं शकतो त्याचाहि येथें थोडा विचार करूं. विशिष्ट किमान दर्जाचें राज्यकारभारसामर्थ्य असणें व कसेंहि करून टिकून राहणें, जगणें हा एक अर्थ होऊं शकतो; आणि आधुनिक राज्यासंबंधीं ज्या अपेक्षा असतात त्याप्रमाणें स्वतःचा भौतिक विकास व लोककल्याण करूं शकेल इतक्या कार्यक्षम रीतीनें राज्यकारभार चालविण्याचें सामर्थ्य असणें, हा दुसरा अर्थ. महाराष्ट्राचें नवें राज्य या दुसऱ्या अर्थानेंहि निर्वाहक्षम होईल असें आमचें मत आहे. मागें सांगितल्याप्रमाणें या मराठी भाषिक प्रदेशाचा नैसर्गिक विस्तार व साधनसंपत्ति बरीच मोठी आहे व विकास योजनांची आंखणी करण्याचें दृष्टीनेंहि तो बराच एकजीव आहे. त्यामुळें हा सर्व प्रदेश महाराष्ट्र राज्याचे सत्तेखालीं येऊं शकेल. खर्च केलेलें भांडवल कांहीं काळानें भरपूर मोबदला देईल

अशा तऱ्हेच्या आर्थिक विकासाच्या योजना आखून त्या तडीस नेण्याइतकी साधनसंपत्ति, तेवढें आर्थिक सामर्थ्य या राज्याचें खात्रीनें होईल.

(८३) वर उल्लेखिलेल्या निर्वाहक्षमतेच्या दोन अर्थांपैकीं दुसरा अर्थ अभिप्रेत असला तर या एकंदर मराठीभाषिक प्रदेशांतून आणखी एक लहान राज्य-घटक बनविल्यास तो या दुसऱ्या अर्थानें कितपत निर्वाहक्षम होईल याची शंका आहे. नागपूर-वऱ्हाडच्या आठ मराठी जिल्ह्यांचा एक स्वतंत्र प्रांत करण्यांत यावा असें कांहीं लोकांकडून पुरस्कारिलें जातें त्याबद्दल मुख्यत: आमचें हें म्हणणें आहे. हा आठ जिल्ह्यांचा प्रांत पुरेसा मोठा होऊं शकणार नाहीं. विकास योजनांची आखणी करण्याचे दृष्टीनेंहि, पश्चिमेकडे व दक्षिणेकडे हा प्रदेश इतर मराठी प्रदेशांशीं नैसर्गिक दृष्टया अत्यंत संलग्न असल्यामुळें, विकास योजनांची या विभागापुरती स्वतंत्र आखणी करणें फार कठीण होईल. या आठ जिल्ह्यांचें दरडोई सरकारी उत्पन्न लक्षांत घेऊन निर्वाहक्षमतेच्या वर उल्लेखिलेल्या पहिल्या अर्थानें हा प्रदेश निर्वाहक्षम होईल असें मानलें तरी, पाणीपुरवठा व वीज या नैसर्गिक साधन-संपत्तीची बरीच वाण या प्रदेशांत असल्यामुळें त्याचा विकास घडवून आणण्याचे मार्गांत मोठीच अडचण निर्माण होईल. शिवाय विकाससाधनभूत अशा बऱ्याच संस्थांची जी वाढ आज नागपूरमध्यें झाली आहे ती या लहान प्रदेशाच्या मर्यादित उत्पन्नावर टिकविणें शक्य नाहीं, आणखी ती वाढविणें तर दूरच. या प्रदेशाच्या व इतर मराठी प्रदेशाच्या सरकारी उत्पन्नाच्या आंकडयांची तुलना केली असतां हा प्रदेश महाराष्ट्राच्या इतर प्रदेशांपेक्षा विशेष श्रीमंत आहे असें बिलकूल दिसून येत नाहीं. म्हणून एवढा लहान राज्य-घटक बनविणें हें त्या प्रदेशाचा भौतिक विकास व त्या राज्याचें आर्थिक सामर्थ्य या दोन्ही दृष्टीनीं त्या प्रदेशाला अडचणीचेंच ठरल्याशिवाय रहाणार नाहीं.

विभाग दुसरा
मुंबई शहराचा प्रश्न

ऐतिहासिक दृष्ट्या मुंबई शहर महाराष्ट्राचा भाग

(८४) मराठी ही एक स्वतंत्र भाषा म्हणून ओळखली जाऊं लागली त्या काळापासून म्हणजे मराठी भाषा जन्मास आली तेव्हांपासून मुंबई व साष्टी हीं बेटें मराठीभाषिकांची वस्ती असणाऱ्या कोंकणाचा एकजीव असा भाग आहेत, याबद्दल कांहींच शंका नाहीं. शिलालेख, प्राचीन देवालयें इत्यादिकांचे अवशेष व इतर ऐतिहासिक पुराव्यावरून कोंकणामध्यें उत्तरेस दमणपर्यंत नेहमीं मराठी भाषिकांची वस्ती राहिली आहे हेंच सिद्ध होतें व अशा रीतीनें तो नेहमीं निर्विवाद्य मराठी प्रदेश राहिला आहे.

(८५) पुराणांतरीं जो इतिहास ग्रथित झाला आहे त्यावरून भारताच्या पश्चिम किनाऱ्यास, ज्यामध्यें मुंबईचा समावेश होता, त्यास अपरान्त ही संज्ञा होती. एवढ्या मोठ्या भागास अपरान्त ही संज्ञा असली तरी संकुचित अर्थानें त्याचा वापर होतो त्यावेळीं अपरान्त म्हणजे उत्तर कोंकण अभिप्रेत असतें आणि या अपरान्ताची राजधानी शूर्पारक म्हणजे सध्यांचे सोपारा ही होती. अपरान्त हा अशोकाच्या साम्राज्याचा एक प्रांत असल्याचेंहि दिसून येतें. मौर्यांचें साम्राज्य मोडकळीस आल्यावर हा भाग शातवाहनांच्या ताब्यांत गेला. त्यांच्यानंतर येथें चालुक्य आले व चालुक्यानंतर राष्ट्रकूटांचें राज्य झालें. त्यानंतर सुमारें चारशेंपेक्षां अधिक वर्षें शिलाहारांची सत्ता सध्यांचा ठाणें जिल्हा, मुंबई आणि कुलाबा जिल्ह्याचा कांहीं भाग यावर होती. शिलाहारांनीं या भागांत अनेक देवालयें बांधलीं, त्यापैकीं वाळकेश्वर व अंबरनाथ येथील देवालयें प्रमुख होत. शिलाहारांचें शिलालेख पाहतां कायस्थ व पाठारे प्रभू, यजुर्वेदी ब्राम्हण आणि त्यांच्याशीं संबंध असणाऱ्या इतर जाती यांची वस्ती त्याकाळीं मुंबईत होती हें सिद्ध होतें आणि हे सर्व लोक मराठीभाषी आहेत. तेराव्या शतकांत देवगिरीच्या यादवांनीं शिलाहारांचा पराभव केला. नंतर यादवांची सत्ताहि १४ व्या शतकाच्या मध्यास मुसलमानी हल्ल्यामुळें संपुष्टांत आली. १६ व्या शतकांत मुंबई बेट पोर्तुगीजांच्या सत्तेखालीं आलें आणि १७ व्या शतकांत त्यांचेकडून तें ब्रिटनच्या राजास

ग्नांतील हुंड्याखातर आंदण देण्यांत आलें, आणि ब्रिटनच्या राजाकडून तें पुढें ईस्ट इंडिया कंपनीकडे गेलें. याचवेळीं उत्तर कोंकण व मुंबईसभोंवतालच्या प्रदेशावर मराठयांची सत्ता होती आणि मुसलमानांचा पाडाव करून त्यांनीं हा भाग काबीज केला होता. १८ व्या शतकाच्या प्रथमार्धांत साष्टी बेट, जें आज मुंबई शहराचा एक भाग झालें आहे तें पोर्तुगीजांचा पाडाव करून मराठयांनीं काबीज केलें. आणि ब्रिटिश आले तेव्हांपासूनचा मुंबईचा इतिहास बहुतेक सर्वश्रुत आहेच.

(८६) हिंदु राज्यांच्या अमदानींत व त्यानंतरच्या इतरांच्या कारकीर्दींतहि मुंबईतील जुने रहिवासी मुख्यतः कोळीच होते. मुंबईतील निरनिराळ्या स्थळांना जीं नावें आहेत त्यावरून मुंबईच्या सातहि बेटांतून कोळ्यांचीच वस्ती होती हें दिसून येतें. मुंबईच्या प्रसिद्ध मुंबादेवीचें देवालयांतील मुंबादेवी ही कोळ्यांची देवता असून या शहराचें मुंबई हें नांव या देवतेच्या नांवावरून पडलें असावें असा सामान्यतः लोकांचा समज आहे. कोळ्यानंतर येथें आगरी लोकांनीं वस्ती केली असें दिसतें. शिलाहारांच्या काळांत शुक्ल यजुर्वेदी ब्राह्मण, पाठारे आणि कायस्थ प्रभू या जातींचे लोक येथें रहात असल्याचें दिसून येतें. यादवांच्या कारकीर्दीत येथें पळशीकर ब्राह्मण, पाठारे प्रभू, भंडारी, पांचकळशी अगर सोमवंशी क्षत्रिय, भोईर किंवा भोई या जातीच्या लोकांची वस्ती होती आणि उत्तर कोंकण व मुंबईमध्यें राहणाऱ्या. या वर उल्लेखिलेल्या सर्व जाती मराठीभाषी होत्या.

(८७) बॉम्बे जिऑग्राफिकल सोसायटीच्या वृत्तांतांतील (इ. स. १८३७) "मुंबईत सध्या वस्ती असलेल्या सर्वांत जुन्या अशा कांहीं जाती" या प्रकरणांतील पुढील उतारा येथें खात्रीनें अस्थानीं वाटणार नाहीं. या वृत्तांताचा लेखक मि. आर. एक्स. मर्फी म्हणतो, "ज्या निरनिराळ्या मराठी बोली मुंबईत बोलल्या जातात त्यामध्यें साष्टी, माहीम, माटुंगा व माझगांव येथें राहणारे एतद्देशीय खिस्ती लोक जी मराठी बोली बोलतात ती कांहीं वेगळी दिसते व पोर्तुगीजांनीं त्यांना बाटवून खिस्ती बनविलें त्यापूर्वीपासून हे सर्व लोक हीच बोली बोलत असले पाहिजेत. मुंबईत राहणाऱ्या लोकांपैकीं पांच वेगळ्या जमातींच्या भाषेमध्यें ही बोली बऱ्याच मोठया प्रमाणांत असल्याचें आम्हांस दिसून येतें आणि या पांच जमातींच्या लिखित अगर परंपरेनें चालत आलेल्या पूर्वेतिहासाचा शोध लावण्याचा आम्हीं प्रयत्न केला असतां आमचें असें निश्चित मत झालें कीं, या जमातींच्या भाषेवरून आम्हीं जो

निष्कर्ष काढला तो बरोबर असून न बाटलेले असे मुंबईचे पुरातन रहिवाशी देश्च लोक होत. या जमाती पुढीलप्रमाणें—

(१) कोळी किंवा मासेमारी करणारे.

(२) भोगळे, भंडारी किंवा ताडी काढणारे.

(३) पळशे, जोशी किंवा हिंदू वैद्य.

(४) पाठाने अगर पाठारे प्रभू.

(५) पांचकळशी, वडावळ किंवा सुतार. ही जात मुंबई बेटांतील नारळीच्या बागांची देखभालहि करते.

भाषेचा जो पुरावा आम्हीं वर उद्धृत केला आहे त्यावरून पोर्तुगीजांच्या ताब्यांत हें बेट जाण्यापूर्वी तेथें वरील पांच जमातींची वस्ती होती आणि ती तेथ मुसलमान येण्यापूर्वीहि होती; किंबहुना १४ व्या शतकाच्या सुरवातीसहि त्यांची तेथें वस्ती असणें अत्यंत संभवनीय आहे. ” मुंबईचा अल्पसा इतिहास येथें देण्यांत आला आहे त्यावरून, तसेंच मुंबईचे जुने रहिवाशी व ते बोलत असलेली भाषा यावरूनहि मुंबई हा मराठी भाषी प्रदेशाचा एक निर्विवाद भाग आहे हें सिद्ध होतें.

मुंबई शहर मराठीभाषी प्रदेशानें परिवेष्टित.

(८८) मराठीखेरीज अन्य भाषिकांच्या प्रदेशाची जवळची सरहद्द आज मुंबईच्या उत्तरेस मुंबईपासून कमीत कमी ८० मैल तरी दूर येईल. दक्षिणेस व पूर्वेस मराठी भाषिकांचाच प्रदेश मुंबईपासून शेंकडों मैल पसरलेला आहे. म्हणून मुंबई व साष्टी बेटांचा प्रदेशहि मराठीभाषिकांच्या प्रदेशाचाच भाग असून भारतीय संघराज्याची पुनर्घटना करतांना मुंबई शहराच्या स्थानासंबंधीं कोणताहि संशय निर्माण होण्याचें कारण नाहीं. मुंबई शहर हें उघड उघड एका भाषिक प्रदेशाचा म्हणजे पर्यायानें भावी महाराष्ट्र राज्याचा एक भाग आहे आणि तसा तो राहिलाच पाहिजे.

(८९) मुंबई आणि तिच्या सभोंवतालच्या प्रदेशांतील लोकवस्तींत नेहमीं मराठी भाषिकांचीच बहुसंख्या किंवा जवळ जवळ बहुसंख्या राहिली आहे. पोर्तुगीज व इंग्रज येण्यापूर्वी या बेटांतील लोकवस्तीमध्यें मराठीइतर भाषिकांची संख्या विशेष उल्लेखनीय असण्याचा बिलकूल संभव नाहीं. १९ व्या शतकांतच बाहेरून मोठ्या प्रमाणांत मुंबईत लोक येऊं लागले. ब्रिटिशांच्या ताब्यांत मुंबई आल्यानंतर व तिची औद्योगिक वाढ झाल्यानंतरहि मुंबईच्या लोकवस्तीचा मोठा भाग नेहमीं

मराठी भाषिकांचाच राहिला आहे. इ. स. १८८१ ते १९३१ पर्यंतचे शिरगणतीचे आंकडे पाहिले तर हें स्पष्टपणें कळून येतें. १९४१ च्या शिरगणती अहवालांत देखील मुंबईतील मराठीभाषिकांची नमुना पद्धतीनें काढलेली लोकसंख्या शेंकडा ५० पेक्षां थोडी कमी आहे. यावरून १९३१ सालापेक्षां १९४१ मध्यें मुंबईतील मराठीभाषिकांच्या संख्येंत विशेष बदल झाला असें दिसून येत नाहीं. शिवाय मुंबईच्या लोकवस्तींत मराठीभाषिकांची बहुसंख्या आहे ही गोष्ट सोडली तरी दुसऱ्या कोणत्याहि एका भाषिकांच्या लोकवस्तीचें प्रमाण तेथें केव्हांहि शेंकडा २१ वर गेलेलें नाहीं.

(९०) तथापि या ठिकाणीं हें आम्हानें सांगणें अवश्य आहे कीं भाषावार राज्यांचा भूप्रदेश निश्चित करतांना त्या प्रदेशाच्या एकाद्या स्थानिक विभागांतील लोकवस्तीचें भाषिक स्वरूप काय आहे याचा विचार करणें अप्रस्तुत आहे. दोन भाषिक प्रदेशाच्या सरहद्दीवर हा भाग येत असेल तरच तेथील लोकवस्तीच्या भाषिक स्वरूपाचा विचार करण्याची गरज भासेल, आणि त्यावेळीं त्या भागांतील भाषिकांचें संख्याप्रमाण पाहून त्यानुसार त्या दोन भाषिक प्रदेशांतील सरहद्द निश्चित केली जाईल. परंतु एकभाषिक राज्याचा निर्विवाद असा जो भूप्रदेश आहे त्यांतील एकाद्या विशिष्ट ठिकाणच्या लोकवस्तीचें भाषिक स्वरूप काय आहे त्याला या ठिकाणीं कांहींच महत्त्व नाहीं.

मुंबई मराठी भाषिकांच्या जीवनाचें व कार्याचें केंद्र

(९१) मुंबई महाराष्ट्राचा एक भाग आहे एवढेंच नव्हे तर अनेक दृष्टींनीं तें मराठी भाषिकांच्या जीवनाचें केंद्र आहे. मराठी भाषिकांची नागर लोकसंख्या सर्वांत जास्त मुंबईमध्यें केंद्रित झाली आहे. आणि त्या दृष्टीनें महाराष्ट्राच्या बहुतेक सांस्कृतिक हालचालींचें, विशेषतः मराठी वृत्तपत्रें, मराठी भाषेंतील इतर प्रकाशनें आणि मराठी नाट्यकला यांचें तें प्रमुख केंद्र झालें आहे. मुंबई शहरांत जे अन्य-भाषिक गट आहेत त्यांपैकीं कोणाचेहि या बाबतींत मुंबई शहराशीं याप्रमाणें संबंध नाहींत. १९व्या शतकांत आणि त्यानंतरहि मुंबई शहरांतील विचारवंतांचा व लोकाग्रणींचा महाराष्ट्राशीं निकटचा संबंध होता आणि महाराष्ट्राच्या बौद्धिक व सामाजिक जीवनावर त्यांची बरीच छाप पडली होती. बंगालमधील ब्राह्मो समाजाच्या धर्तीवर निघालेला प्रार्थना समाज मुंबईतच प्रथम स्थापन झाला आणि त्याचा

महाराष्ट्रांतील सुशिक्षित वर्गावर पुष्कळ वर्षं बराच प्रभाव होता. अनेक क्षेत्रांतील पहिल्या पुढाऱ्यांत श्री. जगन्नाथ शंकरशेट हे प्रसिद्ध होते, आणि १९ व्या शतकांतील बौद्धिक व सामाजिक क्षेत्रांतील पुढारीवर्गात बाळशास्त्री जांभेकर, डॉ. भाऊ दाजी लाड, दादोबा पांडुरंग, व्ही. एन. मंडलिक, जनार्दन वासुदेव, शंकर पांडुरंग पंडित व जस्टिस के. टी. तेलंग ह्या व्यक्ती प्रसिद्ध होत्या.

(९२) महाराष्ट्रांतील सर्व रेल्वे मार्ग आणि सडका मुंबईच्या दिशेनें जातात. रेल्वे व रस्त्यांच्या नकाशाकडे थोडी नजर टाकली तर हें चटकन् ध्यानांत् येईल. तसेंच या नकाशावरून उत्तरेस गुजराथ व दक्षिणेस कर्नाटक या महाराष्ट्राच्या शेजारी भाषिक राज्यांचे बाबतींत मुंबई शहर हें महाराष्ट्राप्रमाणें त्या राज्यांतील रेल्वे मार्गांचें व सडकांचें मीलनकेंद्र नाहीं हेंहि स्पष्ट होईल. दळणवळणाच्या सर्व मार्गांचें मुंबई हें मीलनकेंद्र असल्यामुळें सभोंवतालीं पसरलेल्या महाराष्ट्राच्या सर्व प्रदेशांतील व्यापारास मुंबई हीच एक उतारपेठ आहे आणि या प्रदेशांतील व्यापार व उद्योगधंद्यापासून होणारे सर्व प्रमुख फायदे मुंबईत केंद्रित झाले आहेत. याबाबतींत गुजरात व कर्नाटक यांचा मुंबईशीं असणारा संबंध बराच भिन्न आहे. गुजरायला नैसर्गिक दृष्ट्या सोयीचीं अशीं बंदरें नेहमीं वलसाडच्या उत्तरेस येतात आणि सौराष्ट्राचें नवें राज्य होऊन भारताच्या संघराज्यांत तें विलीन झाल्यामुळें आतां गुजरातच्या परदेशी व्यापारास बंदरांच्या सोयी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध होतील. कंडला या मोठ्या बंदराची बांधणी सुरू झाल्यामुळें तर गुजरातच्या परदेशी व्यापाराच्या सोयी विशेषच वाढल्या आहेत. कर्नाटकासाठीं असेंच एकादें बंदर बांधण्याच्या विचारांत भारत सरकार असून तें तयार झाल्यावर कर्नाटकाच्या व्यापारास नैसर्गिक अशी ती उतारपेठ होईल. शिवाय मुंबई हें महाराष्ट्राप्रमाणें गुजरात व कर्नाटकांतील नैसर्गिक साधन-संपत्तीच्या वापराशीं संबद्ध अशा मोठ्या व्यापारी अगर औद्योगिक हालचालींचें केंद्र ठरत नाहीं. गुजरातसाठीं अहमदाबाद हें एक मोठें व जोरदार केंद्र असून त्याशिवाय आणखी इतर लहान केंद्रेंहि आहेत. त्यांतील कांहीं सध्यांहि आहेत, व कांहीं पुढें होण्यासारखीं आहेत. महाराष्ट्रांतील सर्व व्यापारी व व्यावसायिक हितसंबंध मुंबईत केंद्रित झाले आहेत, एवढेंच नव्हे तर घाटाखालच्या कोंकणांतील व घाटावरच्या महाराष्ट्राच्या अनेक जिल्ह्यांतील शेतकरी व कामगार कुटुंबांतील असंख्य व्यक्तींच्या रोजगारधंद्याचें व उपजीविकेचें तें एक प्रमुख केंद्र होऊन बसलें आहे. कामगार वर्गात मराठी भाषिकांचाच मोठा भरणा असल्यामुळें

त्या लोकांच्या रहाण्याचा घरांचा प्रश्न सोडविणें किंवा त्यांच्या इतर सामाजिक गरज कडे योग्य लक्ष पुरविणें या गोष्टी केवळ मुंबईचें सामाजिक जीवन चांगलें होण्याचे दृष्टीनें अत्यंत महत्वाच्या आहेत असें नव्हे तर अखिल महाराष्ट्रांतील मोठया ग्रामीण विभागांचें सामाजिक जीवन सुखी होण्याचें दृष्टीनेंहि त्यास महत्त्व आहे. या सर्व विवेचनावरून हेंच दिसून येतें कीं, मुंबई, महाराष्ट्र प्रदेशाचा निव्वळ एक प्राकृतिक भाग नसून सांस्कृतिक, बौद्धिक, सामाजिक इत्यादि अनेकविध मराठी जीवनाचें सर्वांत मोठें असें तें नागर केंद्र आहे, आणि त्याचप्रमाणें महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनाचेंहि तें केंद्र आहे. म्हणून मुंबई राजधानी नाहीं अशा महाराष्ट्र राज्याची निर्मिती ही अनाकलनीय, अविचारणीय अशी गोष्ट आहे आणि कदाचित् मुंबई शहर महाराष्ट्रापासून वेगळें करण्याचा प्रयत्न केला गेल्यास महाराष्ट्र राज्याचा कारभारच अशक्य होऊन जाईल.

मराठी भाषिकांचें सर्वांत मोठें शहर

(९३) मुंबई शहरांत मराठी भाषिकांची संख्या १२·३६ लाख आहे व कोंकणी भाषिक १·२९ लाख आहेत. मिळून एकंदर मराठी भाषिकांची लोकसंख्या १३·६५ लाख आहे. मराठी आणि कोंकणी भाषिकांच्या नागर लोकसंख्येचें मुंबई-तील हें केंद्रीकरण तेथील इतर कोणत्याहि भाषिकांच्या नागर लोकसंख्येहून कितीतरी मोठें आहे. मराठी भाषिकांचें दुसरें मोठें शहर म्हणजे पुणें होय आणि तेथें त्यांची लोकसंख्या पांच लाखाहून कमी आहे. म्हणून मुंबई शहर हें मराठी भाषिकांच्या नागर लोकसंख्येचें सर्वांत मोठें केंद्र आहे आणि भारतीय संघराज्यांतील दुसऱ्या कोणत्याहि शहरांत कोंकणी भाषिकांची संख्या अर्धा लाख देखील असल्याचें दिसत नाहीं. याचे उलट इतर भाषिकांचे बाबतींत, त्यांची मुंबईत जी लोकसंख्या आहे ती त्या भाषिकांचे जे प्रदेश आहेत त्यांतील कोणत्याहि शहरांतील त्यांच्या लोकसंख्येहून ती केव्हांहि जास्त नाहीं. याबाबत विचार करतांना गुजरातीखेरीज अन्यभाषिकांचा येथें विशेष उल्लेख करण्याची गरज नाहीं. या दुसऱ्या भाषांचे बाबतींत त्या त्या भाषिक प्रदेशांतील मोठया शहरांतून त्यांची नागर लोकसंख्या केंद्रित झाली आहे. उदाहरणार्थ हैद्राबादमध्यें तेलगू भाषिक, मद्रासमध्यें तामिळ भाषिक, कलकत्त्यांत बंगाली भाषिक, बंगलोरमध्यें कन्नड भाषिक आणि उत्तर प्रदेशांतील अनेक मोठया शहरांतून हिंदी भाषिक याप्रमाणें या भाषिकांच्या नागर लोकसंख्येचें या शहरांतून

मोठें केंद्रीकरण झालेलें आहे. गुजराती भाषिकांची मुंबईतील लोकसंख्या ५.२३ लाख आहे, पण त्यांच्या नागर लोकसंख्येचें मोठें केंद्र अहमदाबाद असून त्यांची तेथील लोकसंख्या मुंबईतील त्यांच्या लोकसंख्येपेक्षां कितीतरी मोठी आहे.

(९४) मुंबईमध्यें महाराष्ट्रांतून आलेल्या लोकसंख्येचा विचार करतांना मुंबईतील ऊर्दू भाषिकांचे जे आंकडे देण्यांत आले आहेत त्यांतील एक वैशिष्ट्य लक्षांत ठेवणें जरूर आहे. मुंबईमध्यें ऊर्दूभाषिकांची लोकसंख्या जवळ जवळ १० टक्के आहे. यांत मुंबई राज्याबाहेरील प्रदेशांतून आलेल्या ऊर्दू भाषिकांचीच प्रामुख्यानें मोठी लोकसंख्या आहे असें नव्हे तर हे ऊर्दू भाषिक प्रामुख्यानें मुंबई राज्यांतील गुजरात, कर्नाटक व दख्खन या भागांतून आलेले आहेत. म्हणून या १० टक्क्यांपैकीं कांहीं लोकसंख्या महाराष्ट्रांतून आलेल्या व महाराष्ट्रांत स्थायिक झालेल्या ऊर्दू भाषिकांची आहे हें उघड आहे. कदाचित् या दहा टक्क्यांमध्यें महाराष्ट्रांतून आलेल्या ऊर्दू भाषिकांचें संख्याधिक्यहि असण्याचा संभव आहे. १९५१ च्या शिरगणतीची जी माहिती प्रसिद्ध झाली आहे त्यांत १९५४ मध्यें प्रसिद्ध झालेल्या भाषांसंबंधींच्या क्रमांक १ च्या पत्रकांत मुंबई राज्यांतील मुसलमानांनीं ऊर्दू ही आपली मातृभाषा सांगितली या संबंधांत पुढीलप्रमाणें मजकूर आहे. "गुजरातेंतील बहुतेक मुसलमानांनीं गुजराती आपली मातृभाषा असल्याचें सांगितलें तर इतर ठिकाणीं विशेषतः दख्खनमध्यें त्यांनीं ऊर्दू आपली मातृभाषा असल्याचें सांगितलें" (पान ५९). ही गोष्ट लक्षांत घेतली तर १९५१ सालीं देखील मुंबईच्या रहिवाशांतील बहुसंख्य लोकवस्ती निर्विवादपणें महाराष्ट्रीयांची होती हें सिद्ध होतें.

मुंबई : भौगोलिक दृष्ट्या महाराष्ट्राचा एकसंध भाग

(९५) मुंबई शहराचा महाराष्ट्राशीं कसा संबंध आहे हें शेवटीं जो नकाशा दिला आहे त्यावरून कळण्यासारखें आहे. या नकाशांत प्रथम मुंबई हा केंद्रबिंदु धरून त्यापासून ७५ मैलांच्या त्रिज्येंत येणारा मुंबईभोंवतालचा प्रदेश दाखविला आहे. त्यावरून हें दिसून येईल कीं, या त्रिज्येंत येणारा मुंबई भोंवतालचा सर्व ग्रामीण भाग मराठीभाषिकांची बहुसंख्या असलेला, म्हणजे मराठीभाषिक प्रदेश आहे. त्याच नकाशावर आणखी एक असेंच वर्तुळ काढण्यांत आलें आहे पण त्याची त्रिज्या २५० मैलांची आहे. त्यावरून दिसून येतें कीं, मुंबई शहराशीं जमिनीवरील मार्गांनीं संबंध असणारा व मुंबईपासून या २५० मैलांच्या त्रिज्येंत येणारा

बहुतेक सर्व भूप्रदेश मराठी भाषिकांचाच आहे. फक्त उत्तरेस थोडासा व दक्षिणेस आणि पूर्वेस अगदीं नाममात्र इतर भाषिकांचा प्रदेश या त्रिज्येमध्यें येतो. उत्तरेस येणारा इतर भाषिकांचा प्रदेश म्हणजे दक्षिण गुजरातचा थोडासा भाग असून त्याचें क्षेत्र, या त्रिज्येंत येणाऱ्या एकंदर क्षेत्राच्या एकअष्टमांशापेक्षां अधिक नाहीं. मुंबई-पासून अडीचशें मैलांच्या त्रिज्येंत समाविष्ट होणारा सातअष्टमांश भूभाग पूर्णपणें मराठीभाषिक आहे; यावरून मुंबई मराठीभाषिकांच्या प्रदेशांतच पूर्णपणें आहे एवढेंच नव्हे तर मुंबईभोंवतालचा नजीकचा सर्व भूभागहि संपूर्ण मराठीभाषिक आहे हें अगदीं नजरेंत भरणारें इकसत्य आहे.'

(९६) हा मुद्दा चांगल्या रीतीनें लक्षांत यावा या उद्देशानें तुलनेसाठीं म्हणून कलकत्ता व मद्रास शहराभोंवतालच्या एवढयाच त्रिज्येंत येणाऱ्या प्रदेशांचे असेच नकाशे आम्हीं शेवटीं दिले आहेत. त्यांची मुंबईच्या नकाशाशीं तुलना करून पाहतां दिसून येतें कीं या शहराभोंवतालचा नजीकचा अगर दूरचा भूप्रदेश बराच मिश्र आहे. कलकत्याभोंवतालच्या वर्तुळांत पाकिस्तान येतें एवढेंच नव्हे, तर बिहार व ओरिसाचाहि भूभाग येतो. मद्रास तर आंध्र प्रदेशाच्या त्याहून नजिक आहे आणि मद्रासभोंवतालच्या मोठया वर्तुळांत कन्नडभाषिक प्रदेशाचाहि भाग येतो.

(९७) अशी भौगोलिक रचना असल्यामुळें मुंबई आजच्याप्रमाणेंच आर्थिक व्यवहाराचें मोठें केंद्र म्हणून पुढें रहावयाचो तर महाराष्ट्राचा प्रदेश व त्यांतील साधनसंपत्ति यावर तिला विशेष अवलंबून रहावें लागणें अपरिहार्य आहे. मुंबईशीं संबंध जोडणारे दळणवळणाचे सर्व मार्ग महाराष्ट्रांतून जातात. मुंबईला पाणीपुरवठाहि महाराष्ट्रांतूनच होतो आणि ज्यावर मुंबईतील उद्योगधंदे व इतर व्यवहार चालतात ती मुख्य जलविद्युतशक्ति महाराष्ट्रांतूनच मिळते. याबाबत लक्षांत ठेवण्यासारखी विशेष महत्वाची गोष्ट म्हणजे महाराष्ट्रांतील केवळ नैसर्गिक साधनसंपत्तीचा उपयोग करून या जलविद्युतयोजना उभारण्यांत आल्या असें नसून महाराष्ट्रांतील अनेक शेतकऱ्यांना त्यासाठीं आपल्या जमिनीस मुकावें लागलें आहे, एवढेंच नव्हे तर कित्येक मराठा शेतकरी कुटुंबांची त्यामुळें वाताहत झाली आहे. एवढी जबर किंमत देऊन बुद्धिपुरस्सर त्यांची वाढ करण्यांत आली आहे. जलविद्युत निर्मिती-साधनांचा निरनिराळ्या मार्गांनीं उपयोग करतां येतो. मोठया शहराच्या अनेकविध गरजा भागविण्यासाठीं वापरलें जाणारें पाणी शेतीकडेहि वळवितां येतें. याचा असा अर्थ नव्हे कीं, या नैसर्गिक साधनसंपत्तीचा आज ज्या तऱ्हेनें वापर होत आहे तो

परस्परांना उपकारक नाहीं. ज्यावेळीं कांहीं वर्गाच्या राजकीय दडपणामुळें व हितसंबंधामुळें मुंबई शहर लगतच्या मराठी प्रदेशापासून वेगळें करण्याची मागणी केली जाते त्यावेळींच या मार्गाचा विचार करण्याचा प्रश्न निर्माण होतो. आणि त्यावेळीं मग हा प्रश्न करणें रास्त ठरतें कीं, मुंबई शहराच्या जीवितव्यापारावर सत्ता गाजविणाऱ्या हितसंबंधी वर्गाचा तें शहर लगतच्या प्रदेशापासून तोडण्याचा अट्टाहास असेल तर मग लगतच्या प्रदेशानें तरी मुंबईच्या विकासाची व दैनंदिन जीवनाची कां म्हणून एवढी काळजी करावी ?

मुंबई शहर वेगळें करा या मागणीची छाननी

(९८) मुंबई शहर महाराष्ट्रापासून वेगळें काढण्याची मागणी कोणत्या तत्त्वावर आधारली आहे याची नीट विचिकित्सा करणें कठीण आहे, कारण अजूनपर्यंत कोणत्याहि जबाबदार व्यक्तीनें अगर संस्थेनें ही मागणी मुद्देसूद व बुद्धीस पटेल अशा रीतीनें पुढें मांडलेलीच नाहीं. मुंबईतील मराठेतर भांडवलदार व हितसंबंधी-विशेषत: गुजराती, ही मागणी करणाऱ्यामध्यें प्रमुख आहेत. या हितसंबंधी वर्गाच्या प्रतिनिधींचा असा दावा आहे कीं, मुंबईचा विकास घडवून आणण्यांत मराठेतर जमातींचाच मोठा भाग आहे. म्हणून ते म्हणतात कीं, मुंबई मराठी प्रदेशाचा भाग असला तरी या कारणासाठीं ती महाराष्ट्रापासून वेगळी काढणें न्याय्य आहे. ' विकास ' या शब्दाचा नक्की अर्थ सांगणें कठीण आहे. सर्वसामान्यपणें असें म्हणतां येईल कीं, मुंबईचा प्राथमिक विकास इंग्रजांनीं घडवून आणला. अर्थात् इतर अनेक जमातींनीं, त्यांतहि प्रामुख्यानें हिंदी जमातींनीं त्यांना या कामीं मदत केली हेंहि खरें आहे. ज्या कामगार जमातींनीं या विकासकार्यास मदत केली त्यामध्यें मराठी भाषिकांची बहुसंख्या होती हेंहि नि:संशय. व्यापारी व इतर धंदेवाल्या वर्गांत मराठी भाषिक नसणाऱ्या जमातींचा प्रामुख्यानें भरणा होता. आणि मागें एके ठिकाणीं सांगितल्याप्रमाणें असें होण्याचें मुख्य कारण म्हणजे मराठी मातृभाषा असणाऱ्या व्यापारी अगर धंदेवाल्यांच्या मोठ्या जमाती महाराष्ट्रांत नाहींतच. महाराष्ट्रांतील बहुतेक सर्व शहरांतून व्यापार करणाऱ्या मोठ्या जमाती मराठी मातृभाषा नसणाऱ्या होत्या. म्हणून मुंबईची वाढ करण्यामध्यें ज्या व्यापारी जमातींनी इंग्रजास मदत केली त्याहि मराठीभाषिक नसल्यास त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं. पण मुंबईची वाढ करण्यामध्यें कोणाचा भाग किती याबाबत ऐतिहासिक वस्तुस्थिति कांहींहि असो, त्या गोष्टीचा मुंबईवर राजकीय सत्ता कोणाची असावी आणि तें शहर

नैसर्गिक दृष्टया ज्या प्रदेशांत आहे त्यांतच ठेवावें कीं त्यापासून वेगळें काढावें या प्रश्नांशीं अर्थाअर्थीं कांहीं संबंध नाहीं. कांहीं शहरांची अगर विशिष्ट भागांचीच तेवढी वाढ इंग्रजांनीं केली असें नसून त्यांनीं एकंदर भारताच्या मोठया प्रदेशाचा विकास घडवून आणला आहे. याप्रमाणेंच युरोपीय राष्ट्रांनीहि मध्यपूर्व आशियांतील कित्येक देशांचा व प्रदेशांचा विकास घडवून आणला आहे. पण या दोघांच्याहि बाबतींत, त्यांनीं या देशांचा विकास घडवून आणला म्हणून त्यांच्याच राजकीय सत्तेखालीं ते देश सतत राहिले पाहिजेत असें कोणी म्हणत नाहीं, किंवा त्या देशांतील कांहीं बंदरांची अगर औद्योगिक शहरांची त्यांनीं वाढ केली म्हणून तीं बंदरें व शहरें त्या प्रदेशापासून वेगळीं काढण्यांत यावींत व तीं त्यांच्या सत्तेखालीं रहावींत, कारण तीं युरोपीय लोकांनीं वाढवलेलीं आहेत, असा हक्कहि आज कोणी मान्य करणार नाहीं. मुंबईची वाढ करण्यांत कांहीं मराठीइतर जमातींचा विशेष भाग होता म्हणून त्या जमातींच्या इच्छेनुसार तें शहर निसर्गतः ज्या प्रदेशाचा तें भाग आहे त्यापासून तोडून वेगळें केलें पाहिजे असें म्हणणें म्हणजे वर उल्लेखिलेला युरोपीय राष्ट्रांचा हक्क मान्य करण्यासारखें आहे. परंतु आज कोणीहि युरोपीय मांडवलदार, आशियाई राष्ट्रांचा विकास घडवून आणण्यांत त्यांनीं अत्यंत महत्त्वाचा भाग घेतला असला तरी अशा तऱ्हेची मागणी करण्यास धजत नाहींत.

(९९) मुंबई शहराचे बाबतींत वेगळ्या मार्गानें जाणें कां जरूर आहे याची बुद्धीस पटणारी अशी कोणतीहि कारणमीमांसा अजून पुढें आली नसली तरी मुंबई वेगळी काढण्याबाबत जीं अनेक कारणें सांगितलीं जातात त्यामध्यें मुंबईच्या लोकसंख्येचें स्वरूप व त्या शहराचें औद्योगिक व आर्थिक क्षेत्रांतील मोठें स्थान, हीं महत्त्वाचीं होत.

(१००) मुंबईमध्यें मराठीभाषिकांची संख्या बरीच मोठी असली तरी ते मुख्यतः कारकून आणि मजूर आहेत व उद्योगपती, मांडवलदार व व्यापारी बहुतेक अन्यभाषक आहेत, असेंहि एक विधान करण्यांत येतें. ही गोष्ट खरी आहे हें निःसंशय, आणि ब्रिटिश अमदानींतील भारताच्या आर्थिक विकासक्रमांत ज्या शक्ति प्रभावी होत्या त्यांचा तो परिणाम आहे. आणि या प्रभावी शक्तींचें परिणाम फक्त मुंबईतच दिसून येतात असें नाहीं तर हिंदुस्थानांतील अनेक शहरांत, विशेषतः कलकत्त्यामध्यें हीच अवस्था आहे आर्थिक विकासक्रमांतील या प्रभावी शक्तीमुळें हिंदुस्थानाबाहेर

मध्यपूर्व आशियामध्यें तर यापेक्षांहि भयंकर परिणाम घडून आले आहेत. आणि त्या देशांमध्यें त्यामुळें मोठी अडचणीची परिस्थिति निर्माण झाली आहे. ज्याला इंग्रजींत "प्ल्युरल सोसायटी" म्हणतात तशी सामाजिक परिणती या देशामध्यें घडून आली आहे. उदाहरणार्थ, एका लेखकानें ब्रम्हदेशांतील परिस्थितीचें पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे.

"स्वतःच्या देशांत औद्योगिक क्षेत्रांत ब्रम्ही माणसाचें महत्त्व हळूहळू कमी कमी होत गेलें. राजधानीच्या रंगून शहरांत ब्रम्ही माणसाला कांहींच महत्त्व उरलें नाहीं. त्याच्या दारिद्रयाचा कलंक त्याच्या ऱ्हासास कारणीभूत झाला." (कोलिस, ट्रायल्स इन् बर्मा, पृष्ठ २१६).

या दृष्टीनें इ. स. १९३१ मधील रंगून शहरांतील लोकसंख्येची घडणहि लक्षांत ठेवण्यासारखी आहे. रंगूनमधील एकूण ४ लक्षांपेक्षां थोडया अधिक असणाऱ्या लोकवस्तींत ब्रम्ही, कारेन व इतर तद्देशीय लोकांचें प्रमाण शेंकडा फक्त ३१·८ होतें तर केवळ हिंदी लोकांचें प्रमाण एकंदर लोकवस्तीच्या शें. ५३·२ होतें.

(१०१) वर वर्णन केलेल्या परिस्थितीसारखीच थोडीफार परिस्थिति महाराष्ट्र व मुंबईमध्यें असल्याचें दिसून येत असलें तरी ब्रम्हदेशामध्यें ही प्रक्रिया महाराष्ट्रापेक्षां फार पुढें गेल्याचें दिसून येतें. असें असलें तरी रंगून शहर ब्रम्हदेशाचा भाग नाहीं असें सुचविण्याचें धाष्टर्य अजूनपर्यंत कोणी केलेलें नाहीं. या आर्थिक विकासप्रक्रियेचें हिंदुस्थानांतील इतर शहरांवर जे परिणाम झाले त्यापेक्षां कदाचित् अधिक तीव्र परिणाम मुंबईवर झाले असतील. परंतु देशांतील प्रादेशिक व्यवस्था ठरवितांना किंवा प्रदेशरचना निश्चित करतांना तो प्रदेश कोणाचा आहे म्हणजे त्या प्रदेशांतील मूळचे रहिवाशी कोण आहेत याकडे विशेष लक्ष न देतां ब्रिटिशांच्या कारकीर्दींत ज्यांच्या हातीं धनसत्ता गेली त्यांनाच महत्त्व देण्यांत आलें तर तो एक समाजवादी प्रजासत्ताक राष्ट्र असें जें आमच्या देशाचें स्वरूप मानलें जातें त्याच्या मूलभूत पायावरच मोठा आघात ठरेल.

(१०२) आणखी असेंहि सांगण्यांत येतें कीं मुंबईच्या लोकसंख्येंत मराठी भाषिक जरी सर्वांत जास्त असले तरी मराठीइतर भाषिकांचीहि मुंबईत खूप लोकवस्ती आहे आणि त्यांची संख्या मराठीभाषिकांपेक्षां जास्त आहे, म्हणून मुंबई महाराष्ट्रांत राहिल्यास या लोकांना अन्याय केल्यासारखें होईल मुंबईत मराठीखेरीज अन्य भाषिकांची संख्या जास्त आहे ही वस्तुस्थिति मान्य केली तरी त्याचा परिणाम मुंबई शहराचें जें भौगोलिक स्थान आहे त्यावर किंवा त्याच्या राजकीय दर्जावर

कसा होऊं शकतो ? इ. सन १८८१ मध्यें मुंबईतील लोकसंख्येंत मराठी भाषिकांचें प्रमाण शेंकडा ५०·१ होतें. आणि कोंकणी भाषिकांचें शेंकडा ४·४ होतें. इ. स. १९२१ मध्यें या दोघांचें शेंकडा प्रमाण अनुक्रमें ५१·४ व २·८ होतें. मुंबईच्या लोकसंख्येंतील या दोन भाषिकांचें एकत्रित प्रमाण १८८१ ते १९२१ या ४० वर्षांत कसें अगदीं सारखें राहिलें हें मि. सिजविक यांनीं १९२१ च्या शिरगणतीं अहवालांत नमूद केलें आहे. १९३१ मध्यें लोकसंख्येंतील मराठी भाषिकांचें हें प्रमाण शेंकडा ४७·६ पर्यंत खालीं आलें आणि मराठी व कोंकणी भाषिकांचें मिळून एकत्रित शेंकडा प्रमाण ५१·१ पर्यंत खालीं आलें. एकादें ठिकाण एका भाषिक प्रदेशाचा भाग म्हणून ठरण्यासाठीं तेथील लोकवस्तींत त्या भाषिकांचें शेंकडा ५० पेक्षां अधिक प्रमाण असेल, तरच तें त्या भाषिक प्रदेशाचा भाग ठरतें, हा नियम लावावयाचा झाल्यास निदान १९३१ पर्यंत तरी मुंबई शहर महाराष्ट्राचा भाग गणलें जाण्यास कोणतीच हरकत नव्हती. मग १९३१ ते १९४१ या दरम्यानच्या काळांत केव्हां तरी मुंबईत बाहेरून अन्यभाषिक लोक मोठ्या प्रमाणांत आले आणि त्यामुळें आपोआप मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी झाली असें मग म्हणावें लागेल. राज्यांतील एकाद्या ठिकाणाचे राजकीय संबंध अगर मालकी, तेथील लोकसंख्येच्या भाषिक घडणीनुसार याप्रमाणें वेळोवेळीं बदलत जाते असा जर या म्हणण्याचा अर्थ असेल तर त्याचा विशेष विचार करण्याची गरजच नाहीं.

(१०३) हें म्हणणें मान्य केल्यास त्याचे किती विचित्र परिणाम होतील ही गोष्ट सोडून दिली तरी त्यामध्यें जो गर्भितार्थ आहे त्याचे परिणाम मात्र घोर राजकीय स्वरूपाचे आहेत. हें म्हणणें मान्य केलें तर संघराज्याचा कारभार सुरळित व शांततेनें चालणें अशक्य होईल, आणि संघराज्य बनण्यास जें शांततामय वातावरण लागतें तें यामुळें रहाणार नाहीं व अशा रीतीनें संघराज्याच्या मुळावरेंच घाव घातल्या-सारखें होईल. या त्यांच्या म्हणण्याचा असा अर्थ होतो कीं जे लोक आपल्या प्रदेशांत अन्य भाषिकांची वसाहत होऊं देतात त्यांच्यावर कांहीं काळानें आपल्या प्रदेशाचा कांहीं भाग गमावण्याचें संकट ओढवतें. संघराज्य शांततेनें आणि सहविचारानें अस्तित्वांत आलें असेल तर त्याच्या निरनिराळ्या घटक राज्यांतील नागरिकांना संघ-राज्यांत कोठेंहि जाऊन वसाहत करण्याचें तसेंच कोणाशींहि व्यवहार करण्याचें स्वातंत्र्य असलेंच पाहिजे, संघराज्याचें तें मुख्य लक्षण आहे. कांहीं राज्यांत अगर त्यांतील एकाद्या विशिष्ट ठिकाणीं तेथील प्रादेशिक भाषिकांखेरीज अन्यभाषिकांची

आवक कोठें जास्त झाली असेल तर कोठें ती कमी झाली असेल, परंतु ही आवक लहान अगर मोठी कशीही असली तरी तिचा, राज्याच्या प्रादेशिक एकतेवर किंवा राज्यांतील एकाद्या विशिष्ट स्थानाच्या राजकीय दर्जावर कोणताहि परिणाम होता कामा नये. ज्या ज्या ठिकाणीं त्या राज्यभाषा-भाषिकांखेरीज-प्रादेशिक भाषिकांखेरीज इतर भाषिक मोठ्या प्रमाणांत रहात असतील आणि कायमची वस्ती करून राहिल्यामुळें ते तेथील महत्त्वाचे भाषिक अल्पसंख्याक गट बनले असतील तर त्यांचे हितसंबंध रक्षण करण्याचे दृष्टीनें योग्य त्या उपायांची तरतूद करून ठेवावी लागेल, आणि ही तरतूद सर्वत्र सारखी राहील, मग तो भाषिक अल्पसंख्य गट महाराष्ट्राखेरीज अन्य राज्यांत कायमची वस्ती करून राहिलेल्या मराठी भाषिकांचा असो किंवा तो महाराष्ट्रांत कायमची वस्ती करून राहिलेल्या मराठीइतर भाषिकांचा अल्पसंख्य गट असो. मुंबई शहराचे बाबतींत वेगळें तत्त्व अनुसरावयाचें म्हटलें तर त्यामुळें इतर लोकांच्या हक्कासंबंधींचे प्रश्नहि तांबडतोब निर्माण होतील, एवढेंच नव्हे तर त्यामुळें अन्यभाषिकांमधील परस्पर संबंध देखील बिघडतील.

(१७४) मुंबई निवळ महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनाचें केंद्र आहे असें नव्हे तर देशाच्या बऱ्याच मोठ्या भागाच्या गरजाहि तें भागवितें, तें एक महत्त्वाचें प्रमुख बंदर व व्यापार-उद्योगधंद्याचें मोठें केंद्र आहे, म्हणून त्याचे बाबतींत वेगळें तत्त्व लागू करण्याची आवश्यकता आहे, हें म्हणणेंहि टिकूं शकत नाहीं. संघराज्यांतील प्रत्येक घटक राज्याचें स्वतःचें असें एक आर्थिक केंद्र असतें, पण तें निवळ त्या राज्यांतील आर्थिक व्यवहारापुरतेंच असतें आणि इतर राज्यांच्या आर्थिक व्यवहारांशीं त्याचा कांहीं संबंध येत नाहीं, असा त्याचा अर्थ होत नाहीं. स्वतःच्या राज्याच्या क्षेत्रमर्यादेबाहेरहि ज्यांना आर्थिक महत्त्व आहे अशीं सर्व शहरें त्या राज्यांतून वेगळीं काढावयाचीं म्हटलें तर त्यांची संख्या बरीच मोठी होईल. या तत्त्वानुसार मुंबई तिच्या लगतच्या प्रदेशापासून वेगळी करण्यांत आली तर त्याप्रमाणें कलकत्ता जमशेटपूर, अहमदाबाद इत्यादि शहरेंहि त्या त्या राज्यांतून वेगळीं काढावीं लागतील. दहा लाखांवर लोकसंख्या असणारीं सर्व शहरें वेगळीं काढून त्यांची स्वतंत्र राज्यें बनविण्यांत यावींत असें श्री. मश्रूवालांनीं आपलें मत मांडलें तेव्हां त्यांच्या म्हणण्यांत एक सुसंगति तरी होती. कारण त्यांचें हें म्हणणें निवळ मुंबईपुरतें नव्हतें. व्यापार-उद्योगधंद्याचें अगर आर्थिक व्यवहाराचें एक मोठें केंद्र म्हणून त्याचे बाबतींत वेगळें

तत्त्वं लागू करावें म्हणणें म्हणजे संघराज्याचें जें विशेष स्वरूप अगर लक्षण तेंच ध्यानांत न घेणें होय. संघराज्याच्या दृष्टीनें महत्त्वाच्या अशा राज्यांतील सर्व व्यवहारावर संघराज्य सरकारचें नियंत्रण असतेंच. उदाहरणार्थ, राज्याराज्यांमधील व्यापार, बंदरें, यांचा कारभार संघराज्याच्या कक्षेत येतो. संघराज्याच्या घटनेंतच या गोष्टी आहेत, त्यामुळें एकाद्या मोठया शहरांतील त्या शहरापासून दूर असलेल्या प्रदेशाच्या आर्थिक हितसंबंधांचें योग्य तें संरक्षण होत आहेच.

स्वतंत्र शहर ' ही कल्पना कालविपरीत

(१०५) मुंबई एक " स्वतंत्र शहर " म्हणून गणलें जावें अशी जे सूचना करतात त्यांच्या लक्षांत येत नाहीं कीं " स्वतंत्र शहर " ही आज कालविपरीत गोष्ट आहे. एक स्वतंत्र राजकीय घटक या अर्थानें " स्वतंत्र शहराची " कल्पना मध्ययुगास अगर प्राचीन युगास साजेशी होती, म्हणजे मोठया क्षेत्रविस्तारांचीं राज्यें अस्तित्वांत येण्यापूर्वी नगर राज्यांची कल्पना ठीक होती. त्या काळचीं हीं स्वतंत्र नगरराज्यें एक तर भोंवतालच्या ग्रामीण प्रदेशांची लूट करून त्यावर जगणारीं सत्ताधीश शहरें होतीं किंवा भोंवतालच्या प्रदेशांवर प्रत्यक्ष अवलंबून नसणारीं परदेशी व्यापाराचीं तीं केंद्रें होतीं. विसाव्या शतकांत टिकून राहिलेलीं कांहीं स्वतंत्र शहर राज्यें हे त्यांचे मध्ययुगांतील अवशेष होत आणि हे अखेरचे अवशेषहि आतां योग्य त्या प्रादेशिक राज्यांत समाविष्ट करण्यांत आले आहेत.

(१ ६) मुंबईचें स्थान अगर दर्जा काय असावा याबाबत कांहीं वेळां आंतरराष्ट्रीय हुकमतीखालीं असणाऱ्या डँझिग किंवा ट्रीस्ट या शहरांशींहि मुंबईची तुलना करण्यांत येते. या दोन शहरांची स्थिति व मुंबईची स्थिति यामध्यें कसलेंहि साम्य नाहीं. एकादें बंदर आणि त्यालगतची किनाऱ्याची पट्टी यामध्यें ज्या भाषिक अगर राष्ट्रिक गटाची वस्ती असते त्यापेक्षां भिन्न भाषिक अगर राष्ट्रिक गटाची वस्ती भोंवतालच्या प्रदेशांत असल्यास आणि त्या भोंवतालच्या प्रदेशांतील व्यापारचें तेंच बंदर असल्यास या परिस्थितीमुळें निरनिराळ्या संबंधी राष्ट्रांमध्यें तंटे उद्भवतात व त्यावेळीं हीं बंदरांचीं शहरें आंतरराष्ट्रीय हुकमतीखालीं ठेवण्याची जरूरी भासतें. डँझिग हे जर्मनांची वस्ती असणारें शहर होतें पण भोंवतालच्या पोलिश प्रदेशाचें तें बंदर होतें. मुंबईच्या बाबतींत तशी परिस्थिती नाहीं. मुंबई मराठी शहर असून त्याच्या भोंवतालचा प्रदेश मराठीच आहे. ट्रीस्टमध्यें मुख्यतः इटालियन लोकांची वस्ती आहे

आणि ज्यांना तें बंदर म्हणून उपयोगी पडते तो भोंवतालचा प्रदेश मात्र स्त्रबद्ध लोकांच्या वस्तीचा आहे. उलट मुंबईमध्यें दुसऱ्या कोणत्याहि भाषिक गटापेक्षां मराठी भाषिकांची संख्या कितीतरी जास्त आहे आणि त्यांचीच फार मोठी लोकसंख्या जवळच्या किंवा दूरच्या भोंवतालच्या प्रदेशांत आहे.

केंद्रशासित घटक होण्याचे परिणाम

(१०७) मुंबई शहराचा राज्यकारभार मध्यवर्ती सरकारकडे सोंपविण्यांत यावा अशीहि एक सूचना करण्यांत येते. संघराज्याची उभारणी कोणत्या तत्त्वावर झाली याकडे बिलकूल लक्ष न देतां ही सूचना केली जाते. स्वायत्त राज्यघटक एकत्र येऊन त्यांचें संघराज्य बनलेलें असतें आणि संघराज्याच्या कक्षेंत येणारा सर्व भूप्रदेश निरनिराळ्या स्वायत्त राज्यांमध्यें पूर्णपणें विभागला गेलेला असतो. फक्त दोन प्रकारच्या प्रदेशांचा कारभार प्रत्यक्ष संघराज्यसरकारकडे असतो. पहिला म्हणजे संघराज्याच्या राजधानीचें ठिकाण किंवा त्या राजधानीसाठीं राखून ठेवलेलें क्षेत्र आणि दुसरा म्हणजे घटक राज्यांच्या क्षेत्रमर्यादेबाहेर असणारें, वसाहतीचा अगर निमवसाहतीचा दर्जा असणारा आणि या ना त्या कारणास्तव स्वायत्त राज्याचा दर्जा प्राप्त होऊं शकत नाहीं असें क्षेत्र. संघराज्य सरकारला विशिष्ट कारणांसाठीं घटक राज्यांच्या प्रदेशांतील जागा, जमिनी, कारखाने इत्यादि आपल्या ताब्यांत घेण्याचा नेहमीं हक्क असतोच. पण राज्यांतील एकाद्या भागाचा कारभार किंवा तेथील सरकारी सत्ता संघराज्यसरकार त्या राज्यापासून काढून घेण्याचा प्रयत्न करील तर मात्र तें कृत्य संघराज्याच्या मूलभूत तत्त्वांची भयंकर पायमल्ली करणारें मानलें जाईल.

(१०८) एकाद्या स्थळाचें आर्थिक महत्त्व केवढेंहि मोठें असलें तरी संघराज्यामध्यें त्याचा कारभार मध्यवर्ती सत्तेकडे सुपूर्त करण्याचें कांहींच कारण नाहीं. संघराज्यामध्यें राज्यसरकारें व संघराज्यसरकार यामध्यें कारभाराच्या बाबींची विभागणी झालेली असते. या विभागणींत संघराज्यांत समाविष्ट झालेल्या सर्व प्रदेशांतील सर्वसामान्य आर्थिक महत्त्वाचे जे विषय असतात त्यासंबंधींचे सत्ताधिकार संघराज्य सरकारकडेच असतात. मोठीं बंदरें, विमानतळ अगर मोठे यंत्रोद्योग हे संघराज्याच्या अधिकारकक्षेंतच येतात, मग हीं बंदरें, विमानतळ एकाद्या राज्याच्या क्षेत्रमर्यादेंत असोत किंवा प्रत्यक्ष संघराज्याच्या सत्तेखालील एकाद्या क्षेत्रांत असोत. संघराज्यांत सत्ताधिकारांची जी विभागणी झालेली असते त्यामध्यें जे विषय मध्यवर्ती

सत्तेच्या नियंत्रणाखालीं असणें जरूर असतें ते संघराज्याच्या यादींत (फेडरल लिस्ट) समाविष्ट केलेले असतात. संघराज्य सरकारच्या प्रत्यक्ष अंमलाखालील प्रदेशांत, सामान्यतः राज्यसरकारांकडे अगर स्थानिक सत्तांकडे जे विषय अगर त्याबाबतचे सत्ताधिकार सोपविलेले असतात तेहि संघराज्य सरकारकडे येतात व या अर्थानें मध्यवर्ती सरकारची सत्ता वाढते. एकाद्या भागावर मध्यवर्ती सत्तेचा अंमल असल्यास त्याचे मुख्यतः पुढील परिणाम होतात—(१) मध्यवर्ती सत्तेच्या अंमलाखालीं जो भाग असतो त्याला आपल्या भोंवतालच्या प्रदेशांशीं एकजीव होण्याचा अगर त्यांत विलीन होण्याचा अधिकार रहात नाहीं. (२) स्वराज्याचे कारभारांत त्यांना भाग घेतां येत नाहीं. स्वराज्याचे कारभारांत भाग घेतां येत नाहीं असें म्हणण्याचें कारण स्वायत्त घटक राज्यांचा जो दर्जा असतो तेवढा मध्यवर्ती सत्तेच्या अंमलाखालील प्रदेशांचा नसतो, तेथील शासनसंस्थेचा दर्जा फार तर संघसरकारच्या अंमलाखालील एकाद्या स्थानिक स्वराज्यसंस्थेइतका असतो. शिवाय तिसरा परिणाम म्हणजे मध्यवर्ती सत्तेच्या अंमलाखालीं तो भाग राहिल्यानें तेथील कारभारांत संघराज्यसरकारच्या अधिकृत भाषेचें प्राबल्य होतें व तेवढ्या प्रमाणांत प्रादेशिक भाषा दडपली जाते. आणि या गोष्टीचा तेथील शैक्षणिक, सांस्कृतिक इ. कार्यांवरहि अशाच प्रकारचा परिणाम होतो. मध्यवर्ती सत्तेच्या अंमलाखालीं राहण्यानें जे परिणाम होतात त्यांचा व एकाद्या स्थळाचें आर्थिक महत्त्व अगर आर्थिक व्यवहारांचें तेथील केंद्रीकरण टिकणें न टिकणें यांच्याशीं अर्थाअर्थी कांहीं संबंध नाहीं, हें उघड आहे. त्यामध्यें कोणताहि कार्यकारणभावात्मक संबंध नाहीं. संघराज्यसरकारकडे जे अधिकार सुपूर्त केलेले असतात त्यामुळें तेथील संघराज्याच्या आर्थिक व राजकीय हितसंबंधाचें योग्य तें संरक्षण होण्याची हमी मिळालेलीच असते. तो भाग अगर तें ठिकाण मध्यवर्ती सत्तेच्या अंमलाखालीं गेल्यानें आणखी कांहीं जादा हमी अगर संरक्षण मिळतें असें बिलकूल नाहीं.

(१०९) मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी काढून तिचा एक वेगळा राज्यघटक अगर केंद्रशासित विभाग बनविला गेल्यास मराठी ही मुंबई शहराची प्रमुख प्रादेशिक भाषा म्हणून ओळखली न जाण्याचा संभव निर्माण होतो. आणि ही वस्तुस्थिति लक्षांत घेतली तर मुंबईच्या राजकीय दर्जाचा प्रश्न महाराष्ट्राच्या केवढ्या जिव्हाळ्याचा आहे हें स्पष्ट होतें. जे लोक मुंबई वेगळी करण्याच्या योजनेस पाठिंबा देतात त्यांची कारणें कांहींहि असोत, ती वेगळी काढल्यास त्याचे प्रत्यक्ष काय परिणाम

होतील हें मराठी भाषिकांना मात्र स्पष्ट दिसतें. तसें केल्यानें महाराष्ट्राच्या आर्थिक व राजकीय जीवनापासून मराठी भाषिकांच्या सर्वांत मोठ्या नागरकेंद्राची ताटातूट होईल एवढेंच नव्हे तर मुंबईचें सर्व कारभारविषयक आणि शैक्षणिक धोरण अशा तऱ्हेनें आंखलें जाईल कीं जणेंकरून मराठी भाषिकांच्या एवढ्या मोठ्या लोकसंख्येचा आपली मातृभाषा, साहित्य व संस्कृति यांच्याशीं कोणत्याहि प्रकारचा जिवंत संबंध राहणार नाहीं. म्हणून ह्या योजनेस मराठी भाषिकांनीं जोराचा विरोध करावा व आपली तीव्र नापसंति व्यक्त करावी यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहींच नाहीं, कारण त्यांच्या सांस्कृतिक जीवनसातत्याचा व विकासाचा एकंदर प्रश्न त्याभोंवती केंद्रित झाला आहे.

मुंबई वेगळी करा या मागणीची प्रतिक्रिया

(११०) मुंबई वेगळी काढण्याच्या मागणीमुळें लगतच्या प्रदेशाशीं असणाऱ्या तिच्या संबंधाचा प्रश्न निर्माण होणें अपरिहार्य आहे, आणि भावी घडामोडींचा अगर विकासयोजनांचा विचार करतां या प्रश्नास विशेष महत्त्व येतें. मुंबईची लोकवस्ती सध्यां अतिशय वाढलेली आहे आणि यापुढें तिची वाढ होऊं देता नये असें ठरविलें तरी भावी कालांत या शहरी लोकवस्तीला वसाहतीसाठीं अधिकाधिक जागेची गरज भासणार, पाणी, वीज यांचीहि अधिक गरज भासणार, हें उघड आहे. सध्यां मुंबईत जी अत्यंत गर्दी झाली आहे ती कमी करून तिच्या भावी व्यवस्थेचा प्रश्न जर सोपा करावयाचा असेल तर लगतच्या प्रदेशांशीं शहराचा संबंध जोडणें हाच एक उपाय आहे. उदाहरणार्थ, बरेच दिवस कुर्ला ते पनवेल हा रेल्वेमार्ग बांधण्यासंबंधीं विचार चालू आहे, आणि तोच आणखी पुढें वाढविला असतां कोंकण रेल्वे होणार आहे. याप्रमाणें रेल्वेचा संबंध जोडला गेल्यास हें शहर व येथील औद्योगिक केंद्रें बाजूच्या मोठ्या प्रदेशांतील लोकांच्या अगदीं थोडक्या प्रवासाच्या टप्प्यांत येतील. फार दूरच्या काळाचा विचार न केला तरी मुंबईचा विकास तिचें क्षेत्र वाढवून बृहन्मुंबई प्रदेश निर्माण करण्याची योजना आंखूनच करावा लागेल. परंतु लगतच्या महाराष्ट्राच्या प्रदेशापासून मुंबई वेगळी काढण्याची भाषा चालू आहे तोंपर्यंत हें घडून येणें शक्य नाहीं. कारण जोंपर्यंत ही भाषा चालू आहे तोंपर्यंत मुंबईच्या राजकीय सत्तेचें प्रत्यक्ष क्षेत्र वाढविण्याच्या कोणत्याहि योजनेकडे आणि ज्यांच्या हातांत ती आहे त्यांच्याकडे महाराष्ट्रांतील लोक संशयानेंच पहात रहाणार.

(१११) मुंबई वेगळी करण्याच्या योजनेमुळें आणखी इतर व्यावहारिक प्रश्न निर्माण होतात ते वेगळेच. महाराष्ट्रापासून मुंबई वेगळी करण्याच्या कोणत्याहि योजनेमुळें तिच्या सरहद्दीसंबंधींचे तीव्र वादाचे प्रश्न लगेच निर्माण होतील आणि ते सोडविण्याची कोणतीहि वस्तुनिष्ठ कसोटी सांपडणें शक्य नाहीं. मुंबईत मराठी–इतर भाषिकांची बहुसंख्या आहे याच केवळ मुद्यावर जर तें शहर आणि त्यालगतचा प्रदेश मिळून बनलेला एक एकसंध घटक फोडावयाचा तर मग त्या शहराचें सर्व क्षेत्र तरी एकच एकसंध घटक म्हणून कां मानावयाचें ? ते म्हणतात त्याप्रमाणें जर मराठी–इतर भाषिक "मराठी बहुसंख्याकांचे राज्यांत" राहणें एवढें नापसंत करीत असतील आणि महाराष्ट्राचें एकंदर आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक जीवन उखडून टाकून महाराष्ट्राचा पायाच उध्वस्त करण्याचा प्रयत्न करीत असतील तर कोणीहि मराठा "बिगरमराठी बहुसंख्याकांचे राज्यांत" राहण्यास तयार आहे असें त्यांनाहि निश्चितपणें दिसून येणार नाहीं. असें झाल्यास मग शहराच्या एकंदर मर्यादांचा आणि त्या एकसंध मानावयाच्या कीं नाहीं हाहि प्रश्न निर्माण होतो. मुंबईच्या बऱ्याच मोठ्या भागांत बहुसंख्य मराठी भाषिकांची वस्ती आहे आणि हा भाग शहराबाहेरील महाराष्ट्राच्या प्रदेशांशीं सलग आहे. मग या भागांत राहणाऱ्या मराठी भाषिकांनीं "बिगरमराठी राज्य" कां म्हणून पसंत करावें ?

सार्वमत

(११२) हा सर्व प्रश्न सार्वमतानें सुटेल असें कधीं कधीं सांगण्यांत येतें. सार्वमत घेतलें तर तें मुंबई महाराष्ट्रांत रहावी कीं तिचें एक वेगळें स्वायत्त राज्य बनवावें अगर तो केंद्रशासित भाग करावा याच मुद्द्यावर घेतां येईल. सार्वमताच्या सूचनेमुळें दोन प्रश्न निर्माण होतात. सार्वमताची मागणी योग्य आहे कीं नाहीं हें ठरविण्यापूर्वी प्रथम तो प्रदेश सार्वमत घेण्यास लायक ठरावा अशीं त्या प्रदेशाचीं लक्षणें कोणतीं हा प्रश्न निर्माण होतो; कोणत्याहि प्रदेशांत अगर गांवांत राहणाऱ्या रहिवाशांना आपल्या प्रदेशाचा अगर गांवाचा एक वेगळा स्वायत्त राज्यघटक बनविण्यांत यावा अगर तो केंद्रशासित भाग करावा अशी मागणी करतां येणार नाहीं. संघराज्यांतील एक स्वतंत्र स्वायत्त राज्यघटक बनविण्याबाबत सार्वमत मागण्याचा हक्क त्याच प्रदेशांतील रहिवाशांना पोंचतो कीं ज्या प्रदेशाचा आकार आणि

साधनसंपत्ती एक वेगळा स्वायत्त राज्यघटक म्हणून आपला कारभार चालविण्याइतकी मोठीं अगर पुरेशीं असतात. शिवाय सार्वमताची मागणी घटनेंत त्याबाबत तरतूद असली तरच करतां येते. आपला राज्यघटक, संघराज्यांतील विद्यमान राज्यांच्या दर्जाचा स्वायत्त घटक होईल अशी ज्यांची खात्री असेल त्या प्रदेशांनाच—त्यांतील रहिवाशांनाच फक्त अशी मागणी करतां येईल. म्हणून ज्या प्रदेशाचें क्षेत्र पुरेसें मोठें आहे, ज्याची साधनसंपत्ती विविध आणि स्वतःच्या गरजा भागविण्यास पुरेशी आहे आणि ज्यांचे हितसंबंध शेजारच्या प्रदेशाहून बरेच वेगळे आहेत त्यांनाच फक्त सार्वमताची मागणी करण्याचा हक्क पोंचतो.

(११३) जो प्रदेश राजकीय दृष्ट्या एकात्म आहे आणि ज्याची अंतर्गत रचनाहि एकजीव आहे अशा प्रदेशालाच स्वायत्ततेची मागणी करतां येईल. एखाद्या शहराला अशी मागणी करण्याचा हक्क केव्हांहि पोंचत नाही. एखाद्या प्रदेशांतील आर्थिक व्यवहारांचे विशेषीकरण होऊन त्यांची वाढ होऊं लागली म्हणजे शहरें अस्तित्वांत येतात. फक्त शहर हें कांहीं एक संपूर्ण एकजीव घटक होऊं शकत नाहीं. शहर आणि भोंवतालचा प्रदेश मिळूनच एक पूर्ण एकजीव घटक तयार होतो. पण ही गोष्ट शहरांत राहणाऱ्यांच्या मात्र बरेच वेळां लक्षांत येत नाहीं. आणि ज्यावेळीं शहरांत राहणारे शोषक वर्गांतील लोक, ज्या प्रदेशांचें शोषण करून त्यांची भरभराट झालेली असते त्या भोंवतालच्या ग्रामीण प्रदेशांतील लोकांपेक्षां वेगळे असतात आणि त्यांच्याबद्दल त्यांना कसलेंहि प्रेम अगर सहानुभूत नसते त्यावेळीं विशेषेंकरून असें घडतें. परंतु हीं शहररूपी केंद्रें ज्या प्रदेशावर अवलंबून असतात व जो प्रदेश त्यांचेवर अवलंबून असतो त्यांची एकमेकांपासून राजकीय व आर्थिक फारकत करण्याची कोणतीहि कल्पना अगर योजना आधुनिक राजकीय, आर्थिक व सामाजिक विचारांशीं अगर सिद्धांताशीं पूर्णपणें विसंगत आहे. त्याचे उलट सध्यां, शहर आणि ग्रामीण प्रदेश हे अधिकाधिक एकजीव व्हावेत, शहरी व ग्रामीण हितसंबंधामध्यें व त्यांच्या विकासामध्यें योग्य तो समतोल निर्माण व्हावा यावरच अधिक भर देण्यांत येत असून समाजशास्त्रविषयक शहरी प्रश्नांच्या अलीकडील अभ्यासकांचें असें मत आहे कीं, या प्रचंड शहरी समुदायाच्या अनेकविध संकटांचें अगर दुःखांचें निवारण करण्याचा एकच मार्ग म्हणजे विकेंद्रीकरणाच्या व प्रादेशिक एकीकरणाच्या दिशेनें पावलें टाकणें, हा आहे. म्हणून शहर वेगळें काढण्याच्या हक्काची भाषा वर उल्लेखिलेल्या

आधुनिक कल्पनांशीं पूर्णपणें विसंगत असून युरोपीय मध्ययुगीन कल्पनांतून ती निर्माण झाली आहे. मध्ययुगीन कल्पनांचें पुनरुज्जीवन करण्यांत आलें तर त्याबरोबर मध्ययुगीन कलहांचेंहि पुनरुज्जीवन होण्याची भीति निर्माण होते.

(११४) लोकमत घ्यावें ही सूचना अगदीं अयोग्य व बुद्धीस न पटणारी आहे. तो उघडउघड एक फसवा डाव आहे. लोकमत घेण्याची ही सूचना पुढें आणणारे लोक या भरंवशावर जातात कीं, मुंबईतील मराठी भाषिकांखेरीज अन्य भाषिकांचा मोठा भरणा असलेली सर्व नवी आणि जुनी-अस्थिर (वारंवार येणारी आणि जाणारी) लोकसंख्या, मुंबई महाराष्ट्रांत समाविष्ट करण्याच्या विरुद्ध मत देतील. १९३९ मधील मुंबईच्या लोकसंख्येच्या अंतर्गत स्वरूपाबाबत पुढीलप्रमाणें वर्णन करण्यांत आलें आहे. " या शहरांत मूळचे असे कांहीं रहिवाशी आहेत पण हें शहर मुख्यतः बहिरागतांचें आहे. त्यापैकीं कांहींनीं तें आपल्या कायमच्या वस्तीचें ठिकाण केलें आहे, पण दुसऱ्या अनेकांचें तें केवळ एक काम करण्याची जागा असून सोईचें वाटत नसेल त्यावेळीं सोडून जातां येईल असें तें ठिकाण आहे " (१९३९ च्या भाडें चौकशी समितीचा अहवाल, ग्रंथ १ पान ५).

(११५) वरील अहवाल लिहिला गेल्यानंतर मुंबईच्या अस्थिर अगर तरत्या लोकसंख्येंत आणखी खूपच वाढ झाली असून कायमच्या प्रादेशिक व्यवस्थेबाबतचे निर्णय या अस्थिर लोकसंख्येच्या मतावर अवलंबून रहावेत ही गोष्ट विचार-कक्षेपलीकडील आहे. या लोकसंख्येच्या मताला कसलेंहि राजकीय महत्त्व नाहीं किंवा नैतिक दृष्ट्याहि त्याला कांहीं वजन नाहीं. शिवाय मुंबईच्या मराठी प्रदेशाचें भवितव्य तेथील मराठीखेरीज अन्य भाषिकांच्या मतामप्राणें ठरूं द्यावयाचें म्हणजे मराठेतरांना एवढी सवलत द्यावयाची कीं त्यांनीं आपलें तें आपलेंच म्हणावें आणि दुसऱ्याचें तेंहि आपलेंच म्हणावें. या बिगरमराठी भाषिकांचे जे प्रदेश आहेत त्यांचें ऐक्य बिघडण्याची कसलीहि भीति त्यांच्या या मतामुळें निर्माण होत नाहीं. त्यांच्या भाषिक राज्यांतील आर्थिक जीवनाचीं केंद्रें कांहीं तोडून वेगळीं करण्यांत येणार नाहींत व त्यांचे स्वायत्त राज्यघटक अगर केंद्रशासित भाग बनविण्यांत येणार नाहींत. महाराष्ट्रापासून मुंबई तोडण्यापुरतेंच हें लोकमत नसतें व अहमदाबाद, मद्रास, हैद्राबाद, कलकत्ता, कानपूर इत्यादि सर्व शहरांचें बाबतींतहि हेंच धोरण स्वीकारलें गेलें असतें तर एक वेळ या सार्वमताला कांहीं महत्त्व आहे म्हणून तें मान्य करण्यांत आलें असतें.

(११६) शेवटीं या सार्वमताबाबत असेंहि म्हणतां येईल कीं त्यास भारतीय प्रजासत्ताकाच्या राज्यघटनेंत कोठेंहि मान्यता देण्यांत आलेली नाहीं. काश्मीरचा सामीलनामा व हिंदुस्थानांतील फ्रेंच व पोर्तुगीज यांच्या अंमलाखालील प्रदेश यांच्या संबंधांतच फक्त सार्वमताचा उल्लेख करण्यांत आला आहे. हिंदी संघराज्यांत पूर्वीपासून असणाऱ्या प्रदेशांची वांटणी अगर व्यवस्था किंवा त्यांतील राज्यघटकांची पुनर्रचना अगर पुनर्घटना करण्याबाबत घटनेमध्यें अन्य मार्गांनीं तरतूद केलेली आहेच, आणि त्यासाठीं कोणत्याही परिस्थितींत सार्वमत घेण्याची गरज भासण्याचें कारणच नाहीं. भारत स्वतंत्र झाल्यापासून ज्या कांहीं पुनर्घटनात्मक गोष्टी करण्यांत आल्या त्यामध्यें सार्वमताचा वापर कधींच केलेला नाहीं. नवीन आंध्र राज्य निर्माण केलें त्यावेळींहि सरहद्दीचा प्रश्न सोडवितांना सार्वमताचा वापर केलेला नाहीं. त्याबाबतींत कदाचित् सार्वमताचा उपयोग होईल असें म्हणतां आलें असतें, परंतु त्या ठिकाणीं तें घेतलें गेलें नाहीं आणि त्या प्रश्नाची सामान्यपणें न्यायालयीन पद्धतीनें तपासणी करूनच सरहद्दी निश्चित करण्यांत आल्या.

महाराष्ट्र व मुंबई शहरांतील व्यापारी जमाती

(११७) मुंबई शहरांत मराठीइतर भाषिकांचें बरेंच प्रमाण आणि त्यांचें वर्चस्व असण्याचें प्रमुख कारण म्हणजे मराठी भाषिकांत व्यापार करणाऱ्या महत्त्वाच्या अशा जमाती अगर गट यांचा जवळ जवळ पूर्णपणें अभाव आहे. लहानशी स्थानिक वैश्य जमात असलेला कोंकणचा कांहीं भाग सोडला तर, देशांतील बऱ्याच मोठ्या प्रदेशांत व्यापारधंदा करणाऱ्या वाणी अगर वनियासारख्या जमाती, मराठी भाषिकांत महाराष्ट्रांत कोठेंहि आढळून येणार नाहींत. आणि त्यामुळें साहजिकच गेलीं कित्येक शतकें महाराष्ट्रांतील बहुतेक व्यापार, शेजारच्या अगर दूरच्या प्रदेशांतून ज्या व्यापारी जमाती महाराष्ट्रांत आल्या त्यांच्या हातांत गेलेला आहे. त्याचा परिणाम महाराष्ट्रांत अनेक ठिकाणीं विशेषतः शहरांतून या बिगरमराठी व्यापारी जमातींचें केंद्रीकरण होण्यांत झालेला आहे, म्हणून महाराष्ट्रांतील पुष्कळ शहरांतून जी बिगरमराठी लोकांची वस्ती बऱ्याच प्रमाणांत आढळते त्याचें हें मुख्य कारण आहे. महाराष्ट्राच्या गतेतिहासांत येथील राजांनीं ह्या व्यापारी जमातींना महाराष्ट्रांत वसाहत करण्यासाठीं व आपला व्यवसाय चालविण्यासाठीं खास बोलावून आणलें आणि त्या राज्यकर्त्यांनीं ज्या रीतीनें त्यांना वागविलें त्याबद्दल त्यांना तक्रार करण्याचें कधींच

कारण पडलें नाहीं. कांहीं काळानें यांतील बरेंच लोक महाराष्ट्रांशीं पूर्णपणें एकरूप होऊन गेले आणि त्यांनीं महाराष्ट्राच्या जीवनांत व त्याचा उत्कर्ष घडवून आणण्यांत विविधप्रकारें बराच महत्त्वाचा भाग घेतला आहे. यासंबंधीं लक्षांत ठेवण्यासारखी महत्त्वाची गोष्ट म्हणजे मुंबईतील मराठा चेंबर ऑफ कॉमर्सच्या संस्थापकांत श्री. वालचंद हिराचंद हे प्रमुख होते आणि ते त्या संस्थेचे पहिले व पुढेंहि अनेक वर्षे अध्यक्ष होते. मुंबई शहरांतील या व्यापारी जमाती किंवा त्यांतील कांहीं प्रमुख जमाती मुंबईबाहेरील महाराष्ट्राच्या बहुतेक भागांतील आर्थिक जीवनाचें नियंत्रण, स्वतः किंवा महाराष्ट्रांत राहणाऱ्या आपल्या जमातींच्या लोकांकरवीं करीत असतात. यामुळें ज्यावेळीं मराठी भाषिकांचें राज्य बनविण्यांत येईल त्यावेळीं मराठी भाषिक नसणाऱ्या अशा व्यापारी जमातींचे अनेक लोक महाराष्ट्रांत राहणें सध्यांच्या परिस्थितींत अपरिहार्य आहे. म्हणून या जमातींचे लोक मुंबईत राहिल्यानें कोणताहि नवा अगर विशेष प्रश्न निर्माण होण्याचें कांहींच कारण नाहीं.

निरनिराळ्या भाषिकांच्या दर्जांत कोणताहि फरक नाहीं

(११८) याबाबतींत पुनः एकदां आग्रहानें सांगणें अवश्य आहे तें हें कीं, राज्यरचनेसाठीं भाषा हें प्रमुख आधारभूत तत्त्व मानल्यामुळें त्या राज्यांतील रहिवाशांत भाषाभेदामुळें त्यांचा दर्जा अगर स्थान यामध्यें कोणताही भेदाभेद केला जाणार नाहीं. नामदार जस्टिस वांच्छू यांनीं आंध्र राज्यनिर्मितीसंबंधींच्या आपल्या अहवालांत पुढील शिफारस केली आहे. ते म्हणतात, " मला येथें स्पष्टपणें नमूद करावेसें वाटतें कीं, सरकारी शिक्षण संस्थांच्या आणि रुग्णालयांच्या कारभारांत नव्या आंध्र राज्याच्या क्षेत्रमर्यादेंत राहणारा प्रत्येक रहिवाशी हा आंध्रजन म्हणून मानण्यांत यावा मग तो कोणतीही भाषा बोलत असो. आणि जो आंध्रखेरीज उरलेल्या मद्रास राज्यांत राहतो तो बिगर-आंध्र मानण्यांत यावा मग तो तामीळ, तेलगू, कन्नड अगर मल्याळी कोणतीही भाषा बोलत असो. " आमच्या मतें हाच योग्य नियम आहे आणि तो ना. जस्टिस वांच्छूंनीं ज्या संबंधांत त्याचा उल्लेख केला तेवढ्या बाबीपुरताच तो योग्य आहे असें नव्हे तर राज्यकारभाराच्या इतर सर्व बाबींमध्यें हाच नियम लागू करणें अवश्य आहे. जेथें वसतिस्थानानुसार व्याख्या करणें अवश्य आहे अशा सर्व ठिकाणीं हाच नियम लागू केला जाणें योग्य आहे. एकदां या तत्त्वाचें स्पष्टपणें आकलन झालें म्हणजे मग महाराष्ट्रासारख्या प्रदेशांत

पूर्वीपासून स्थायिक झालेल्या व्यापारी जमातींना आपली मातृभाषा मराठी नाहीं यामुळें आपल्यांत व मराठी भाषिकांत कसलाहि भेदाभेद केला जात आहे असें वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. तसें त्यांनीं मानूं नये. निवळ व्यापारी जमातींचेच भाषिक अल्पसंख्य नव्हे तर कामगार व इतर वर्गांचे भाषिक अल्पसंख्यहि आज हिंदुस्थानांतील सर्व राज्यांमध्यें आढळून येतात. याप्रमाणें ते तेथें नेहमीं रहात आलेले आहेत व पुढेंहि ते तेथेंच राहतील. आणि दळणवळणाचीं साधनें सुलभ होत जातील तशी त्यांची संख्या वाढत जाण्याचाहि संभव आहे.

भाषिक अल्पसंख्याकांचे प्रश्न

(११९) मागें या प्रश्नांचा विचार करतांना कोणत्या तत्त्वानुसार त्यांची सोडवणूक करण्यांत यावी याबद्दल थोडीफार चर्चा केलेलीच आहे. त्यांतील कांहीं तत्त्वें मुंबई शहराचे बाबतींत कशी लागू होतात हें येथें प्रत्यक्ष दाखवितां येईल. मुंबईतील भाषिक अल्पसंख्याकांचा महत्त्वाचा गट म्हणजे गुजराती भाषिकांचा होय. याखेरीज इतर भाषिकांची संख्या मुंबईत फारशी मोठी आहे असें नाहीं. कलकत्ता, मद्रास, हैद्राबाद, बंगलोर इत्यादि शहरांतून तेथील प्रमुख भाषिकांखेरीज इतर भाषिक ज्या प्रमाणांत आहेत त्याच प्रमाणांत साधारणपणें मुंबईमध्यें हे इतरभाषिक आहेत.

(१२०) मुंबई शहरांतील एकंदर लोकसंख्येंत बिगरमराठी भाषिकांची बहुसंख्या आहे म्हणून तें शहर महाराष्ट्रापासून वेगळें काढलें पाहिजे अशी मागणी जे लोक करतात ते असें धरून चालतात कीं मुंबईमध्यें मराठी भाषिकांखेरीज जे अन्यभाषिक आहेत त्या सर्वांचा मिळून एक मराठीभाषिकांहून वेगळा असा एकजिनसी गट आहे. ही विचारसरणी अत्यंत चुकीची आहे. मराठीखेरीज इतर भाषिकांमध्यें असे बरेच लोक असतात कीं जे तात्पुरते बाहेरून आलेले असतात व त्यांना मुंबईचें राजकीय स्थान कोठें असावें, ती महाराष्ट्रांत असावी कीं तिचें वेगळें राज्य असावें, तेथील सरकार कसें असावें इत्यादि प्रश्नांशीं कांहींहि करावयाचें नसतें. त्या प्रश्नांशीं निगडित असे त्यांचे कोणतेहि हितसंबंध नसतात. हिंदुस्थानांतील इतर मोठमोठ्या औद्योगिक केंद्राच्या शहरांतून तेथील कामगार वर्गांत व इतर वर्गांतहि, तात्पुरती मोलमजुरी करण्यासाठीं अगर इतर कामधंद्यासाठीं येणाऱ्यांचें जें प्रमाण आहे तेवढेंच मुंबईमध्येंहि आहे. हा तात्पुरता कामगार वर्ग मग तो कलकत्यांत असो, कीं खाणी विभागांत, मुंबईत अगर इतर मोठ्या शहरांत असो, ते ज्या राज्यांत तात्पुरते

रहातात त्या राज्याच्या घटनेमध्यें कांहीं बदल झाला तरी त्यांच्या हितसंबंधांना कोणताहि धोका पोंचण्याचा अगर त्यांत कांहीं बदल होण्याचा किंचितहि संभव नसतो. म्हणून भाषिक अल्पसंख्याकांच्या या प्रश्नाची छाननी त्या सर्वांचा एक गट समजून करतां येणार नाहीं, तर त्यासाठीं प्रत्येक भाषिक अल्पसंख्याक गटाचें वेगवेगळें परीक्षण करावें लागेल.

(१२१) मराठी आणि गुजराती भाषिकांचे खालोखाल संख्येच्या दृष्टीनें मुंबईतील तिसरे महत्त्वाचे भाषिक म्हणजे उर्दू भाषिक होत. पण त्यांना राज्यपुनर्घटना झाल्यामुळें आपल्या दर्जात कांहीं फरक होत आहे असें वाटण्याचें कांहींच कारण नाहीं. कारण राज्यपुनर्रचनेनंतर मुंबई आजच्याप्रमाणेंच एका राज्याच्या राजधानीचें ठिकाण रहाणारच आहे. सध्यांच्या मुंबई राज्यांतहि उर्दू एक प्रादेशिक भाषा म्हणून मान्य करण्यांत आलेली नाहीं, म्हणून उर्दू भाषिकांना मराठी मुख्य प्रादेशिक भाषा असणाऱ्या एक भाषिक राज्याची मुंबई राजधानी राहिली काय किंवा दोन प्रमुख प्रादेशिक भाषा असणाऱ्या बहुभाषिक राज्याची ती राजधानी राहिली काय, त्यांच्या दृष्टीनें दोन्ही गोष्टी सारख्याच आहेत. तथापि जें उदार भाषाविषयक धोरण आम्ही सुचविलें आहे तें सर्व राज्यांनीं स्वीकारल्यास त्यामुळें इतर कोणत्याहि भाषिक अल्पसंख्याकांचा जसा फायदा होईल तसा उर्दू भाषिकांचाहि होईल.

(१२२) गेल्या कांहीं वर्षांत ज्यांना महत्त्व आलें आहे असा आणखी एक विशेष उल्लेखनीय भाषिक गट म्हणजे सिंधी भाषिकांचा होय. मुंबई शहरांत सिंधी भाषिकांची पुष्कळ लोकवस्ती आहे एवढेंच नव्हे तर महाराष्ट्राच्या इतर भागांतहि त्यांच्या आज मोठमोठया वसाहती झाल्या आहेत. सर्वांत मोठी सिंधी वसाहत अगर मोठें सिंधी शहर म्हणजे उल्हासनगर, हें ठाणें जिल्ह्यांत आहे. ठाणा—बोरिवली-कल्याण या भागांतील सिंधी भाषिकांची लोकसंख्या मुंबई शहरांतील त्यांच्या लोकसंख्येपेक्षां जवळ जवळ ५० टक्क्यांनीं अधिक आहे. भावी महाराष्ट्र राज्यांत राहणाऱ्या सिंधी भाषिकांची एकूण लोकसंख्या भारतीय संघराज्यांतील त्यांच्या एकंदर लोकसंख्येच्या ३० टक्क्याहून अधिक होईल असें वाटतें. भाषिक राज्यरचनेबाबत अगर मुंबई शहराच्या स्थानाबाबत सिंधी भाषिकांचा कोणताहि वेगळा दृष्टिकोण असण्याचें कांहीं कारण नाहीं. मुंबई शहर महाराष्ट्रांत राहो वा न राहो महाराष्ट्रांत पसरलेल्या त्यांच्या मोठया लोकसंख्येला कांहीं खास सोयींची अगर सवलतींची गरज

नेहमीं भासतच रहाणार आणि मुंबई शहरांतहि त्यांची एवढी मोठी लोकसंख्या नाहीं कीं तें स्वतंत्र झालें तरी तेथील कारभारावर ते आपल्या स्वतःच्या बळावर कांहीं प्रभाव पाडूं शकतील.

(१२३) शेवटीं निष्कर्ष हा निघतो कीं मुंबईच्या राजकीय व आर्थिक दर्जाशीं किंवा स्थानाशीं जर कोणाचा जिव्हाळ्याचा संबंध येत असेल तर तो फक्त गुजराती भाषिकांचा. आणि त्यांच्यातीलहि मोठ्या व्यापाऱ्यांचाच मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी काढण्याच्या चळवळींत प्रमुख भाग आहे. पण येथें हा खुलासा करणें अवश्य आहे कीं सर्व व्यापारी वर्गाचा यास पाठिंबा आहे असें म्हणतां येत नाहीं, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सनें यास स्पष्टपणें विरोध केला आहे. या ठिकाणीं हें लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं मुंबईबाहेर महाराष्ट्राच्या सर्व प्रदेशांत ज्यांचे व्यापारी हितसंबंध आहेत अशा सर्व जमातींचे सभासद महाराष्ट्र चेंबर आफ कामर्समध्यें आहेत आणि त्यापैकीं पुष्कळ सभासद मराठीभाषिक नाहींत.

(१२४) भाषिक आणि सांस्कृतिक जीवनाचे बाबतहि मुंबई शहराचा मुख्य प्रश्न गुजराती भाषिकांसंबंधानेंच आहे. वर जे निकष दिग्दर्शित केले आहेत त्याप्रमाणें गुजराती भाषिकांना विशेष सोयी अगर सवलती देणें जरूर आहे इतकी त्यांची मोठी लोकसंख्या मुंबईत आहे. मुंबई शहराच्या स्थानिक कारभारांत मागें सांगितल्याप्रमाणें गुजराती भाषेला विशेष स्थान दिलें जाईल आणि शैक्षणिक क्षेत्रांत व सरकारी संस्थांतून गुजरातीचा उपयोग करण्याची सोय केली जाईल. गुजरातींतून शिक्षण घेऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांची जी संख्या असेल त्या प्रमाणांत या सोयी करण्यांत येतील. मुंबई विद्यापीठ ही एक स्वायत्त संस्था आहे आणि पुढेंहि ती तशीच राहील. मुंबई विद्यापीठानें स्वतःच्या शिक्षण संस्थांतून मराठीसारखाच गुजरायीचाहि एक विभाग उघडण्याचें ठरविल्यास त्यास कोणाचीहि हरकत असणार नाहीं. आज मुंबई शहरांत महिला विद्यापीठानें (इंडियन वुइमेन्स युनिव्हर्सिटी) याप्रकारची व्यवस्था आपल्या शिक्षण संस्थांतून केलेलीच आहे. त्या पद्धतीवर मुंबई विद्यापीठांतहि ही सोय करणें शक्य आहे. याबरोबरच आणखी इतर भाषिक व सांस्कृतिक गटांच्या बाबतींतहि त्यांच्या शैक्षणिक व सांस्कृतिक गरजांकडे लक्ष देणें जरूर आहे. विशेषतः मुंबईत व महाराष्ट्राच्या इतर जिल्ह्यांतून स्थायी झालेल्या सिंधी लोकांच्या गरजांकडे लक्ष देणें अवश्य आहे. त्यांच्या सांस्कृतिक व साहित्यिक गरजांकडे योग्य त्याप्रकारें व पुरेसें लक्ष पुरविलें जाईल अशी एक सर्वंकष योजना

तयार करण्यांत यावी व ती अंमलांत आणण्यासाठीं राज्यसरकारनें योग्य तें सर्व सहाय्य करावें. तसेंच याबाबतींत हिंदी भाषिकांकडेहि योग्य तें लक्ष पुरविणें जरूर आहे. विशेषत: हिंदी भाषेला भारतांत जे वाढतें महत्त्व आहे तें लक्षांत घेऊन हें करणें अवश्य आहे. भाषिक अल्पसंख्यांकाच्या सामाजिक व सांस्कृतिक गरजांचा प्रश्न याप्रमाणें योग्यरीतीनें हाताळला गेला तर मग महत्त्वाचें असें दुसरें कोणतेंच कारण उरत नाहीं कीं ज्यामुळें महाराष्ट्राचें एक राज्य निर्माण होण्याबाबत अन्य भाषिकांना भीति वाटावी.

व्यापारी व आर्थिक हितसंबंध

(१२५) वर सांगितलेंच आहे कीं ही भीति व्यक्त केली जाते ती मुख्यतः मराठीभाषी नसणाऱ्या व्यापारी जमातीकडून आणि हितसंबंधी वर्गाकडून, आणि त्यांतहि पुन्हां विशेषतः गुजराती भाषिकांकडून ती व्यक्त केली जाते. व्यापारी हितसंबंधांचे दृष्टीनें पाहतां कोणत्याहि राज्यसरकारानें आपल्या प्रदेशांतील महत्त्वाच्या आर्थिक हितसंबंधांना इजा करण्याची इच्छा कां करावी हें कळणें कठीण आहे. आणि राज्य-सरकारांना सध्यां जे अधिकार आहेत ते लक्षांत घेतां त्यांची इजा करण्याची इच्छा असली तरीहि मोठमोठया व्यापारी हितसंबंधांना ते कसें धोका पोचवूं शकतील हेंहि कळत नाहीं. या व्यापारी हितसंबंधांशीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष रीत्या संबंध येणारे बहुतेक महत्त्वाचे सर्व विषय मध्यवर्ती सरकारच्या अधिकारकक्षेंत येतात. मोठीं बंदरें, माणसांची व मालाची वहातूक, पैसा आणि हुंडणावळ, परदेशी व्यापार, राज्याराज्यांमधील व्यापार, बँकिंग, विमाकंपन्या, सहकारी संस्थाखेरीज भांडवल पुरविणारे संघ (कार्पोरेशन्स), स्टॉक एक्सचेंज व वायदेबाजार, पेटंट व ट्रेडमार्क, परदेशी हुंडया, चेक, खाणींची वाढ, विशिष्ट मोठे धंदे, प्राप्तीवरील कर व परदेशी जकात, हे सर्व विषय घटनेप्रमाणें संघराज्य सरकारच्या अधिकारकक्षेंतील (युनियन लिस्ट) आहेत. सध्यां जी अधिकारविभागणी आहे ती लक्षांत घेतां राज्यसरकारांनीं कोणतेंहि धोरण स्वीकारलें तरी कोणत्याहि मोठया व्यापारी हितसंबंधांना विशेष धोका पोंचण्याची शक्यता नाहीं. मागें सांगितलेंच आहे कीं मुंबई शहरामध्येंच तेवढें या व्यापारी जमातींचें वर्चस्व आहे असें नाहीं तर महाराष्ट्राच्या इतर सर्व प्रदेशांतहि व्यापारी क्षेत्रांत त्यांचेंच वर्चस्व आहे आणि ही वस्तुस्थिति लक्षांत घेतली तर राज्यसरकारला या व्यापारी हितसंबंधांना बाधक अशी कोणतीहि गोष्ट करणें शक्य होणार नाहीं, आणि तें त्यांना इष्टहि वाटणार नाहीं.

(१२६) इतर गोष्टींबाबत सांगावयाचें म्हणजे मुंबईतील नागरिकांच्या राजकीय व आर्थिक हक्कामध्यें मुंबई महाराष्ट्रांत राहिल्यामुळें कोणताहि बदल होणार नाहीं. कोठेंहि वस्ती करण्याचा हक्क, कोणताहि धंदा करण्याचा हक्क अगर कोणतीहि नोकरी पत्करण्याचा हक्क, मालमत्ता बाळगण्याचा हक्क तसेंच तिची विल्हेवाट लावण्याचा हक्क, हे सर्व हक्क, मुंबई शहर महाराष्ट्र राज्याचा एक भाग झाल्यावर तेथील स्थानिक रहिवाशी व मराठीभाषिक लोक ज्या रीतीनें उपभोगतील त्याच रीतीनें ते मुंबईत आलेल्या कोणाहि भारतीय नागरिकाला उपभोगतां येतील. खाजगी उद्योगधंदे व व्यापार यांच्या क्षेत्रात, उदाहरणार्थ, नोकरी मिळण्याच्या परिस्थितीबाबत नवें राज्य बनल्यामुळें कोणताहि बदल होणार नाहीं. कोठेंहि जाण्यावर, वस्ती करण्यावर अगर कोणताहि धंदा करण्यावर कसल्याहि प्रकारची बंदी रहाणार नाहीं अगर महाराष्ट्राच्या चतु:सीमेंत राहणाऱ्या रहिवाशांत मराठी आणि बिगर मराठी असा कोणताहि भेदभाव केला जाणार नाहीं. यास मराठ्यांची उदार परंपरा ही एक हमी आहेच पण तेवढ्यावरच ही गोष्ट अवलंबून नाहीं तर संघराज्याच्या घटनेंत जे संरक्षक हक्क देण्यांत आले आहेत त्यामुळेंहि ही हमी मिळत आहे.

मुंबई शहर विभागाचा राज्यकारभार

(१२७) मुंबई शहर महाराष्ट्र राज्यांत समाविष्ट केल्यानें तेथील कोणाहि व्यक्तीचा आर्थिक हक्क आणि राजकीय दर्जा यामध्यें कोणताहि बदल होणार नाहीं. एवढेंच नव्हे तर मुंबईच्या स्थानिक कारभाराच्या आजच्या पद्धतींतहि कोणताहि बदल होण्याचें कारण नाहीं. मुंबई कॉर्पोरेशनचे कोणतेहि अधिकार अगर उत्पन्न कमी होणार नाहीं, एवढेंच नव्हे तर सामान्यपणें विकेंद्रीकरणाकडे असलेला महाराष्ट्राचा कल लक्षांत घेतां उलट कांहीं बाबतींत मुंबई कॉर्पोरेशनचे अधिकार आणि उत्पन्न हीं वाढण्याचाच संभव आहे.

(१२८) मोठ्या प्रमाणावर केंद्रित झालेल्या शहरी लोकवस्तीच्या राज्यकारभारविषयक प्रश्नांना तसेंच तेथील आर्थिक व्यवहाराचें नियंत्रण करण्याच्या प्रश्नांनाहि अनेक बाजू असतात. प्रथम या शहरी लोकसंख्येचा गाभा असा जो भाग त्याच्या कारभाराचा प्रश्न असतो. हा भाग म्हणजे मुंबई शहर ज्यास म्हणतात तो. दुसरा प्रश्न म्हणजे ज्याला उपनगर विभाग म्हणतात त्याच्या आणि बृहन्मुंबईच्या क्षेत्रांत समाविष्ट करणें अवश्य आहे अशा बाजूच्या ग्रामीण प्रदेशाचाहि कांहीं भाग, यांच्या कारभाराचा.

या उपनगर विभागाच्या कारभाराची मुख्य शहराच्या कारभाराशीं सांगड घालण्यानें अगर दोन्हींसाठीं एकच कारभारयंत्रणा ठेवल्यानें अनेक गैरसोयी व तोटे होत असतात. विशेषतः हा उपनगर विभाग अनेक विभिन्न आणि वेगवेगळ्या केंद्राचा मिळून बनलेला असतो त्यावेळीं हे तोटे होत असतात. यांतून मार्ग काढावयाचा म्हणजे ज्या स्थळांचें अगर लोकवस्तीच्या केंद्रांचें विशेष वेगळें व्यक्तित्व दृष्टोत्पत्तीस येतें आणि ज्यांचा विस्तारहि बराच मोठा असतो अशा प्रत्येक ठिकाणीं एक स्वतंत्र म्युनिसिपालिटी स्थापन करण्यांत यावी व इतस्ततः विखुरलेल्या लोकवस्तीच्या भागासाठीं एक सर्वसामान्य स्थानिक मंडळ (जनरल लोकल कौन्सिल) स्थापून त्याच्याकडे त्या भागाचा कारभार सोंपवावा. असें केलें तरीं बृहत् शहराच्या सत्तेचा कारभार व बृहत् शहराशेजारच्या ग्रामीण भागांचा कारभार यांचा समन्वय घडवून आणण्याचा प्रश्न रहातोच. हा समन्वय घडवून आणेल अशी आणखी एक वरिष्ठ सत्ता अगर सल्लागार मंडळ या सर्व मोठया भागासाठीं असावें व त्याच्याकडे सार्वजनिक आरोग्य, वहातुकीचे मार्ग व नगररचना या बाबींच्या कारभाराचें नियंत्रण असावें. अशी एक वरिष्ठ संस्था स्थापन करण्यांत आली तर त्या भागाच्या सबंध क्षेत्रासाठीं एक सर्वसाधारण नियोजन मंडळ अगर सल्लागार मंडळ म्हणूनहि ती काम करूं शकेल. त्याचबरोबर त्या प्रदेशाच्या विकासाची जी योजना ठरविण्यांत आली असेल त्यांत बसेल अशा रीतीनें वहातुकीच्या मार्गांची व विद्युत् पुरवठयाची वाढ करण्याच्या किंवा उद्योगधंद्याच्या जागा ठरवून देण्याच्या मोठया योजना तयार करण्यांत येतील आणि अशा रीतीनें बृहन् मुंबई विकासयोजना प्रादेशिक विकास योजनेशीं जुळती राहील.

(१२९) या निरनिराळ्या प्रकारच्या स्थानिक सत्तांच्या कारभारांत मुंबईतील सर्व नागरिकांना मग ते मराठी भाषिक असोत अगर नसोत प्रमुख भाग घेतां येईल. स्थानिक स्वराज्याचे जास्तींत जास्त अधिकार बृहन्मुंबईत राहणाऱ्या सर्व नागरिकांना खात्रीनें मिळतील आणि प्रादेशिक विकासाच्या मोठया योजनेंत बसेल अशारीतीनें मुंबईची तपशीलवार विकासयोजना तयार करून ती सुरू करणें सर्वस्वी मुंबईकरांच्या हातीं राहील.

(१३०) जे लोक मुंबई महाराष्ट्रापासून वेगळी काढण्याचा पुरस्कार करीत असतात त्यांच्या पुरस्कारांत पुष्कळ वेळां असा एक गर्भितार्थ असतो कीं मराठी-भाषिक अत्यंत अनुदार व इतरांशीं जुळवून न घेणारे आहेत, म्हणून मराठी भाषि-

कांच्या राज्यांत मराठीखेरीज अन्य भाषिकांना उदार वागणूक मिळेल अशी आशा करण्यांत कांहींच अर्थ नाहीं. सुदैवानें याबाबत मराठी भाषिकांना फार दूर न जातां या प्रदेशाचे ते सार्वभौम राज्यकर्ते होते त्या नजीकच्या भूतकाळाकडे बोट दाखवितां येईल व त्यावेळीं महाराष्ट्रांत राहणाऱ्या ज्या अन्यभाषिक जमाती होत्या त्यांना कोणत्या प्रकारची वागणूक मिळाली यावरून त्याची नीट छाननी करतां येईल. अन्यभाषिक अगर अन्यधर्मीय गटाशीं उदार वर्तनाबाबत १८ व्या शतकांतील मराठयांच्या राजवटीचा पुरावा फार चांगला आहे. उदाहरणार्थ, मराठयांच्या कारकीर्दीत पुण्याचा नगरशेट एक गुजराती बनिया होता आणि १८ व्या शतकाच्या अखेरीस पुण्यांत बाहेरून आलेले अनेक कारागीर, व्यापारी, मजूर इ. लोक मराठीखेरीज अन्य भाषा बोलणारे होते आणि त्यांची लोकसंख्याहि बरीच मोठी होती. याबाबतचा मराठी राज्यांतील दुसरा आणखी उल्लेखनीय पुरावा म्हणजे आंक्वेटिल ड पेरों या युरोपियन प्रवाशानें नमूद केलेला आहे तो. त्यानें मोठया आश्चर्यानें नमूद करून ठेविलें आहे कीं पोर्तुगीजांकडून मराठयांनीं साष्टी बेट जिंकून घेतल्यास फार काळ लोटला नव्हता तरी तेथील ख्रिस्ती लोक आपल्या धर्माप्रमाणें वागत होते आणि एकाद्या ख्रिश्चन राष्ट्रांतील लोक ज्या तऱ्हेनें आपल्या धर्माचें पालन करतात त्याप्रकारें ते करीत होते. मराठी भाषिकांनीं याबाबत स्वतःचा बचाव अगर कैफियत देण्याची कांहींच जरूरी नाहीं किंवा इतरांशीं तुलना करण्याचीहि त्यांची इच्छा नाहीं. तथापि त्यांच्यावर जे आरोप करण्यांत येत आहेत त्यासंबंधांत पूर्वीच्या इतिहासाचा थोडा दाखला दिला तर तो अयोग्य होणार नाहीं म्हणून देण्यांत आला आहे. सध्यां देखील महाराष्ट्रांत मराठी मातृभाषिकांत व मराठी मातृभाषा नसणाऱ्यांत केवळ दोन वेगळे भाषिक म्हणून तंटे नाहींत.

विभाग तिसरा

कारवार व कोंकणी भाषिक

(१३१) मराठी भाषिकांचें राज्य बनवितांना त्या प्रदेशाच्या नैर्ऋत्य टोकाकडील भागासंबंधानें एक विशेष प्रश्न निर्माण झाला आहे. पोर्तुगीजांच्या ताब्यांत गोवा राहिल्यामुळें आणि त्यांच्या भाषाविषयक धोरणामुळें मुख्यतः या प्रश्नाला आजचें हें स्वरूप आलें आहे. इतर कोणत्याही भाषिक प्रदेशाप्रमाणें महाराष्ट्रांतहि

पुष्कळ भागांत विशेषत: मुख्य सांस्कृतिक व भाषिक केंद्रापासून दूर असणाऱ्या भागांत, त्या भागापुरतीच अशी कांहीं भाषाविषयक वैशिष्ट्यें बऱ्याच प्रमाणांत आढळून येतात. विशेषतः हें कोंकणामध्यें पहावयास मिळतें. तथापि, गोव्याच्या उत्तरेस जो कोंकणचा भाग येतो तेथील भाषिक विकास नेहमींप्रमाणें प्रमाणित भाषेच्या दिशेनें होत गेला असून तेथें मराठी आणि कोंकणी यांतील भेदाचा विशेष प्रश्न निर्माण होत नाहीं. या भागांतील शिरगणतीचे क्रमवार अहवाल पाहिले तर दिसून येतें कीं, तेथील लोक आपली मातृभाषा सांगतांना कोंकणीऐवजीं मराठी सांगून तीच ते अधिकाधिक मान्य करीत आले आहेत. परंतु गोव्यामध्यें धर्म आणि संस्कृति याबद्दल पोर्तुगीझांनीं जें धोरण स्वीकारलें त्यामुळें मराठी आणि कोंकणी यामधील कृत्रिम भेद त्यांनीं तसाच राहूं दिला. परंतु पोर्तुगीजांच्या या धोरणामुळें कोंकणीचा विकास भलत्याच दिशेनें होत गेला आणि गोव्यामध्यें साहित्यिक मराठीचा प्रसार दडपून टाकण्यांत आला. गोव्याचा प्रश्न आज राज्यपुनर्रचना कमिशनच्या कक्षेंत येत नाहीं परंतु गोव्याच्या अस्तित्वाचा परिणाम मराठी प्रदेशाच्या नैऋत्येकडील टोंकाला आणि गोव्याच्या दक्षिणेला असणाऱ्या कारवार जिल्ह्यांतील मराठी भाषिकांवर बराच झालेला आहे. गोवा मध्यंतरीं राहिल्यामुळें उत्तर कोंकण व रत्नागिरी जिल्ह्यांतील घडामोडीपासून, विशेषतः कोंकणीचा तेथें ज्या तऱ्हेनें विकास होत गेला त्यापासून कारवार जिल्ह्यांतील लोक तोडले गेले आणि अलीकडे बरीच वर्षें, प्रामुख्यानें जो कन्नडभाषिकांचा जिल्हा समजला जातो आणि जेथें पुष्कळ काळ कानडी हीच जिल्ह्याची भाषा मानली गेली त्याचा एक भाग म्हणून ते राहिल्यामुळें त्यांच्या विशेष अडचणी निर्माण झाल्या आहेत.

(१३२) कोंकणीची घडण व तिचा मराठीशीं असणारा संबंध याबाबत भाषाशास्त्रज्ञांचे कांहींहि शोध अगर निष्कर्ष असोत, तिच्या विकासांतील खास वैशिष्ट्यावर ज्यांचा भर आहे त्यापैकीं प्रमुख लोकहि मान्य करतात कीं कोंकणी ही मुख्यतः बोलभाषा अगर बोली आहे आणि कोंकणी भाषिकांची साहित्यिक भाषा मराठी हीच आहे. फादर स्टीफन्सनें लिहिलेल्या साहित्याच्या संबंधांत डॉ. कत्रे म्हणतात, "फादर स्टीफन्सनें एवढे प्रयत्न केले तरी त्यामुळें कोंकणींत कसलेंहि साहित्य निर्माण झालें नाहीं. त्यानें स्वतः लिहिलेलें खिस्त पुराण, १६ व्या आणि १७ व्या शतकाच्या सुरवातीस गोव्यामध्यें जी मराठी प्रचलित होती त्यामध्येंच लिहिलेलें आहे. यावरून तसेंच १७ व्या शतकाच्या पूर्वी गोव्याबाहेर आणखी

दुसरीकडे कोठेंहि कोंकणी साहित्य आढळून येत नसल्यामुळें कोंकणीला महत्त्वाची साहित्यिक भाषा अगर सरकारी कामकाजाची भाषा हा दर्जा केव्हांहि आलेला नव्हता हेंच दिसून येतें." तसेंच डॉ. कत्र्यांनीं आणखी असेंहि मान्य केलें कीं, कोंकणी मराठींत विलीन करून दोहींचें एकीकरण करण्याची आणि मराठी हीच सामान्य भाषा करण्याची चळवळ चालू होती, तसेंच कोंकणी भाषिकांतील बहुसंख्य लोकांना मराठी संतवाङमयद्वारां साहित्यिक मराठी समजते, म्हणून कोंकणी ही मराठीची बोली असो वा नसो, ती केव्हांहि लिखित भाषा नव्हती व ऐतिहासिक काळांत साहित्यिक आविष्काराचें साधन म्हणून तिचा विशेष वापर झालेला नाहीं. शिकलेले सर्व कोंकणीभाषिक मराठीच्या द्वाराच साहित्याची ओळख करून घेतात आणि कोंकणी भाषिक ज्यावेळीं कांहीं साहित्यिक आविष्करण करतात—कांहीं साहित्य लिहितात त्यावेळीं ते मराठी माध्यमाचीच निवड करतात.

(१३३) कोंकणी भाषिकांची प्रामुख्यानें वस्ती असणाऱ्या भागांतील कारवारी लोक, त्यांच्या सामाजिक चालीरीति, परंपरा, संवयी, कपडे, राहणीची पद्धत या सर्व दृष्टींनीं ते पूर्णपणें मराठी समाजाचेच घटक आहेत. मराठी हीच आपली मुख्य साहित्यिक भाषा आहे व आपण पूर्णपणें महाराष्ट्रीय आहोंत असें या कारवारी कोंकणी लोकांनीं गेल्या २५ वर्षांत अनेक वेळां निःसंदिग्धपणें आपलें मत व्यक्त केलें आहे. कारवारमध्यें सर्वांत मोठी ज्यांची जमात आहे त्या कोंकणी मराठ्यांनीं १९२६ मध्यें त्यांची परिषद भरली असतां आणखी मराठी शाळा उघडाव्यात अशी सरकारकडे मागणी करणारा ठराव मंजूर केला होता. १९४६ सालीं कारवार येथें कर्नाटक महिला परिषद भरली होती त्यावेळीं त्या परिषदेंत कारवार आणि कारवार व बेळगांव जिल्ह्यांतील इतर मराठी भाग महाराष्ट्राला जोडण्यांत यावेत असा ठराव मंजूर करण्यांत आला होता, १९४८ मध्यें कारवार म्युनिसिपालिटीनें ठराव केला कीं, कारवार हा मराठी प्रदेशाचा एक भाग असल्यामुळें कचेरीचें दप्तर मराठींत असावें. १९५० सालीं श्री. भाऊसाहेब हिरे यांच्या अध्यक्षतेखालीं कारवार येथें भरलेल्या महाराष्ट्र एकीकरण परिषदेंत कारवार, हल्याळ, सुपा पेठ आणि बेळगांव जिल्ह्याचा पश्चिम भाग महाराष्ट्राला जोडण्यांत यावेत असा ठराव मंजूर करण्यांत आला होता. हीच मागणी पुनः १९५१ सालीं कारवार येथें भरलेल्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाच्या अधिवेशनांत करण्यांत आली. या संमेलनाचे अध्यक्ष

व कोंकणी आणि मराठीचे एक मोठे गोमंतकीय अभ्यासक श्री. आ. कृ. प्रियोळकर यांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांत मराठी आणि कोंकणीचें किती निकटचें नातें आहे, कोंकणी एका लहान भागाचीच बोलभाषा कशी आहे आणि ती मराठीचीच एक बोली कशी आहे व कोंकणी लोकांची साहित्यिक व सांस्कृतिक भाषा नेहमीं मराठीच कशी होती व आहे हें स्पष्टपणें दाखविलें आहे.

(१३४) आणखी मागें जाऊन १९ व्या शतकाच्या उत्तरार्धांत सरकारनें प्रसिद्ध केलेलें कॅनरा गॅझिटिअर पाहिलें तरी त्यामध्येंहि कोंकणी भाषिक लोकसंख्या मराठी भाषिकांतच समाविष्ट केलेली आढळते आणि कोंकणी लोकसंख्येचा त्यामध्यें स्वतंत्र उल्लेख केलेला आढळत नाहीं. १९०१ पर्यंतच्या सर्व शिरगणती अहवालांतहि हीच पद्धति अवलंबिली असून कोंकणी भाषिकांची स्वतंत्र नोंद केलेली नाहीं आणि १९११ पासून आतांपर्यंतच्या अहवालांत कोंकणी भाषिकांची वेगळी नोंद करण्यांत आली असली तरी बोलींची वर्गवारी करतांना मराठीच्या इतर बोलींप्रमाणें कोंकणी ही मराठी गटांतच घातलेली आहे. कारवार येथील एक वकील श्री. दि. म. कुळकर्णी यांनीं कारवारसारख्या कोंकणी भागांत कोंकणी ही प्रादेशिक भाषा म्हणून मान्य करण्याबाबतच्या सरकारी धोरणासंबंधीं मुंबई सरकारकडे खुलासा विचारला असतां मुंबई सरकारनें त्यांना क्रमांक एस. २८।१९३५–एफ. ९ जुलई १९४८ च्या पत्रद्वारें पुढीलप्रमाणें उत्तर दिलें आहे, "कोंकणी ही कांहीं स्वतंत्र भाषा नाहीं, तेव्हां कोंकणी भाषिकांची मराठी हीच मुख्य भाषा आहे हें उघड आहे." त्यानंतर कारवारच्या लोकांनीं कोंकणी व मराठी भाषिकांची बहुसंख्य वस्ती आहे अशा सुपा, हल्याळ व कारवार तालुक्यांतून मराठी ही सरकारी कारभाराची व कोर्टाची भाषा म्हणून मान्य करण्यांत यावी अशी सरकारकडे विनंति केली असतां मुंबई सरकारनें कारवारच्या कलेक्टरकडून त्याबाबत अहवाल मागवून आपल्या क्रमांक २०२६।४६, १ एप्रिल १९५०, पोलिटिकल आणि सर्व्हिसेस डिपार्टमेंटच्या ठरावान्वयें जाहीर केलें कीं, "कलेक्टरांनीं आपल्या अहवालांत निदर्शित केलेली परिस्थिति लक्षांत घेऊन कारवार (नॉर्थ कॅनरा) जिल्ह्यांतील सुपा पेटा, हल्याळ आणि कारवार तालुक्यांतून मराठी व कानडी या दोन्ही भाषा प्रादेशिक भाषा म्हणून मान्य करण्यांत याव्यात ही सूचना सरकार आनंदानें स्वीकारीत आहे." यावरून हें दिसून येईल कीं कोंकणी भाषिकांची मुख्य भाषा मराठी हीच आहे असें सरकार सतत मान्य करीत आलें आहे.

विभाग चवथा

महाविदर्भाची मागणी

महाराष्ट्राचें ऐक्य

(१३५) महाविदर्भ आणि मराठवाड्यासंबंधींच्या प्रश्नांचा विचार करतांना प्रथम मराठी भाषिकांचा सर्व प्रदेश तसेंच त्यांचा सर्व समाज ऐतिहासिक व सांस्कृतिक दृष्टींनीं किती एकजीव आहे हें लक्षांत घेणें जरूर आहे. मराठी ही एक स्वतंत्र भाषा म्हणून ओळखली जाऊं लागली तेव्हांपासून मराठी भाषिकांच्या या सर्व प्रदेशांतील सामाजिक, संस्कृतिक व साहित्यिक चळवळींचा इतिहास पाहिला तर त्या एकमेकांशीं अत्यंत निगडित व एकजीव होत्या हेंच दिसून येतें. प्रारंभींच्या काळांत झालेल्या संतकवींत पूर्व महाराष्ट्रांतील वैनगंगेच्या तीरावर काव्य लिहिणारे संतकवी जसे झाले तसेच पश्चिम महाराष्ट्रांतील इंद्रायणीच्या तीरावर काव्य लिहिणारेहि होऊन गेले. आणि अगदीं पूर्वकालापासून पूर्वपश्चिम महाराष्ट्राच्या सर्व प्रदेशांत पंढरपूरसारख्या क्षेत्रांना सगळीकडे सारखें महत्त्व होतें. सुरवातीच्या काळांतील तत्त्ववेत्ते, कवी व संत यामध्यें महाराष्ट्राच्या पूर्व भागांतील म्हणजे सध्यांचा मराठवाडा व वऱ्हाड–नागपूरकडील जो मराठीभाषिक प्रदेश आहे त्यांतील तत्त्ववेत्ते, कवी व संत यांचाच प्रामुख्यानें भरणा होता. तसेंच महाराष्ट्रांतील प्रमुख सरदार घराणींहि या पूर्वभागांतच प्रामुख्यानें केंद्रित झालेलीं होतीं. शिवाजी महाराजांच्या मातापित्यांची दोन्हीं घराणीं या पूर्वभागांतीलच होत. १६ व १७ व्या शतकांत अनेक घराणीं पूर्वेकडून पश्चिमेकडे आलीं व त्यांनीं पश्चिमेच्या विकासास हातभार लावला. त्याच्या उलट १८ व १९ व्या शतकांत पश्चिमेकडून पूर्वेकडे असा क्रम सुरू झाला. ज्या पद्धतीनें ही सर्व ये–जा अगर हालचाल होत गेली त्यावरून या निरनिराळ्या भागांची सामाजिक रचना व संस्कृति कशी एक आहे हेंच सिद्ध होतें. त्यानंतरच्या कालांतहि विविध क्षेत्रांतील विचारप्रणींचा या एकंदर प्रदेशांत सगळीकडे सारखाच प्रभाव होता. महाराष्ट्राच्या सर्व प्रदेशांत प्राकृतिक, भौगोलिक, ऐतिहासिक, भाषिक अगर समाजस्थितिविषयक अशा कोणत्याहि गोष्टी नाहींत कीं ज्यामुळें महाराष्ट्रांतील एक प्रदेश दुसऱ्याहून अगदीं भिन्न आहे असें दिसून यावें आणि त्यासाठीं त्या प्रदेशाचा वेगळा राज्यघटक करणें जरूर आहे असें वाटावें.

१८ ते २० व्या शतकांमधील ऐतिहासिक योगायोगाचा काळ सोडून दिला तर नागपूर–वऱ्हाड, मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्र व कोंकण यांना एकमेकांपासून वेगळें करणारें कोणतेंहि तर्कशुद्ध कारण नाहीं अगर त्यांचे वेगवेगळे गट करणें जरूर आहे हें सिद्ध करणारी कोणतीहि गोष्ट नाहीं. पूर्वी मोंगलांकडून व ब्रिटिशांकडून या प्रदेशाचे राज्यकारभारासाठीं जे विभाग केले गेले त्यांना किंवा त्यांच्या कारकीर्दीत ज्यांचें हितसंबंध निर्माण झाले त्या लोकांच्या मतांना, स्वतंत्र भारतांतील राज्यांची पुनर्घटना करण्याचें काम ज्यांच्याकडे सोंपविण्यांत आलें आहे ते विशेष महत्त्व देतील अशी अपेक्षा करवत नाहीं.

तुलनात्मक आर्थिक परिस्थिति

(१३६) सर्व मराठीभाषी प्रदेशाचें एकच राज्य करण्यांत यावें ही मागणी मुख्यतः या प्रदेशाच्या समान ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा तसेंच त्याचे सामाजिक ऐक्य व समान राजकीय भावना यावर आधारलेली आहे. आर्थिक व सरकारी जमाखर्चाच्या बाजूचा विचार केला तरी देखील तिला दुजोराच मिळत आहे. मध्यप्रदेशांतील मराठी भाषिकांचा या प्रश्नाकडे पाहण्याचा दृष्टिकोण लक्षांत घेऊन आर्थिक व जमाखर्चविषयक प्रश्नाबाबत येथें थोडी चर्चा केल्यास ती अस्थानीं होणार नाहीं. सध्यांच्या तीन राज्यांतून जी लोकसंख्या नव्या महाराष्ट्र राज्यांत जाईल तिचे राज्यवार आंकडे पाहिल्यास त्यांत सामील होणाऱ्या या तीन प्रदेशांचे परस्पर आकारमान कसें आहे तें लक्षांत येईल. ही लोकसंख्या ढोबळमानानें पुढीलप्रमाणें आहे:–मुंबई राज्यांतून (मुंबई शहर धरून) सुमारें १९८ लाख, मध्य प्रदेशांतून सुमारें ८१ लाख व हैद्राबाद राज्यांतून सुमारें ५५ लाख, याप्रमाणें आहे. यांतील सर्वांत मोठा प्रदेश आणि लोकसंख्या मुंबई राज्यांतून येणारी आहे, म्हणून अशी भीति व्यक्त केली जाते कीं, मुंबई राज्यांतील या मोठ्या प्रदेशाशीं, त्यामानानें लहान असणाऱ्या मध्यप्रदेशाच्या मराठी विभागाची सांगड घालण्यांत आली तर या लहान भागाचें मोठ्या भागाकडून शोषण होण्याचा संभव आहे. ही भीति वस्तुस्थितीसंबंधींच्या अत्यंत चुकीच्या कल्पनावर आधारलेली आहे. मुंबई राज्यांतील सर्वच मराठी जिल्हे प्राथमिक साधनसंपत्तीच्या बाबतींत सुरक्षित व सामर्थ्यवान् नसले तरी रत्नागिरीसारख्या गरीब जिल्ह्यांची उणीव किंवा देशावरील दुष्काळी भागाची उणीव खानदेश आणि कोल्हापूरसारख्या विकसित भागाकडून किंवा कालव्याखालीं असणाऱ्या संपन्न विभागांकडून भरून निघते. या प्रदेशाची आर्थिक रचनाहि त्यांतील विविध प्रकारची

साधनसंपत्ति आणि त्याचा औद्योगिक विकास यामुळें मजबूत झालेली आहे. आवश्यक ती माहिती उपलब्ध नसल्यामुळें महाराष्ट्र राज्यांत सामील होणाऱ्या या तीन प्रदेशांच्या आर्थिक सामर्थ्याची परस्पर तुलना करणें शक्य नाहीं. परंतु याबाबत दोन महत्त्वाच्या निदर्शकांचा आपणांस उपयोग करतां येईल. एक म्हणजे करभाराचें परस्पर प्रमाण आणि दुसरें संपन्नतेची अगर विकासाची पातळी. मुंबई राज्याच्या मराठी जिल्ह्यांतील लोकांना आज जो दरडोई करभार सहन करावा लागतो तो मध्य प्रदेशाच्या मराठी जिल्ह्यांतील लोकांवरील करभारापेक्षां थोडा अधिक आहे. म्हणून नवीन राज्यास मिळणारें दरडोई उत्पन्नाचें प्रमाण आज मध्यप्रदेशाच्या मराठी जिल्ह्यांना मिळत असलेल्या दरडोई उत्पन्नापेक्षां खात्रीनें कमी असणार नाहीं, आणि विकासाच्या बाबतींत या दोन प्रदेशांची तुलना करावयाची झाल्यास मुंबई राज्यांतील मराठी जिल्हे प्राथमिक शिक्षणाचे बाबतींत मध्यप्रदेशाच्या मराठी जिल्ह्यापेक्षां कितीतरी पुढें गेलेले आहेत आणि इतर प्रकारच्या शिक्षणाचीहि तेथें अधिक वाढ झालेली आहे. तसेंच मुंबई राज्याच्या मराठी जिल्ह्यांतील सहकारी चळवळीचा विचार करतां मध्यप्रदेशांतील मराठी जिल्ह्यांच्या मानानें तेथील सहकारी संस्थांचें उत्पन्नहि मोठें आणि त्यांचें कार्यक्षेत्रहि विविध आहे कोणत्याहि राष्ट्रविकास कार्याचे बाबतींत मध्यप्रदेशाचे मराठी जिल्हे विशेष पुढें गेले आहेत असें दिसून येत नाहीं. म्हणून नवीन राज्यांत मध्यप्रदेशाचे मराठी जिल्हे व मराठवाडा यापेक्षां मुंबई राज्यांतील मराठी जिल्ह्यांवर उत्पन्नाचा अधिक भाग खर्च करावा लागेल अशी बिलकूल परिस्थिति नाहीं. उलट नवीन राज्यास उपलब्ध होणाऱ्या चालू उत्पन्नांतील कांहीं भाग प्रथम सहकारी चळवळ व प्राथमिक शिक्षण यासारख्या महत्त्वाच्या बाबींवर खर्च करून त्याबाबतींत मागासलेल्या इतर भाग चा विकास आधीं घडवून आणावा लागेल. मुंबई राज्यांतील मराठी जिल्हे किंवा मध्यप्रदेशाचे मराठी जिल्हे अगर मराठवाडा या सर्वांची आज त्यांच्या विकासाच्या दृष्टीनें मोठी गरज म्हणजे मोठ्या धरण योजनांची आहे. हा दीर्घ मुदतीचा भांडवली खर्चाचा कार्यक्रम आहे. पण एकदां तो पुरा झाल्यावर उत्पन्नवाढीच्या स्वरूपांत त्याचा मोबदलाहि चांगलाच मिळणार आहे. आणि या भांडवली विकास कार्यक्रमा-बाबतहि, योजना तयार करणें, साधनसंपत्तीचा वापर करणें, तसेंच मध्यवर्ति सरकारकडून मदत मिळविणें इत्यादि सर्व बाबतींतील त्यांचें सामर्थ्य, ह्या तिन्ही प्रदेशाचें ऐक्य होण्यानें वाढणारच आहे आणि अशारीतीनें साधनसंपत्ति एकवटल्यानें सर्वांचा अखेर फायदाच होणार आहे.

(१३७). यापेक्षां मध्यप्रदेशाच्या आठ जिल्ह्यांचें एक लहान राज्य बनवावें हा एक पर्याय पुढें मांडण्यांत येतो. तसें झाल्यास लहान राज्यघटक बनवितांना किती अडचणी येतात हें स्पष्टपणें कळून येईल. नागपूर-वऱ्हाडचा भाग महाराष्ट्राच्या पश्चिम भागांशीं नैसर्गिक व सांस्कृतिक दृष्ट्या कसा पूर्णपणें एकजीव आहे हें वर सांगितलेंच आहे. अशीं कोणतींहि या आठ जिल्ह्यांचीं विशिष्ट लक्षणें नाहींत कीं ज्यासाठीं त्यांचें एक वेगळें राज्य बनविण्याची जरूरी भासावी. अशी सर्व परिस्थिति असतांना संपूर्ण महाराष्ट्राचें जें एकच राज्य होईल त्याच्या एकचतुर्थांश आकारमानाचें एक लहान राज्य जाणून बुजून बनविणें म्हणजे जन्मापासूनच त्याची दुर्दशा करणें व निष्कारण त्याच्यावर सतत अपुऱ्या उत्पन्नाचें संकट ओढवून घेणें होय.

कृत्रिम मागणी

(१३८) मराठवाड्याचे जिल्हे आणि मुंबई राज्यांतीलहि कांहीं मराठी जिल्हे महाविदर्भास जोडण्यांत येऊन त्यांचें एक वेगळें राज्य बनविण्यांत यावें असें जे महाविदर्भाचे पुरस्कर्ते म्हणतात त्यावरून त्यांची ही मागणी किती कृत्रिम आहे हें उघड होतें. महाविदर्भास हे इतर जिल्हे जोडण्याची मागणी हेंच दर्शवितें कीं मध्यप्रदेशाचे मराठी जिल्हे हा कोणताहि एक वेगळा एकशरीरी घटक नाहीं. हे आठ जिल्हे राज्यकारभाराच्या आणि आर्थिक दृष्टीनें समर्थ व स्वयंपूर्ण होऊन त्यांचें वेगळें राज्य बनण्याइतका तो मोठा घटक होत नाहीं याची ही अप्रत्यक्षपणें कबुली देण्यासारखेंच आहे. असा कृत्रिम घटक बनविण्यास अशीं कोणतीं महत्त्वाचीं कारणें आहेत तेंहि सांगण्यांत येत नाहीं. मराठवाड्याचे सामाजिक व सांस्कृतिक बंध मुंबई राज्यांतील मराठी जिल्ह्यापेक्षां वऱ्हाड-नागपूरच्या जिल्ह्यांशीं कोणत्याही दृष्टीनें विशेष दृढतर आहेत असें म्हणतां येत नाहीं. वर सांगितल्याप्रमाणें महाराष्ट्राच्या या सर्व प्रदेशांत या बाबतींत त्यांना विभागणारी अशी कोणतीही रेषा नाहीं. वऱ्हाडच्या लोकांचा निजामाशीं असणारा नाममात्र संबंध सोडला तर मराठवाडा व वऱ्हाड-नागपूर यामध्यें कोणतेहि राजकीय संबंध नव्हते आणि मराठवाड्याच्या किंवा वऱ्हाडच्या लोकांनीं निजामशीं असलेल्या संबंधाच्या स्मृति आतां उराशीं बाळगण्याचें कांहींच कारण नाहीं. भौगोलिक रचना पाहतां मराठवाड्याचे बहुतेक जिल्हे मध्यंतरी असलेल्या डोंगरांच्या रांगामुळें शेजारच्या वऱ्हाडच्या जिल्ह्यापासून वेगळे केले

जातात. या दोन्हीं भागास जोडणारा रेल्वे मार्ग अजूनपर्यंत नाहीं व रस्त्यांचे मार्गहि अगदीं थोडे आहेत. उलट मराठवाडा व मुंबई राज्यांतील मराठी जिल्हे यांना जोडणारे रेल्वे व रस्ते या दोन्ही प्रकारचे दळणवळणाचे भरपूर मार्ग असून मराठवाड्याचे एकंदर आर्थिक जीवन मुंबई शहर व मुंबई राज्य यांच्याशीं अत्यंत निगडित आहे. आणि या सर्वांपेक्षांहि मराठवाड्यांतील लोकांची इच्छा अशा एका कृत्रिम घटकाचा आपण भाग व्हावें अशी नसून सर्व मराठीभाषिकांचें एकच राज्य व्हावें हीच त्यांची प्रबळ इच्छा आहे.

आकोला व नागपूर करार

(१३९) या तिन्ही भागांचें मिळून एकच राज्य होणें हें उघड उघड इतकें फायद्याचें असतांना मग आकोला करार किंवा त्याच धर्तीवर अलीकडे झालेला नागपूर करार हे करण्याची पाळी कां यावी, असा प्रश्न विचारला जाण्याचा संभव आहे. याला उत्तर हेंच कीं मूलभूत सत्य आणि दूरवरचे परिणाम हे कितीहि स्पष्ट दिसत अ .ले तरी राजकीय स्वरूपाचे निर्णय पुष्कळ वेळां नजीकच्या काळाकडे व परिणामाकडे लक्ष देऊन घ्यावे लागतात आणि दूरदृष्टीनें ज्या गोष्टी अत्यंत महत्त्वाच्या असतात त्या संक्रमण–कालांतील अडचणीमुळें पुष्कळ वेळां झांकल्या जाऊन त्यांचें महत्त्व कमी होतें. पण त्याबरोबरच कायदे, महसूलपद्धति वगैरे भिन्न असल्यामुळें ज्या अडचणी निर्माण होतात त्यांची दखल घ्यावीच लागते. तसेंच निकटचा संबंध नसल्यामुळें जे संशय, गैरसमज निर्माण होतात त्यांचेंहि निराकरण करावें लागतें. ब्रिटिशांच्या सबंध कारकीर्दींत मध्यप्रदेशाचे मराठी जिल्हे व मुंबई राज्यांतील मराठी जिल्हे राजकीय दृष्ट्या नेहमीं वेगळे राहिले. राज्यपुनर्रचनेचा सर्वसामान्य प्रश्न शक्यतेच्या कोटींत येण्याच्या बरेंच अगोदर मध्यप्रदेशांतील मराठी जिल्ह्यांना त्यांच्या विशिष्ट अडचणी फार जाणवूं लागल्या होत्या व त्यामुळें या जिल्ह्यांतील पुढाऱ्यांनीं हिंदी जिल्ह्यापासून आपली फारकत करावी ही मागणी करण्यास सुरवात केली होती. महाविदर्भाची मागणी म्हणजे मध्यप्रदेशांतील आठ मराठी जिल्ह्यांच्या स्वतंत्र प्रांताची मागणी, संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन होण्यापूर्वी पुष्कळ वर्षें निश्चित स्वरूपांत करण्यांत आली होती व त्यासाठीं चळवळ करणाऱ्या खास संस्थाहि अस्तित्वांत आल्या होत्या. संयुक्त महाराष्ट्र परिषद स्थापन झाल्यावर तिच्यापुढें असणाऱ्या सुरवातीच्या अनेक प्रश्नामध्यें मूळची महाविदर्भाची मागणी बदलून त्याऐवजीं मराठी भाषिकांच्या एकाच राज्याची मागणी कशी पुढें नेतां येईल हा एक प्रश्न होता. त्याची सोडवणूक करण्याचे दृष्टीनें आक्टोबर १९४६ ते

ऑगस्ट १९४७ या कालांत अनेक वाटाघाटी होऊन निरनिराळ्या योजनांवर चर्चा झाली. अखेर संयुक्त महाराष्ट्रांत महाविदर्भाचा एक उपप्रांत करण्यांत यावा या योजनेवर एकमत होऊन ती मान्य करण्यांत आली व ज्यास 'आकोला करार' म्हटलें जातें त्यांत ती ग्रथित करण्यांत आली.

(१४०) मध्यप्रदेशाच्या द्विभाषिक राज्यांत मराठी भाषिकांच्या स्थितीबाबत जो तीव्र असंतोष निर्माण झाला होता त्यांतून ही महाविदर्भाची मागणी निर्माण झाली असल्यामुळें त्यावेळीं ही मागणी विशिष्ट भागापुरतीच अशी करण्यांत आली. सर्व मराठी भाषिकांचें एक राज्य ही व्यापक कल्पना त्यावेळीं दृष्टिपथांत आली नव्हती. आणि ती दृष्टिपथांत आल्यानंतर ज्या अडचणी निर्माण झाल्या त्या मुख्यत: स्थानिक हितसंबंधांच्या भीतिमुळें, विशेषत: नागपूर शहरासंबंधानें निर्माण झाल्या आहेत मराठी जिल्ह्यांचें बरेंच नुकसान गरीब असणाऱ्या हिंदी जिल्ह्यांशीं त्यांची सांगड घातल्यामुळें झालें. या मराठी जिल्ह्यांच्या उत्पन्नाचा व साधनसंपत्तीचा विनियोग अन्य भागांच्या विकासाकडे होऊं लागला. एकंदर मध्यप्रदेशाचें दरडोई सरकारी उत्पन्न अखिल भारतीय सरासरीपेक्षां पुष्कळच कमी आहे, पण या आठ मराठी जिल्ह्यांचें दरडोई उत्पन्न मात्र मागें सांगितल्याप्रमाणें अखिल भारतीय सरासरीपेक्षां जास्त आहे. मध्यप्रदेशांतून फुटून पुन: दुसऱ्या एका मोठ्या राज्यांत सामील होण्यानें आज जी परिस्थिति आहे त्यांत फारसा बदल होणार नाहीं अशी नागपूर–चन्द्याच्या लोकांना भीति वाटत होती. यासंबंधीं मागें चर्चा करण्यांत आलेलीच आहे. यापेक्षां महत्त्वाची आणि निश्चित स्वरूपाची वाटणारी भीति म्हणजे नागपूरच्या दर्जाबद्दलची. सध्यां नागपूर एका मोठ्या प्रांताच्या राजधानीचें व मध्यवर्ती असें ठिकाण आहे आणि नवीन राज्य बनल्यानें नागपूरचें महत्त्व अतिशय कमी होईल अशी त्यांना भीति वाटते. तथापि सरकारी कार्यालयांचें जर सोईस्कर विकेंद्रीकरण करण्यांत आलें व नागपूरचें इतर सर्व बाबतींतील महत्त्व कायम राखण्यांत आलें तर ही भीति वाटण्याचें कारण नाहीं. हें घडवून आणण्यासाठीं ज्या निरनिराळ्या योजना अगर मार्ग सुचविण्यांत आले आहेत ती स्वाभाविक अशीच व्यवस्था आहे आणि त्यामुळें सत्तेचें विकेंद्रीकरण होऊन राज्यकारभाराची कार्यक्षमताहि वाढणार आहे. हें घडून यावें हाच नागपूर कराराचा मुख्य उद्देश आहे.

(१४१) या सर्व अडचणींची दखल घेऊन सध्यांच्या व्यवस्थेंत फारसा बदल घडवून न आणतां एकच मोठें राज्य होण्याचे सर्व फायदेहि मिळतील अशी

कांहीं तडजोड आकोला करारांत करण्यांत आली होती. भारतीय प्रजासत्ताकाची घटना तयार होण्यापूर्वी हा आकोला करार करण्यांत आला होता. त्यांतील मूलभूत कल्पना उपप्रांताची होती, परंतु आतां ती विद्यमान राज्यघटनेच्या साच्यांत न बसणारी अतएव प्रत्यक्षांत न उतरणारी असल्यामुळें या सर्व प्रश्नांचा पुनः विचार करावा लागला. नागपूर * करार हा त्याच दिशेनें केलेला एक प्रयत्न आहे. त्याचा मूलभूत दृष्टिकोण व उद्दिष्ट आकोला कराराप्रमाणेंच आहेत. विद्यमान राज्यघटनेप्रमाणें एका राज्यांत एकच गव्हर्नर, एकच हायकोर्ट, एकच पब्लिक सर्व्हिस कमिशन, एकच मंत्रिमंडळ आणि एकच विधिमंडळ असूं शकतें. ही वरिष्ठ कारभाराची रचना तशीच कायम ठेवून इतर राज्यकारभाराची अनेक तऱ्हेनें जुळवाजुळव करून घेणें शक्य आहे आणि याप्रमाणें आज अनेक राज्यांतून प्रत्यक्ष ती केलीहि जात आहे. भावी कारभार-यंत्रणेबाबत तसेंच प्रत्यक्ष अंमलबजावणीच्या धोरणाबाबत सर्वांचा एकच दृष्टिकोण असल्यामुळें महत्त्वाच्या प्रादेशिक हितसंबंधांशीं संबंध येणाऱ्या प्रश्नाकडे पाहण्याचा सर्वसामान्य दृष्टिकोण कोणता हें आकोला कराराच्या या नवसंस्करणावरून—नागपूर करारावरून—कळून येतें. हा नागपूर करार कायद्याच्या स्वरूपांत व प्रथातेनें लागू करण्याचा शक्य तो सर्व प्रयत्न केला जाईल.

(१४२) मध्यप्रदेशांतील मराठीभाषी बहुसंख्य लोकांचा नागपूर करारास संपूर्ण पाठिंबा आहे असें निर्धास्तपणें म्हणण्यास कोणतीच हरकत नाहीं. महत्वाच्या व प्रातिनिधिक अशा व्यक्तींनीं याबाबत जें मतप्रदर्शन केलें आहे त्यावरूनच नव्हे तर प्रातिनिधिक संस्था, स्थानिक संघटना अगर इतर संस्था यांनींहि याबाबत जें मतप्रदर्शन केलें आहे त्यावरून ही गोष्ट स्पष्ट होते. महाराष्ट्राच्या आर्थिक जीवनाचें जें वैशिष्ट्य आहे आणि ज्याबद्दल पूर्वी ऊहापोह करण्यांत आला आहे, त्यामुळें नागपूर—वऱ्हाडमध्येंहि मराठीभाषी नसणाऱ्या व्यापारी व शहरी हितसंबंधी वर्गास बरेंच महत्त्व आलें आहे. या वर्गांतील कांहीं लोकांनीं महाविदर्भाचा स्वतंत्र प्रांत करावा ही मागणी केली असून सर्व मराठी भाषिकांचें एकच राज्य, ही गोष्ट दृष्टि-पथांत येण्यापूर्वी पुष्कळ वर्षे महाविदर्भाची चळवळ ज्यांनीं सुरू केली, अशा कांहीं महाविदर्भवाद्यांचाहि त्याला पाठिंबा आहे. तथापि आज महाविदर्भाचा वेगळा प्रांत करावा या मागणीला मुख्य पाठिंबा ज्या वर्गाकडून मिळत आहे त्यांचें समाजांतील वजन, आर्थिक व सामाजिक लोकशाहीची लाट जसजशी वर येत जाईल तसें कमी होत जाणार आहे, असें निर्धास्तपणें म्हणण्यास कांहींच हरकत नाहीं.

* नागपूर करार परिशिष्ट २ मध्यें देण्यांत आला आहे.

विभाग पांचवा

हैद्राबादचें विभाजन

विभाजनाची निकड

(१४३) भाषावार पुनर्रचना करतांना सध्यांच्या हैद्राबाद, मध्यप्रदेश व मुंबई या राज्यांची तसेंच आणखी इतर राज्यांचीहि विभागणी करावी लागेल. आंध्र राज्य निर्माण करण्यांत आलें त्यावेळीं मद्रासची अशीच विभागणी करावी लागली. म्हणून भाषावार राज्यरचना करावयाची म्हणजे हैद्राबादचें विभाजन ही क्रमप्राप्त गोष्ट आहे. वास्तविक हैद्राबादचें विभाजन हीच दक्षिणेंतील राज्यपुनर्रचनेची गुरुकिल्ली आहे. हैद्राबादचें विभाजन झालें नाहीं तोंपर्यंत आंध्र, महाराष्ट्र व कर्नाटक हीं राज्यें पूर्ण न बनतां छाटलेलींच राहणार व त्यामुळें त्यांच्या निकडीच्या गरजहि पुऱ्या होणार नाहींत. सध्यांच्या आंध्रराज्याची आयव्ययविषयक परिस्थिति आजच्या प्रमाणें हलाखीचीच राहून शिवाय राजधानीचें शहर उभारण्यासाठीं तसेंच तुंगभद्रा व नांदिकोंडा या धरणयोजना पुऱ्या करण्यासाठीं त्याला आणखी भांडवली खर्च करावा हा लागणारच; आणि कृष्णेवरील धरणयोजना तर दूरचें स्वप्नच म्हणावें लागेल. उलट हैद्राबादमधील तेलंगणाचा भाग आंध्र राज्यांत समाविष्ट केल्यानें अनायासें हैद्राबादसारखें राजधानीचें शहर उपलब्ध होईल व राज्याचें अंदाजपत्रक आजच्या दुपटीनें वाढून तें रु. ४२ कोटींपर्यंत जाईल. त्यामुळें आंध्र राज्याची आर्थिक परिस्थिती बरीच सुधारेल आणि त्याला वर उल्लेखिलेल्या व इतर विकासयोजना पुऱ्या करण्याचा साकल्यानें विचार करतां येईल.

(१४४) हैद्राबाद राज्यांतील तीन भाषिक प्रदेशांच्या भिन्नभिन्न गरजा पुऱ्या करावयाच्या तर हैद्राबादचें विभाजन करावेंच लागेल. हे तीन भाग भाषेच्या दृष्टीनें वेगळे आहेत एवढेंच नव्हे तर भूरचना, उद्भिज्य संपत्ति, शेती व औद्योगिक विकास या सर्व बाबतींत या तीन प्रदेशांत भिन्नता आढळून येते. हैद्राबाद राज्य हें विशिष्ट ऐतिहासिक कारणामुळें अस्तित्वांत आलें असून नैसर्गिकदृष्ट्या एकावयवयी असा घटक ते नाहीं. तसेंच ह्या राज्याचा पूर्वेतिहास आणि परंपराहि अशा नाहींत कीं त्यांची स्मृति कोणत्याहि अभिमानानें अगर आनंदानें जागृत व्हावी. "हिंदुस्थानांतील ब्रिटिश साम्राज्याच्या तो गुरुत्वमध्य.' होता आणि प्रतिगामी जातीयवाद

व सरंजामशाही यांचें तें मोठें केंद्र होतें. येथील राज्ययंत्रणा जुलमी आणि जातीय होती एवढेंच नव्हे तर या राज्यांतील ४२ टक्के क्षेत्र नबाब व जहागीरदार यांच्या ताब्यांत होतें. सध्यां तेथें ब्रिटिशांची सत्ता अगर निजामाचें राज्य नसलें आणि जहागिरी नष्ट करण्यांत आल्या असल्या तरी तेथील लोकशाहींविरोधी परंपरा आणि सरंजामी पीठ अजून तशींच आहेत. त्यामुळें हिंदुस्थानच्या सुरक्षिततेस प्रत्यक्ष धोका नसेल, पण राष्ट्रीय सामर्थ्य त्या वाढवूं शकत नाहींत हें निश्चित. हैद्राबादचें विभाजन झाल्यानें तेथील जनतेचा आंध्र, महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील लोकांबरोबरीनें स्वतःचा उत्कर्ष करण्याचा मार्ग मोकळा होईल एवढेंच नव्हे, तर त्यामुळें सरंजामी प्रतिगामित्वाला कायमची मूठमाती दिल्यासारखें होईल.

(१४५) हैद्राबादचें विभाजन ही अत्यंत जिव्हाळ्याची गोष्ट आहे हें विशेष जोरानें मांडण्याची आवश्यकता नाहीं. दक्षिणेंतील लोकांवर सर्व मार्गांनीं परकीय सत्ता लादणें ही ह्या राज्याची पूर्वपरंपरा असून येथील बहुसंख्य प्रजाजन त्याच्याकडे नेहमीं संशय व शत्रुत्वाचे दृष्टीनेंच पहात आले आहेत. हें राज्य यापुढें असेंच राहूं देणें म्हणजे या ऐतिहासिक काळाची स्मृति जिवंत ठेवणें होय, आणि तें राहूं देण्याचा आग्रह धरण्यानें निरनिराळ्या धार्मिक व भाषिक जमातींमधील विघडलेले परस्पर-संबंध व भावना किंबहुना दक्षिण व उत्तर यांमधील वितुष्टहि कायम राहतील. राज्यपुनर्रचनेच्या दृष्टीनें हैद्राबादचें विभाजन अत्यंत जरूर आहेच, पण त्याखेरीज या दुःखद स्मृति व हा दुष्ट भूतकाल पूर्णपणें गाडून टाकण्यासाठींहि हैद्राबादचें विभाजन करणें अत्यंत निकडीचें आहे.

(१४६) ही वास्तविक पार्श्वभूमि लक्षांत घेऊन मग हैद्राबाद एक "स्थैर्य निर्माण करणारी शक्ति' आहे किंवा त्यानें एक ऐक्यवर्धक 'दख्खनी संस्कृति" निर्माण केली असें जें सांगितलें जातें त्याची छाननी करणें जरूर आहे. हैद्राबाद राज्य स्थापन झाल्यापासूनचा त्याचा इतिहास काळजीपूर्वक अभ्यासिला तर कळून येईल कीं या राज्यानें आपल्या कारकीर्दीच्या पहिल्या शतकांत मराठे व म्हैसूरचे राज्य यांच्या विरुद्ध ब्रिटिशांना दक्षिणेंत त्यांची सत्ता प्रस्थापित करण्यास मुख्यतः मदत केली आहे. त्यानंतर त्यांना मोठाले प्रदेश बहाल करून ब्रिटिश साम्राज्याचा आर्थिक पाया मजबूत करण्यासहि त्यानेंच मदत केली. अगदीं अलीकडच्या काळांत निजामाच्या सामाजिक वजनाचा उपयोग करून मुसलमानांचा वाढता असंतोष दडपून टाकण्यास ब्रिटिशांना त्याची मदत झाली आणि हें करीत

असतांनाच निजामानें व त्यांच्या सल्लागारांनीं दक्षिणेच्या लोकांवरील आपली परकी जातीय व सांस्कृतिक सत्ता वाढवून ती मजबूत करण्याचा प्रयत्न केला, आणि त्यांच्या प्रयत्नाचा एक भाग म्हणजे ही तथाकथित दख्खनी संस्कृतीची कल्पना. या राज्यांतील सत्ताधारी वर्ग हा नेहमीं तेथील लोकांना परका असाच राहिला, आणि ज्यांच्या सहाय्यानें निजामनें आपली सत्ता दृढमूल केली त्या नवाब व जहागिरदार वर्गापुरतीच ही संस्कृति राहिली. या संस्कृतीचा तेथील सामान्य लोक, त्यांची भाषा, साहित्य व कलात्मक परंपरा यांच्याशीं कांहींहि संबंध नव्हता.

" दख्खनी संस्कृतीचें " खरें स्वरूप

(१४७) विशेषतः या 'दख्खनी संस्कृती' ची कल्पना निजामाच्या मोठमोठ्या महत्वाकांक्षा होत्या त्यावेळीं म्हणजे विसाव्या शतकाच्या पहिल्या दशकांत प्रचारांत आली. या महत्वाकांक्षेस अनुसरून अलिगड, उत्तर प्रदेश व बिहार यामधून शिकलेल्या मुसलमानांची या राज्यांत पद्धतशीर रीघ लावण्यांत आली व उस्मानिया विद्यापीठ स्थापन करण्यांत येऊन माध्यमिक व विश्वविद्यालयीन शिक्षणक्रमांत ऊर्दू हो शिक्षणाचें माध्यम करण्यांत आली. तसेंच कोर्टाची व राज्यकारभाराची भाषा ऊर्दू हीच झाली, आणि राज्यांतील बौद्धिक जीवनावर सर्वत्र ऊर्दूचा पगडा बसला व प्रादेशिक भाषांची अभिवृद्धि होण्यास अवकाशच राहिला नाहीं. या पक्षपाती धोरणामुळें इ. स. १९११ ते १९४१ या कालावधींत मुसलमानांतील साक्षरतेचें प्रमाण १२·५ टक्क्यांपासून ७७·१ टक्क्यांपर्यंत वाढलें आणि याच काळांत हिंदू लोकसंख्येतील साक्षरतेचें प्रमाण मात्र ३·८ टक्क्यांपासून १७·१ टक्क्यांपर्यंतच चढलें. एवढेंच नव्हे तर मुसलमान विद्यार्थिनींची संख्या हिंदु विद्यार्थिनींपेक्षां जास्त होती.

(१४८) सध्यांच्या निजामसाहेबांच्या कामगिरीचें वर्णन करतांना सर वुइल्यम बार्टननें म्हटलें आहे, " शेवटीं असें म्हणावेंच लागेल कीं हिंदुस्थानांतील मुसलमानांची संस्कृति व परंपरा राखणें हें निजामाचें कर्तव्य मानलें जातें आणि बहुतेक हिंदी मुसलमानांच्या सर्व आशा-आकांक्षा हैद्राबाद आणि त्याचे राज्यकर्ते यामध्यें केंद्रित झाल्या आहेत." राजकीय क्षेत्रांतहि या दक्षिणी राष्ट्रीयत्व आणि दख्खनी संस्कृतीच्या कल्पनांचा आविष्कार झाला होता. हैद्राबादची घटना तयार करण्यासाठीं जी सुधारणा कमिटी नेमली होती तिची यासंबंधींची मूलभूत कल्पना पुढीलप्रमाणें होती—

" राज्यप्रमुखाच्या—राजाच्या—व्यक्तींतच सर्व जनता प्रत्यक्ष प्रतिबिंबित झालेली असते, म्हणून जनतेशीं असणारा त्याचा संबंध कोणाहि हंगामी निवडून आलेल्या प्रतिनिधींपेक्षां केव्हांहि जास्त नैसर्गिक व दृढतर असतो. राज्याचा जसा तो सार्वभौम असतो त्याबरोबरच लोकांच्या सार्वभौमत्वाचें अधिष्ठानहि तोच असतो. "

(१४९) राजकीय सुधारणांच्या संबंधानें विवेचन करतांना मंत्र्यांच्या कौन्सिलनें म्हटलें आहे, " कांहीं मुसलमानांनीं विभक्त मतदार संघाची मागणी केली असून सर्व प्रातिनिधिक संस्थामध्यें त्यांना कायदेशीर बहुमत हवें आहे. त्या उलट कांहीं हिंदूनीं लीग ऑफ नेशन्सनें मान्य केलेल्या अल्पसंख्याकांना त्यांच्या प्रतिनिधित्वाप्रमाणें तें ठरविण्यांत यावें व मुसलमान म्हणून त्यांना कोणतेहि जादा हक्क दिले जाऊं नयेत अशी मागणी केली आहे. या दोन्ही टोकांचा, दख्खनी राष्ट्रीयत्व अगर ऐक्यभावना या कल्पनाशीं मेळ घालणें कौन्सिलला अशक्य वाटतें. शिवाय मुसलमानांना त्यांच्या ऐतिहासिक स्थानामुळें व राजकीय जीवनांतील त्यांच्या दर्जामुळें आलेलें महत्त्व कमी करून विधिमंडळांतील एका अल्पसंख्याक गटाच्या दर्जापर्यंत त्यांना खालीं नेतां येणार नाहीं हें उघड आहे."

(१५०) या विचारसरणीमुळें हैद्राबादमधील जनतेला कोणतेहि नागरिकत्वाचे हक्क मिळाले नाहींत. सांस्कृतिक व सामाजिक संस्थांकडेहि नेहमीं संशयपूर्ण दृष्टीनेंच पाहिलें जाई. इकडे हैद्राबादमधील जनतेच्या जीवनाच्या सर्व क्षेत्रांतील आशा—आकांक्षा दडपल्या जात होत्या आणि तिकडे राज्यकर्त्यांच्या दख्खनी राष्ट्रीयत्वाची वाढ होत होती. अखेर याचें पर्यवसान हैद्राबाद हें एक स्वतंत्र राष्ट्र आहे असें निजामानें म्हणण्यांत झालें. त्यावेळीं हैद्राबादमध्यें जी परिस्थिती होती त्याचें वर्णन हैद्राबाद-संबंधींच्या शुभ्र पत्रिकेंत (व्हाइट पेपर) उत्तमरीतीनें केलें आहे:—" आज हैद्राबाद मध्ययुगीन सरंजामशाहीचा एक बालेकिल्ला आहे एवढेंच नव्हे तर लष्करी झोटिंगशाही व जातीय वेडरूपी प्लेगानें दूषित झालेला तो भाग आहे. हैद्राबादची राजकीय घडण म्हणजे लोकशाहीचा संपूर्ण अभाव असून ज्या रझाकार विचारप्रणालीचा त्याच्यावर पगडा बसला आहे त्यामुळें ती साहजिकच जनतेचें स्वातंत्र्य व लोकशाही या कल्पनांच्या पूर्णपणें विरोधी आहे." ' दख्खनी संस्कृति ' व ' दख्खनी राष्ट्रीयत्व ' यांचें खरें स्वरूप असें आहे.

(१५१) म्हणून हैद्राबादमध्यें संयुक्त, समावेशक अशा एका ' दख्खनी संस्कृती 'ची वाढ झाली अगर ती तेथें आज अस्तित्वांत आहे असें म्हणणें हें

वस्तुस्थितीला अगदीं सोडून आहे. समावेशक संस्कृतीची वाढ व्हावयाची तर त्यांतील भिन्नभिन्न घटक संस्कृतींचा परिपोष, परस्परांच्या परंपरांचे व गुणाचें ग्रहण करून ते आत्मसात करण्याची वृत्ति आणि सहनशीलता व सदिच्छा यांचें वातावरण आणि शांततामय व विकासी जीवन या गोष्टी असल्या तरच वाढ होऊं शकतें. हैद्राबादमध्यें अशी परिस्थिति होती काय ? याचें उत्तर निश्चितपणें नकारार्थीच येईल. वास्तविक हैद्राबादच्या राज्यकर्त्यांची तसेंच या दख्खनी संस्कृतीच्या पुरस्कर्त्यांची अशी कांहीं कल्पना मुळांत नव्हतीच. साहजिकच गेल्या दोनशें वर्षांत हैद्राबादमध्यें साहित्य व कला यांचें क्षेत्रांत किंवा तेथील एकंदर सामाजिक जीवनांत महत्त्वाचें असें कांहींच घडून आलेलें नाहीं. स्थानिक संस्कृति व परंपरांचें गुणग्रहण करून त्यांना समाविष्ट करणारी अशी कोणतीही समाईक संस्था हैद्राबादमध्यें वाढूं शकली नाहीं. तेलंगण, मराठवाडा व कर्नाटक यांतील लोकांनीं आपापलें वैशिष्ट्य अगर व्यक्तित्व तसेंच वेगळेपणानें टिकविलें व राज्याबाहेरील त्या त्या सामाजिक व सांस्कृतिक गटांचें साहित्य व कला हेंच त्यांचें नेहमीं स्फूर्तिस्थान राहिलें.

(१५२) एकंदर वस्तुस्थिति अशी असल्यामुळें, 'इतिहास,' 'स्थैर्य निर्माण करणारी शक्ति,' 'दख्खनी संस्कृति' व 'दख्खनी राष्ट्रीयत्व' असल्या कांहीं सबबीवर हैद्राबादच्या विभागणीला विरोध करणें पूर्णपणें असमर्थनीय व निर्बुद्धपणाचें आहे. हैद्राबादच्या जनतेच्या प्रगतीच्या दृष्टीनें एवढेंच नव्हे तर खुद्द भारताच्या हिताचे दृष्टीनेंहि हैद्राबादची विभागणी झालीच पाहिजे.

मराठवाडा : महाराष्ट्राचा एकजीव भाग

(१५३) हैद्राबादचें विभाजन एकदां झालें म्हणजे त्यांतील तेलंगण, मराठवाडा व कर्नाटक या विभागांचे आंध्र, महाराष्ट्र व कर्नाटक या शेजारच्या प्रदेशांत विलीनीकरण करणें सोपें होईल आणि त्यांचीं राज्यें बनल्यानंतर लोकांवर शतकानुशतकें होत आलेला सांस्कृतिक जुलूम थांबून एका नव्या स्वतंत्र वातावरणांत त्यांना वावरतां येईल व त्यांच्यामध्यें सामाजिक व सांस्कृतिक ऐक्याची जाणीव निर्माण होईल. तसेंच त्यामुळें लोकांमध्यें आत्मविश्वास, जबाबदारीची जाणीव व ध्येयवादित्व हींहि निर्माण होतील. यासाठीं मराठवाड्यांतील सर्व प्रातिनिधिक संस्था व संघटना, तसेंच मराठवाड्यांतील सर्व खासदार व आमदार (संसदेचे व विधिमंडळाचे सदस्य) हैद्राबादच्या विभाजनाला व मराठवाड्याचें महाराष्ट्रांत विलिनीकरण करण्याला पूर्ण व निःसंकोच पाठिंबा देत आहेत.

(१५४) मराठवाडा हा सतत महाराष्ट्रांतर्गत असाच भाग राहिला आहे. महाराष्ट्रांतील बहुतेक साधुसंत मराठवाड्यांतील असून महाराष्ट्र व मराठवाडा यांच्या सांस्कृतिक व आत्मिक ऐक्याची ती मोठी खूण आहे. साहित्याचे क्षेत्रांत तर मराठवाड्यांतील संतमंडळींनींच प्रथम आपल्या साहित्याच्या द्वारां मराठी साहित्याचा पाया घातला. तथापि पुढें परिस्थिति बदलल्यामुळें मराठी साहित्याचें हें केंद्र पुणें, मुंबई व नागपूर या ठिकाणीं गेलें आणि तेथून मराठवाड्यांतील साहित्यिक जीवनास स्फूर्ति मिळूं लागली.

(१५५) त्याचप्रमाणें मुंबई व तेथील उद्योगधंद्यांशीं मराठवाड्याचे आर्थिक व व्यापारी संबंध अत्यंत निगडित आहेत. मराठवाड्याचा बहुतेक सर्व व्यापार मुंबईशीं होतो, म्हणून साहजिकपणेंच मुंबई हें मराठवाड्याच्या आर्थिक जीवनाचें एक केंद्र आहे. मराठवाडा व महाराष्ट्र यांची जमीन व भूरचना सारखीच असून दोन्ही भागांच्या शेतीविषयक गरजा जवळजवळ सारख्याच आहेत. यावरून हें लक्षांत येईल कीं मराठवाड्यांतील भूतकालीन तसेंच वर्तमानकालीन लोकजीवन महाराष्ट्राच्या इतर सर्व प्रदेशांतील लोकजीवनाशीं अत्यंत निगडित आहे.

समारोप

(१५६) शेवटीं समारोपादाखल सांगावयाचें म्हणजे राज्यपुनर्रचनेबाबत मराठी भाषिकांना वाटणारी एवढी उत्कंठा, विद्यमान राज्यव्यवस्थेंत त्यांची जी निकृष्ट अवस्था झाली आहे, त्यांमुळें निर्माण होत आहे. भारतामध्यें इतर कोणत्याहि भाषिकांपेक्षां फक्त मराठी भाषिकच आज निरनिराळ्या तीन राज्यांमध्यें विभागले गेले आहेत व फक्त मराठी भाषिकांनाच तेवढें स्वतःचें राज्य नाहीं, म्हणजे ज्या राज्यांत प्रामुख्यानें मराठी भाषिक आहेत असें राज्य नाहीं. म्हणून हा प्रश्न सुटावा यासाठीं त्यांनाच सतत आग्रह धरावा लागत आहे. तशी वेळ आली म्हणजे इतर भाषिकहि तितकीच उत्कंठा दाखवितात, निदान त्यांच्या भावनाहि तितक्याच जागृत होतात हेंहि लक्षांत ठेवण्यासारखें आहे. हिंदी भाषिकांखेरीज इतर भाषिकांमध्यें, गुजरात व तामिळनाडचे पुढारी या प्रश्नाबाबत अगदीं उदासीन असून त्यांना याबद्दल कसलीहि आस्था वाटत नाहीं असें मानलें जातें. परंतु परीक्षेचा प्रसंग आला त्यावेळीं म्हणजे अबू अगर डांगचा प्रश्न निर्माण झाला असतांना किंवा मद्रास शहराचा प्रश्न निर्माण झाला त्यावेळीं इतर भाषिकांच्या पुढाऱ्यांप्रमाणेंच गुजराती व तामिळ

पुढाऱ्यांच्या भावनाहि चटकन् जागृत झाल्या. प्रत्यक्ष भाषावार प्रांतरचनेच्या प्रश्नाशीं संबंध नसला तरी अशासारखे प्रश्न उद्भवले म्हणजे हिंदी भाषिकहि कसे चटकन् प्रक्षुब्ध होतात हें उत्तर प्रदेशाची विभागणी करून त्याचे दोन प्रांत करण्यांत यावेत अशी सूचना पुढें आली असतां उत्तर प्रदेशांतील कांहीं पुढाऱ्यांनीं त्याला जो तीव्र विरोध केला त्यावरून कळून येण्यासारखें आहे.

(१५७) म्हणून कमिशनचें कार्यक्षेत्र कितीहि मर्यादित असलें तरी त्यांनीं याबाबत कांहींतरी निर्णय देणें अवश्य आहे आणि तो निर्णय निव्वळ राजकीयदृष्ट्या योग्य असून उपयोगी नाहीं तर तो राजकीयदृष्ट्या टिकाऊहि असला पाहिजे, हें येथें आग्रहानें सांगणें अवश्य आहे. लोकांच्या योग्य मागण्या पुऱ्या न करणारा व इतर लोक ज्या जीवनस्थितीचा आज प्रत्यक्ष उपभोग घेत आहेत ती कांहीं विशिष्ट लोकांना मात्र उपभोगतां येणार नाहीं असें सांगणारा कोणताहि निर्णय टिकाऊ म्हणून मान्य केला जाणें शक्य नाहीं. देशांतील कांहीं लोकांस अगर एकाद्या विभागास दडपून टाकणें अगर त्यांना त्रास देणें शक्य आहे हें खरें, परंतु या मार्गानें अखेर कोणाचाच फायदा होत नाहीं असा इतिहासाचा सार्वत्रिक अनुभव आहे. म्हणून जो निर्णय पूर्णपणें न्याय्य असून भारतांतील यच्चयावत् नागरिकांना सारखाच लेखणारा असेल तोच टिकाऊ ठरेल. इतरांपेक्षां आपल्याला वेगळ्या रीतीनें वागविण्यांत येत आहे असें जर एकाद्या भाषिक गटाला दिसून आलें तर त्याचा अर्थ असा करण्यांत येईल कीं इतरांना ज्या तऱ्हेचे नागरिक हक्क आहेत तसले त्या गटाला नाहींत.

(१५८) महाराष्ट्राचें राज्य निर्माण करतांना अनेक महत्त्वाचे तात्त्विक मुद्दे उपस्थित होतात. पहिला मुद्दा म्हणजे कोणतेंहि राज्य बनविण्यासाठीं एकभाषित्व हाच मुख्य पाया मानण्याचा. हाच पाया मानणें कसें युक्त आहे याचें आम्ही विस्तृत विवेचन केलेंच आहे. कमिशनकडे निर्णयासाठीं जे प्रश्न सोंपविले आहेत त्यावरूनहि आम्ही जो दृष्टिकोण मांडला आहे तोच युक्त आहे असें दिसून येतें. आमचें म्हणणें एवढेंच कीं राज्यपुनर्रचनेसाठीं आम्ही जी गोष्ट पायाभूत मानली आहे ती कमिशनला मान्य नसेल तर हिंदुस्थानांतील बहुतेक विद्यमान राज्यांची पुनर्रचना करून तीं बहुभाषिक करणें जरूर आहे, अशी त्यांना शिफारस करावी लागेल. आमच्या मागणीमुळें आणखी निर्माण होणारा प्रश्न म्हणजे मोठ्या शहरांचा. या बाबतींतहि पूर्वीपासून जी व्यवस्था आहे ती लक्षांत घेतां, एवढेंच नव्हे तर अलिकडे अशा शहरांची जी व्यवस्था करण्यांत आली ती पाहतां, यासंबंधीं आम्ही मांडलेली बाजूच बळकट होत आहे. मद्रास शहर आंध्राच्या सरहद्दीपासून अगदीं नजीक

आहे त्यापेक्षां मुंबई शहर गुजरातच्या सरहद्दीपासून कितीतरी लांब आहे. मद्रास प्रांत बनविण्यांत आला तेव्हांपासून मद्रास एका बहुभाषिक राज्याच्या राजधानीचें ठिकाण आहे. तरी देखील आंध्र राज्य निर्माण करतांना मद्रास शहर उर्वरित राज्यांत राहिलें आणि सध्यांच्या मद्रास राज्याच्या सरहद्दीमध्यें योग्य ते फेरबदल झाल्यानंतर तें तामिळ राज्याच्या राजधानीचें ठिकाण होईल. त्याचप्रमाणें न्यायमूर्ती श्री. मिश्र यांनीं बल्लारीच्या प्रश्नाची छाननी करून सांगितलें कीं, बल्लारी शहरा-भोंवतालच्या प्रदेशांतील लोकसंख्येची अंतर्रचना अगर भाषिक घडण लक्षांत घेतां तें शहर कोणीकडे घालावें हें ठरविण्याबाबत त्या शहरांतील लोकसंख्येची अंतर्रचना अगर भाषिक घडण कशी आहे हा कांहीं महत्वाचा मुद्दा ठरत नाहीं. हिंदुस्थानांतील अनेक मोठया शहरांतील लोकसंख्या भाषिकदृष्टया मिश्र असून बंगलोरसारखीं हि कांहीं शहरें त्यामध्यें आहेत कीं जेथील लोकसंख्येंत बाहेरून आलेल्या एका भाषिकांची संख्या तेथील प्रादेशिक भाषिकांपेक्षां जास्त आहे. तथापि असें असलें तरी त्यामुळें ज्या प्रदेशांत आणि राज्यांत तें शहर आहे त्याचें तेथील स्थान अगर दर्जा बदलतो अगर बदलणें शक्य आहे असें बिलकूल मानलें जात नाहीं. म्हणून हिंदुस्थानांतील इतर शहरांहून फक्त मुंबई शहर तेवढें वेगळें ठरवून त्याचेसाठीं वेगळी तत्त्वप्रणाली लागू करणें केव्हांहि न्याय्य ठरणार नाहीं.

(१५९) तिसरा प्रश्न म्हणजे बोली अगर सदृश भाषांबाबत कोणतें धोरण स्वीकारावें हा. कोंकणी भाषिक मराठी भाषिकांहून वेगळे आहेत असा कमिशनचा अभिप्राय असल्यास तेंच तत्त्व कच्छी, तुलु, किंवा व्रज, अवधी, मैथिली इत्यादि इतर बोलींच्याबाबतहि लागू करावें लागेल. कारण एक स्वतंत्र भाषा म्हणून मानली जाण्याचा हक्क कोंकणीपेक्षां या भाषांना अगर बोलींनाच अधिक पोंचत आहे.

(१६०) शेवटचा प्रश्न म्हणजे तद्भाषिक बहुसंख्याक लोकांची आपलें एकच राज्य असावें ही इच्छा असतांना आणि त्यांची दोन वेगळीं राज्यें करण्यास कोणतींहि समर्पक कारणें नसतांना त्या एकभाषिकांची दोन किंवा त्याहून अधिक वेगवेगळीं राज्यें करावीं कीं नाहीं हा होय. राज्यें लहान असणें इष्ट आहे असली मोघम कल्पना मराठी भाषिकांच्या एका गटाबाबत मान्य केल्यास ती इतर प्रदेशांनाहि लागू करणें क्रमप्राप्त होईल. एक कोटी किंवा त्याहूनहि कमी लोकसंख्या असणाऱ्या प्रदेशांचीं राज्यें बनविण्याचें ठरविल्यास सबंध हिंदुस्थानचा नकाशा बदलून नवा काढावा लागेल व त्यामध्यें मग तीस किंवा त्याहूनहि अधिक राज्यें असलेलीं दिसतील.

आणि पर्यायानें याचा अर्थ भारताच्या राज्यघटनेंत निर्देशिलेल्या प्रमुख भाषांपैकीं बहुतेक भाषांच्या प्रदेशांत एकापेक्षां अधिक राज्यें बनविणें जरूर आहे असा होईल. कांहीं वजनदार व हितसंबंधी लोकांच्या एका गटाची तशी इच्छा आहे म्हणून व ते त्यांची तरफदारी करतात म्हणून जर महाविदर्भाचा वेगळा प्रांत करण्यांत आला तर इतर विद्यमान अगर भावी एकभाषिक घटक याप्रमाणेंच फोडावे लागतील. या ठिकाणीं हें लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं मराठवाड्यांतील कोणीहि आपला प्रदेश महाविदर्भाशीं जोडण्यांत यावा अशी इच्छा प्रदर्शित केलेली नाहीं, तेव्हां या परिस्थितींत तेथील लोकांच्या इच्छेविरुद्ध त्याचा कांहीं भाग महाविदर्भात सामील करून एक कृत्रिम प्रांत निर्माण करणें कितपत युक्त आहे याचा कमिशननें गंभीरपणें विचार करणें जरूर आहे.

(१६१) राज्यरचना करतांना लोकांच्या इच्छेला विशेष महत्व देणें जरूर आहे असें आमचें मत आहे. लोक इच्छितात तें कोणत्याहि राष्ट्रीय महत्त्वाच्या तत्त्वाविरुद्ध अगर हितसंबंधाविरुद्ध नाहीं, आणि देशांत आज इतरत्र जें केलें जातें त्यापेक्षां तें कांहीं निराळेंहि नाहीं अशी वस्तुस्थिति असेल तर या प्रश्नांबाबत लोकांच्या इच्छा याच सर्वश्रेष्ठ मानल्या जाव्यात. दुसऱ्या कोणत्याहि कारणासाठीं कां नसेना, पण निदान चिरकालीन राजकीय स्थैर्यासाठीं हें आवश्यक आहे. सार्वत्रिक अनुभवहि हाच आहे कीं एका समान राजकीय जीवनाची व त्यासाठीं कष्ट करण्याची ऊर्मि निर्माण व्हावयाची तर लोकांच्या इच्छांना फार महत्त्व असतें. केवळ नैसर्गिक व सांस्कृतिक दृष्ट्याच तो एकजीव आहे असें नव्हे तर तेथील लोकांचीहि तो तसा असल्याची प्रबळ भावना आणि जाणीव असल्यास त्या एका एकसंधी एकात्म प्रदेशांतून कृत्रिमपणें कांहीं लहान अगर मोठें प्रदेश तोडून वेगळे काढल्यास त्यास लोकांचा विरोध तर होईलच, परंतु या तोडून वेगळ्या केलेल्या कृत्रिम घटकांतील लोक तसेंच त्याबाहेरील लोकहि पुनः तो एकसंध करण्याचा व त्यांच्या मनानें जें घेतलें आहे तें अखेर घडवून आणण्याचा सतत प्रयत्न केल्याखेरीज कधींहि रहाणार नाहींत.

परिशिष्ट १ लें

मुंबई, मध्यप्रदेश व हैद्राबाद राज्यांतील मराठी जिल्ह्यांचें क्षेत्रफळ व लोकसंख्या (सन १९५१ च्या शिरगणतीप्रमाणें)

मुंबई राज्य

जिल्हा	क्षेत्र चौ. मैल	एकूण लोकसंख्या	मराठी भाषिक	मराठीचें शें. प्रमाण	इतर महत्वाच्या भाषांचें शें. प्रमाण
१) पूर्व खानदेश	४४६७	१४७१३५१	१२६२४५२	८६	
२) पश्चिम खानदेश	५४०५	११४६०२४	६७२४७९	५९	२८ भिली
३) नाशिक	६०१३	१४२९९१६	१२७८९२८	८९	
४) अहमदनगर	६४७२	१४१०८७३	१२७७७४२	९०	
५) सोलापूर	५८१४	१५०५३१६	१०९०५६२	७२	१३ कानडी
६) पुणें	६०२३	१९५०९७६	१६८५०६६	८६	
७) उत्तर सातारा	४०२३	११७५३०९	११२५७२७	९६	
८) दक्षिण सातारा	३३२४	१०००१४१	८२६०६८	८३	१० कानडी
९) कोल्हापूर	२७९४	१२२७५४७	१०३८५०४	८५	
१०) रत्नागिरी	४९८३	१७११९६४	१६३६००२	९६	
११) कुलाबा	२७१२	९०९०८३	८४६९९६	९३	

जिल्हा	क्षेत्र चौ. मैल	एकूण लोकसंख्या	मराठी भाषिक	मराठीचें शें. प्रमाण	इतर महत्वाच्या भाषांचें शें. प्रमाण
१२) ठाणें	३७५६	१५१८०५०	११३७५१३	७५	१० गुजराती
१३) डांग	६५८	४७२८२	४५०१७	९६	
१४) बृहन् मुंबई	९१	२८३९२७०	१२३६८७४	४४	१८ गुजराती
				४ कोंकणी	१० उर्दु
एकूण	५६५४३	१९३४३१०२	१५१५३५३०	७८	

सरहद्दीवरील प्रदेश व द्विभाषिक तालुके—मुंबई राज्य

बेळगांव जिल्हा

१) चंदगड	३९४	१४४४८८		* ९४	
२) खानापूर	६७५	८८३४१		* ५७	* ११ कानडी
३) बेळगांव	३९४	१५४७४७		* ४६	* ३६ कानडी
४) अथणी	७४४	१८५६०९		* १८	* ७२ कानडी
५) चिकोडी	४७९	१७४४२०		* ४२	* ४९ कानडी
६) हुकेरी	३८२	१४६००६			
७) रायबाग	३७२	९१४४९			

सरहद्दीवरील प्रदेश व द्विभाषिक तालुके—मुंबई राज्य

तालुका	क्षेत्र चौ. मैल	एकुण लोकसंख्या	मराठी भाषिक	मराठीचें शें. प्रमाण	इतर महत्वाच्या भाषांचें शें. प्रमाण
कारवार जिल्हा					
१) सुपा	७३२	१८१५९	[illegible]	१२ * ७८ कोंकणी	
२) कारवार	२८४	७८७२५	[illegible]	१ * ७० कोंकणी	* २१ कानडी
३) हलियाळ	३१५	३६५१६	[illegible]	* ५३ कोंकणी	* २९ कानडी
४) यल्लापूर	५०८	३९११२६	[illegible]	* ३६ कोंकणी	* ५२ कानडी
५) अंकोला	३४८	४८१८५०	[illegible]	* २८ कोंकणी	* ६८ कानडी
सुरत जिल्हा	[illegible]	[illegible]	[illegible]		
१) धरमपूर	५६५	११२१०९	[illegible]	९५ *	
२) बांसदा	२३४	५३९९५	[illegible]	५४ *	* ४३ गुजराती

मध्यप्रदेश

जिल्हा	क्षेत्र चौ. मैल	एकूण लोकसंख्या	मराठी भाषिक	मराठीचें शें. प्रमाण	इतर महत्वाच्या भाषांचें शें. प्रमाण
१) अकोला	४०१२	९५०९९४	७५०१६५	७९	१० उर्दू
२) बुलढाणा	३७६०	८७०१६८	७२०९४०	८३	
३) यवतमाळ	५२३८	९३११८२	६४५८६७	६९	१० वंजारी
४) अमरावती	४७१५	१०३११६०	८०३६१५	७८	
५) नागपूर	३८४२	१२३४५५६	९२४१८६	७५	१२ हिंदी
६) वर्धा	२४२१	५३८९०३	४४१३५३	८३	
७) चांदा	९२२३	९७७६१८	७१८२४०	७३	१० तेलगु
८) भंडारा	३५८०	१०७१६५७	७१५१५८	६७	१७ हिंदी १२ गोंडी
एकूण	३६८८०	७६०७०३८	५७२७५२४	७५	

सरहद्दीवरील प्रदेश व द्विभाषिक तहसिली—मध्यप्रदेश

तहसिल	क्षेत्र चौ. मैल	एकूण लोकसंख्या	मराठी भाषिक	मराठीचें शें. प्रमाण	इतर महत्वाच्या भाषांचें शें. प्रमाण
छिंदवाडा जिल्हा					
१) सौंसर	११११४	१७४४८४		४८ *	२८ गोंडी * ११ हिंदी
बालाघाट जिल्हा					
१) बैहार	१५५६	१२४७७२		६ *	१९ गोंडी * ६३ हिंदी
२) वाराशिवणी	११६	३२२८५१		१३ *	* ५३ हिंदी
३) बालाघाट	१०८५	२४५७५६		११ *	* ५६ हिंदी
बेतुल जिल्हा					
१) भैंसदेही	१३४०			२२ *	३२ गोंडी * २१ हिंदी
२) मुल्ताई	९७२	१८६६६९		१५ *	* ४६ हिंदी
निमाड जिल्हा					
१) बऱ्हाणपूर	११३८	१७६४१०		४३ *	* ३३ हिंदी

मुंबई व मध्यप्रदेश यांतील मराठी जिल्ह्यांत समाविष्ट झालेले द्विभाषिक तालुके किंवा तहसिली

तालुके	क्षेत्र चौ. मैल	एकूण लोकसंख्या	मराठी भाषिक	मराठीचें शें. प्रमाण	इतर महत्वाच्या भाषांचें शें. प्रमाण
१) जत (दक्षिण सातारा)	८७४	१०८२७०		* ५३	* ३९ कानडी
१) द. सोलापूर (सोलापूर)	४६१	९३५०३			
२) अक्कलकोट (सोलापूर)	५३७	१४९६४७		* ३०	* ५४ कानडी
१) सिरोंचा (चांदा)	२०८९	९३७२६		* १२	* ३९ तेलगु
				* ४७ गोंडी	

* मुंबई राज्य व मध्यप्रदेश यांतील सरहद्दीवरील द्विभाषिक तालुक्यांतल मराठी भाषिकांचें लोकसंख्येंतील शेंकडा प्रमाण १९३१ च्या शिरगणतीप्रमाणें आहे. १९५१ च्या शिरगणती अहवालांत तालुकावार भाषाविषयक माहिती उपलब्ध नाहीं.

हैद्राबाद राज्य

जिल्हा	क्षेत्र चौ. मैल	एकूण लोकसंख्या	मराठी भाषिक	मराठीचें शें. प्रमाण	इतर महत्वाच्या भाषांचें शें. प्रमाण
१) औरंगाबाद	६३१८	११७९४०४	८९९१५४	७६	१४ उर्दू
२) बीड	४२७९	८२६०४६	७१-४१५	८७	
३) उस्मानाबाद	३७०७	८०७४५२	६७६२७०	८४	
४) परभणी	४८५५	१०१०८६४	८४३८६०	८३	१२ उर्दू
५) नांदेड	३९०२	९४९९३६	६२१९१४	६५	१४ तेलगु ११ उर्दू
एकूण	२३०६१	४७७३७०२	३७५६६१३		

सरहद्दीवरील प्रदेश व द्विभाषिक तहसिली—हैद्राबाद राज्य

बिदर जिल्हा					
१) निलंगा	५३६	१३२८३५	१०६३५७	८०	
२) अहमदपूर	६०९	१३३८४६	११६४२६	८७	
३) उदगीर	६३२	१३५९०८	१०३२२३	७७	
४) भालकी	५८९	१४०४५४	५२२६५	३८	४८ कानडी
५) संतपूर	४५६	९१३५७	३५०५७	३९	४० कानडी
६) औराड					
७) हुमणाबाद	५९२	१६८२८५	२८४३९	१७	४९ कानडी

(१२१)

सरहद्दीवरील प्रदेश व द्विभाषिक तहसिली–हैद्राबाद राज्य

तहसिल	क्षेत्र चौ. मैल	एकूण लोकसंख्या	मराठी भाषिक	मराठीचें शें. प्रमाण	इतर महत्वाच्या भाषांचें शें. प्रमाण
आदिलाबाद जिल्हा					
१) किनवट	६०९	७३११८	३१४८८	४४	११ तेलगु
२) राजुरा	७७६	७५३५७	४८०१७	६४	
३) उतनूर	७२६	३४४०४	४४१७	१३	१२ तेलगु
४) बोथ	७०८	७२३७२	१४९८८	२१	४० तेलगु
५) आदिलाबाद	५८०	१०१६११	११९४०	१९	५९ तेलगु
६) असिफाबाद	८३४	९२२४५	२२५२५	२४	५५ तेलगु
७) सिरपुर	८५६	१०४०९१	३०३०१	३०	५५ तेलगु
गुलबर्गा जिल्हा					
१) अळंद	६७८	१३४५२४	११९३७	१०	८० कानडी
नांदेड जिल्हा					
१) देगलूर	५२९	१३४२१७	४६९७६	३५	३१ तेलगु २० कानडी
२) मुधोळ	५४१	१२७०४३	४३३२९	३५	४५ तेलगु

परिशिष्ट २ रें

नागपूर करार

(१) भारतांतील राज्यांची पुनर्घटना व पुनर्रचना करण्याच्या प्रश्नासंबंधीं आपला अहवाल सादर करण्यासाठीं आतां एक उच्चाधिकार समिति नेमण्यांत येत असल्यामुळें मराठी भाषिक प्रदेशाच्या निरनिराळ्या भागांत रहाणाऱ्या आम्ही सर्व जनतेनें सर्व मराठी भाषिक प्रदेशाचें एक राज्य निर्माण करण्यासाठीं पायाभूत असा पुढील निर्णय घेतला आहे.

(२) सध्यांच्या मुंबई, मध्यप्रदेश व हैदराबाद राज्यांतील सलग मराठी भाषिक प्रदेशांचें मिळून हें राज्य बनविण्यांत यावें. या राज्याच्या कक्षेत आणि सीमेच्या आंत कोठलेहि अन्य राज्यांचे द्यपू असूं नयेत. या राज्याला महाराष्ट्र किंवा मराठी प्रदेश असें नांव देण्यांत येईल व मुंबई शहर या राज्याची राजधानी राहील.

(३) सर्व प्रकारच्या विकासयोजनांसाठीं आणि राज्यकारभारासाठीं या राज्याचे महाविदर्भ, मराठवाडा व उरलेला प्रदेश असे तीन घटक मानण्यांत येतील.

(४) एका राज्यसरकारच्या आवश्यक त्या सर्व गरजांची तरतूद करून सदरहू निरनिराळ्या घटकांमध्यें खर्च करण्यासाठीं लागणाऱ्या पैशाची (निधीची) विभागणी लोकसंख्येच्या प्रमाणानुसार करण्यांत येईल. परंतु मराठवाड्याची मागासलेली परिस्थिती लक्षांत घेऊन त्या विभागाची सर्वांगीण उन्नति करण्यासाठीं खास तरतूद करण्यांत येईल. याबाबतींत राज्य कायदेमंडळाला दरवर्षी अहवाल सादर करण्यांत येईल.

(५) राज्याचे मंत्रिमंडळांत त्या त्या घटकांतील लोकसंख्येच्या प्रमाणानुसार त्यांना प्रतिनिधित्व मिळेल.

(६) व्यावसायिक व शास्त्रीय शिक्षण देणाऱ्या संस्थांत अगर इतर खास शिक्षणाची सोय असलेल्या सर्व शिक्षणसंस्थांत प्रवेश मिळण्याचे बाबतींत प्रत्येक घटकाला लोकसंख्येच्या प्रमाणांत चांगल्या आणि पुरेशा सोयी उपलब्ध करून देण्यांत येतील.

(७) नव्या राज्यांतील वरिष्ठ न्यायालयाचें (हायकोर्ट) मुख्य पीठ मुंबई येथें राहील, व दुय्यम पीठ नागपूर येथें राहील. नागपूरचें न्यायालय सर्वसाधारणपणें महाविदर्भ प्रदेशांतील काम पाहील. वरिष्ठ न्यायालयाच्या न्यायाधिशांची नेमणूक

करतांना महाविदर्भाच्या न्यायकारभारांतील व वकिली व्यवसायांतील लोकांना पुरेसें प्रतिनिधित्व मिळेल याची काळजी घेण्यांत येईल. आवश्यक ते फेरफार करून हें कलम मराठवाड्यालाहि लागू होईल.

(८) सरकारी नोकऱ्यांच्या तसेंच सरकारनियंत्रित उद्योगधंद्यांतील नोकऱ्यांच्या (सर्व दर्जाच्या) बाबतींत प्रत्येक घटकांतील लोकसंख्येच्या प्रमाणानुसार भरती करण्यांत येईल.

(९) राज्यकारभाराशीं निरनिराळ्या घटकांतील जनतेचें अधिकाधिक सहकार्य मिळविण्याचें परिणामकारक साधन म्हणून विकेंद्रिकरण उपयुक्त आहे असा आमचा विश्वास आहे.

(१०) महाविदर्भाची राजधानी या नात्यानें तेथील जनतेचे संबंध अनेक वर्षांपासून नागपूरशीं निगडित झाले आहेत आणि त्यापासून तेथील जनतेला निरनिराळ्या प्रकारचे फायदे मिळत आहेत याची जाणीव आम्हांला आहे. एका राज्याचा कारभार कार्यक्षमरीतीनें चालविला जाईल याची योग्य ती काळजी घेऊन हे सर्व फायदे कायम रहावेत अशी आमची इच्छा आहे. या कलमाची अंमलबजावणी करण्यासाठीं योग्य तीं पावलें तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार टाकण्यांत येतील. वर्षांतून कांहीं विशिष्ट काळासाठीं सरकार अधिकृतपणें नागपूर येथें हलविण्यांत येईल आणि राज्यकायदेमंडळाचें किमान एक तरी अधिवेशन दरवर्षी नागपूरास घेण्यांत येईल.

(११) नव्या राज्यांत सर्व सलग मराठी भाषिक प्रदेशाचा अंतर्भाव होईल अशा रीतीनें नव्या शिरगणतीच्या आधारें खेडेगांव हा घटक मानून जिल्ह्यांच्या सीमांची पुनर्रचना करण्यांत येईल. नागपूर तारीख २८-९-१९५३

सही

रा. कृ. पाटील
पंजाबराव देशमुख
लक्ष्मणराव भाटकर
देवकीनंदन
यशवंतराव चव्हाण
पंढरीनाथ पाटील

सही

रामराव देशमुख
गोपाळराव खेडकर
शेषराव वानखेडे
भाऊसाहेब हिरे
नाना कुंटे
देवीसिंह चौहाण



मुंबई शहरापासून ७५ व २५० मैलांच्या त्रिज्येत येणारा प्रदेश
दाखविणारा नकाशा (संदर्भ पान ७३–७४)



कलकत्ता शहरापासून ७५ व २५० मैलांच्या त्रिज्येंत येणारा प्रदेश दाखविणारा नकाशा (संदर्भ पान ७४)



मद्रास शहरापासून ७५ व २५० मैलांच्या त्रिज्येत येणारा प्रदेश दाखविणारा नकाशा (संदर्भ पान ७४.)